क्र.
विषय
सं. क्र.

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा


इतिहास [illegible]

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

पत्रे १७८८ ते १७९५

पुस्ति 225

No. 42




Facsimile of the handwriting of ' Ram Mantri.

No. 1] [Before June 1708

श्री

माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचें शेवेसी

विनंती. शेवक जयेसिंग जाधवराऊ सेनापति कृतानेक विज्ञापना. राजश्री खंडेराऊ दाभाडें यास जमानाविसी आज्ञा केली. त्यावरून राजश्री खंडेराऊ दाभाडें बिरादरी देखील हाती घेतलें ताा

| | | |
|---|---|---|
| खासा खंडेराऊ दाभाडें | बाबूराव | आबाजी बाऊ (ड ?) |
| १ | १ | १ |
| कोनेरपंत | जिवाजी गोविंद | |
| १ | १ | |

सदरहूप्रमाणें स्वामीनी कृपाळून हाती दिल्हे ते आपण हाती घेतले. शेवेसी विदित जाले पाहिजे हे+ विज्ञापना.

*¶Dhanaji Jadhao to King Shahu, giving an undertaking on behalf of Khanderao Dabhade and his brother and retinue, that they would remain loyal to Shahu. Dhanaji died in June 1708 and so the letter must have been written before that time.*

---

No. 2] [8-4-1718

पौ छ ९ रजब

मुा कोटमगाव.

श्री

॥ माा अनाम सिवाजी विश्वनाथ देशपांडिये देहाय प्रगणे चांदवड यासी देवजी सोमवंसी हिंदुराऊ सुहूरसन समान अशर मया अलफ. पत्र पाठविलें ते पावोन साकल्य वर्तमान कळों आलें. राा सेनापति त्या प्राां आले त्यांणीं मुलकाचा तसनस केला व वोझरकर लोक याजपासून बलात्कारे कागदपत्र करून घेतला म्हणोन लिहिलें, त्यासी ये प्रसंगी त्याजलाही संध्य सापडली. चिरंजीव तिकडे गेले आम्ही इकडें राहिलों. धामधुमेचा प्रसंग. त्याचे आगमन तिकडे जाले. सुने स्थळी जाऊन कारभार केला. बरें; ते गोष्टीचे काय आहे ? ईश्वर-इच्छनें दोन महिनिया त्याची आमची गाठ दरबारी पडेल, तेथेंच जो प्रसंग होणे

+ पाठीवर अष्टकोनी शिक्का—श्री राजारामचरणीं दृढभाव। सेनापति धनाजी जाधवराव.

तो होईल. तुमचे वर्तमान कमाविसदारानी लिहिलें त्याजवरून बहुत संतोष जाला. तुम्ही जमिदारीची शर्त केली. याजउपरी सर्वाविसी आपले समाधान असो देणे. मुलकाचे तसनसेचा[2] विचार तर चहूकडील प्रसंग विज्वरच जाला, याजमध्यें त्यासी फावलें ते गोष्टवर नव जाणे. तमाम रयतीचा दिलासा करून तुम्ही कौलपत्र घाल तेणेप्रमाणे चालऊन. तुमच्या विचाराखेरीज कांहीं पहिलेही कारभार केला नाहीं आणि पुढेंही होणे नाहीं. रयेतीस दिलासा देऊन लावणी करणें. जाणिजे. रा छ १७ जमादिलावल.

¶*Devji Somvanshi issues this order to the Deshpande of Chandwad. The Senapati referred to in this letter must be Khanderao Dabhade. The letter illustrates how the quarrels among the Maratha Commanders affected the ryots.*

---

*No. 3*] [*1719-20*

छ २९ जिलकाद

**श्री**

**राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान**

**गोंसावियांसी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. राजश्री विसाजी तुकदेव सुभेदार प्रा नासिक याजकडून पत्र आले जे. राजश्री देवजी सोमवंसी याणी राजश्री प्रधानपंताची पत्रे घेऊन वोझरी आमचा गुमास्ता पाटिलकीचा आहे तो उठऊन टाकावे म्हणून सावजी आटोलियास लिहिले. त्याजवरून आटोलियानी फौजबंदी करून कसबे मारावर लगोट[2] बहुतच आरंभिला म्हणून लिहिले, त्याजवरून कललें. परंतु विचारें पाहातां येकवल दरबारी कारभार निवडला आहे तो आपणास कलला असोन यैसी पत्रे देतील यैसे होणे नाही; तथापि विचार न कले. त्याचे सांगितलेवरून दिल्ही असतील नसतील हे आपणास अवगत असेल. तरी हें काये वर्तमान आहे तें सविस्तर लेहून पाठविले पाहिजे. त्या वतनाचा केवल दुराग्रह आम्ही आपले पदाचे बलें करितों यैसे नाहीं. हें तेथें राजश्री स्वामीसमक्ष

---

१ नासधूस, घाऊमेल. २ निकर्ष, तसदी.

निवडलें आहे. हें वर्तमान तपसिले देव्रवासच पुसावें आणि आम्हास विचार सांगणे तो सागावा त्याप्रमाणेंच केला जाईल. बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे. छ २१ जिलकाद हे विनती

श्री ०
राजा शाहु स्वामि
छत्रपति खंडेराव
दाभाडे सेनापति.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, complaining about Devji Somvanshi and requesting that justice might be done.*

---

*No. 4*] [*15-8-1720 ?*

**माहाराज राजश्री छत्रपति**
**स्वामीचे शेवेसी.**

शेवेस शेवक कालोजी भोसले विज्ञाप्त. येथील क्षेम ता। छ २१ सौवाल स्वामीच्या कृपादृष्टीकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र श्रावण बहुल सप्तमी मंदवासरचे सादर केले; तेथें आज्ञा केली ऐसीजे. फौज घेऊन स्वामीसंनिध येणें म्हणून आज्ञापत्र सादर जाले; त्यावरून शेवकाचे समाधान जाले; त्यावरून आपण फौज घेऊन येत होतों त्यास दाभाडा बलकाउनु[१] येथे आला. त्यावरून आपण फौजबंदी करून त्याचे आमचे जुज जाले. त्याचे वर्तमान पहिले लिहिलें आहे; त्यावरून विदित होईल. याउपरी आपण व रा। अमृतराऊ देशमूख व पवार व सोमवशी, गंगातीरास पाचसा हजार जमाव आला आहे, ते सत्वरच येतील; ते आम्ही सामील होऊनु दाभाडियास तंबी पोहचवितों. स्वामीच्या दर्शनास फौज घेऊनु येतो. याउपरी बाळोजी कापसा जो[२] सभाजी काळे, व आपाजी सितोळे जो शहाजी नाईक, यास रुा ६० साठ देविले ते त्यास प्रविष्ट केले. सेवेसी श्रुत होय.

सिक्का

¶*This letter shows that Dabhade Senapati was creating trouble for Shahu so early as 1720.*

---

१ बळजबरीनें. २ जथे,

No. 5] [18-8-1721

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनती. सेवक खंडेराऊ दाभाडे सेनापति कृतानेक विज्ञापना. भाद्रपद सुध सप्तमी भृगुवासर मुकाम कुरकुंब माहाराजांचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वृत यथास्थित असे. माहाराजानी कृपालु होऊन सेवकास सेनापति हें पद येथास्थित देऊन गौरविले. त्याप्रा स्वामीचे प्रतापे सेवाहि येथाशक्ति करून दाखविली. जैसे तैसे सा महिन होते. पुढे राजश्री फतेसिंग भोसले याजवर कृपालु होऊन सरंजाम त्यास दिल्हा. उपनाव सेनापति सेवकास दिल्ही त्या उपनावाचें आश्रयावर माहाराजाचे पुण्यें जे जाले तें केलें. त्याजउपर सेनापतीस सरंजाम काहीं तरी असावा येसे माहाराजाचेच चितांत आले ते समई थोडासा दिल्हा. तो मारानिलेकडील अमलांत दिल्हा. असो. जें धण्याने दिल्हे तेच लक्षाचे जागा मानून समाधानें येथील आमल मागतां मागतां सात आठ वर्षे अतिक्रमली. परंतु रुपयास संबंध नाही. अगदी येवज राजश्री फतेसिंगबावा यांजकडेच गेला. निदान उपाय नाही तेव्हा मग त्याचे वलणाचा सरंजाम त्याणी ठेविला. आम्ही इकडे तीन माहाल गतवर्षी लोकास देऊन दोनी हजार फौज ठेऊन स्वामीकार्यावर आणिली. आतांही फौज सिधच आहे. जे समई कार्य उपस्थित होईल ते समई कार्याची आहे. येसे असता सांप्रत माहाराजानी आज्ञापत्र सादर केलें कीं निंबाईत खासगीकडे मुकासा ठेऊन कमाविसदार विठल रंगनाथ पाठविले आहेत, आपले लोकास ताकीद करून माहालीचा आमल सुरलित देणे म्हणून आज्ञा केली. येविषईची विनती सेवेसी पूर्वीही केलीच होती कीं, सात आठ वर्षे भागानगराकडील माहाल राजश्री फतेसिंगबावानी अमल करून येवज घेतला त्याप्रा इकडील माहालीचा येवज आपण घेऊन फौज ठेविली आहे, माहाराजानी दया करून चालवणार धणी समर्थ आहेत म्हणून विनती केली. तिचा अनादर करून प्रस्तुत आज्ञापत्र सादर केले. याजवरून पूर्ववृतातांचा विशदें लेख सेवेसी करणे लागला आणि चितातही सेवकाच्या उदासीनता आली. निमित्य की समुद्रवलयांकित पृथ्वी धण्याची, धण्याने जें ज्यास दिल्हे तें सर्वत्र चालावे आणि सेवकास दिल्हे ते न चालावे येसा सेनापतिपदाचे ठाई अपराध कोणता आहे हें न कलेसे झाले. कदाचित पदाचें ठाई अपराध असिला तर आम्ही सेवक निरपराधी असता अपराधी पदाचें योगें अपराधी व्हावें यात विशेष काय आहे? याजकरिता सेवकावर कृपा पूर्वीपासून धण्याची अनुपम आहे तणेप्रा कूर्मावलोकन करून सेनापतीचे ठाई अपराध असेल तो दूर करून निरपराधी सेवकास निरपराधपदी

1068

स्थापना करून सेवा घेणार माहाराज धणी समर्थ आहेत. • तेथें सेवकाने विशेप काय लिहिणें. विठल रंगनाथ सेवेसी निवेदन करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

*¶Khanderao Dabhade makes a humble request to King Shahu for a proper reward for his services. He complains that he has been singled out for displeasure ; that his estates have been given over to Fatesing Bhonsle, and that therefore he has no scope for work. He has kept an army and is ready to serve the state. If he has failed to satisfy his master, his faults may be pardoned and he may be given some definite task to perform.*

---

*No. 6*] [*1725 ?*

छ २९ जिलकाद.

**श्री**

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी विनंती उपर. धिराजी पवार या प्रांतें राहून धामधूम करितातीं. त्यास राजश्री स्वामीचे विचारें ते येणार म्हणून अन्यत्र तरतूद कांही होत नाही. यैसे दोनी महिने निघोन गेलियावर मागती चौघे चहूकडे जातील म्हणजे येथापूर्व मुलकाचा नाश होईल. याजकरितां डोलेझांकी करायाचे नव्हे. राजश्री स्वामीस पुसोन कोणे विचारें आणितातीं तो आणावा; नाहीतर हरयेक इलाज करून मुलकाचा काटा काढून मुलूक राहे ते करावें. याचा विचार आपण कैसा केला आहे तो लिहिला पाहिजे. जाणिजे. छ २१ जिलकाद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब सुद.

*¶Khanderao Dabhade to Bajirao, complaining about Dhiraji Pawar.*

---

*No. 7*] [*1725 ?*

छ २९ जिल्काद

**श्री.**

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी विनंती. उपरी, आपण पत्र पाठविले, प्रविस्ट होऊन वर्तमान आवगत जालें. तेथें बोलीचालीस प्रसंगी आम्हाकडील भाव कललियाविरहित अटकाव पडेल, याजकरितां कलावा लागतो, याजकरिता लिहिले असे. राजश्री स्वामीची आज्ञा घेतेसमयी समक्ष बोलतां

इतकेच बोलिलों जे, गुजैरात मालवेकडे आमच्या फौजा जातील तैसी बाबती सरदेशमुखीची जाऊन आपला अमल करील. ज्याचा तो आपलाला धंदा करील यैसें बोलोन आलों आहें. केवळ आम्ही निकाल करून देतों, अवशमेव फौज पाठवावी यैसें कांही मान्य केलें नाहीं. येविषयीं त्या प्रांते जाणारांनीही आम्हास पत्र पाठविलें होतें की, तुमचे भरवसियावर आपण मान्य करितों. याचे उतर परिछिन त्यांस आम्ही पाठविलें कीं आम्हास कोठे जाणें नाहीं. गतवर्षीचे फौजेचे समजाविसीखाली नवे लोक ठेवावे अगर मनसुबा आणिखी करावा हे कांही सुचत नाही. यैसे परीछिन उत्तर दिल्हें आहे. आपणहि प्रसंगी जे बोली कर्तव्य ते दुसरियाचा परिस्पंदन[१] होये यैसे करून सत्वर आलें पाहिजे. जाणिजे. छ ११ जिल्काद. बहुत काय लिहिणें कृपा आसो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Letter addressed to Bajirao by (can it be ?) Khanderao Dabhade. He says he cannot undertake a fresh expedition, as he has not been able to pay off his previous year's liabilities.*

---

*No. 8*] [*1725 ?*

छ ४ (?) सफर

श्री

**राजश्री बाजीराव पंडित**
**प्रधान गोसावी यांसि.**

॥ सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. आपले राज्यांत जे लोक चाकर तेच रयेती. त्यास सुप्रवृतीचे दिवसांत जिल्हेदारीचा कार्येभाग करीत होतां तो बहुतसा वाईट दिसत नवता, कार्ये निमित्य, माणसास दुसरे ठाई जावयास जागा नवता. च्यार गोस्टी आपले काकुलतीच्या दाखऊन कार्येभाग चांगला दिसत होता. आता ते दिवस नाहीत. याजकरिता आपणास येक दोनी वेळा लिहिलें. त्याचें उतरहि आपण लिहिलें की आम्ही कोणावर आतिशये करीत नसता लटिकाच बोभाट करणार करितात यास काये करावें, म्हणून लिहिले. त्यास सांप्रत राजश्री सिवाजी जगथाप पिंपळेकर

---

१ कार्य करणें ; कार्यप्रवृत्ति.

बहुत दिवस चाकर आम्हाकडे आहेत हें आपणासहि विदित आहे. गतवर्षापासून त्याचा पिछा घेऊन काली परवा मुदाम राऊत पाठऊन दंगा केला. गनिमाचे भयाने इतका त्रास मनुष्य पावत नाही. यैसा त्रास होऊन मुले लेकरें बायेका कुल गावीच्यादेखील रानोरान पळाली. सिवजी सडा उपलोणी[1] घोडियावर बसून पलाला. हरकोण्ही लाहान माणूस येऊन सांगतो त्याचे पथ्य मानून जुनी लिंगाडे युगांतरीची काढून माणसाची पाठी घ्यावी हे (आप)णास राज्यभाराचे उपयोगी नव्हे. यैसा कहर जाला म्हणजे आतां जगथापनी पारनेरास[2] जावे इतकाच आर्थ आहे. आम्हाकडील लोक ते आपले पदरीचे, इतर नव्हेत, त्यांजवर निस्टूरता धरावी यैसे नाही. लोकांची समाधाने रक्षून पाठी थोपटून आजीचे समयांत त्यांचे हातें महत्कार्यें घ्यावे यैसें इश्वरें आपणावर मख्तयार दिल्हे आहेत. क्षुलक विचार सर्वात्मना न करावे. आधीच माणूस गतवर्षापासून दुष्कालाने त्रासले. दुसरे धामधुमेचा प्रसंग; मनुष्य विचारी पडले आहे; यामधें जिकडून धावणे येवे[3] तिकडून आगी आलियावर जीव वांचवायास परकीयांचे पदरी पडतील. अत:पर आम्ही कोठवर लेहावे ? जे विहित तें केले पाहिजे. केवल मोगलाई नव्हे, घरचा फितूर बहुतच फटकाल. येरवी आपण जे करिजेल ते सतेमुले सर्वहि होईल. परंतु हे दिवस नव्हेत. सुचला अर्थ तो लिहिला आहे. आपणहि हे गोस्टी चितांत आणून मनारोखा पाठविला पाहिजे व वरचीलहि गावगना कोठे कुस्टमिस्ट ये प्रसंगी मनास न आणावे. परकीयावर ताजगी[4] करावी; वरकड गोस्टी तूर्त येकीकडे ठेवाव्या; कार्येप्रयोजनास पुढें उदंड दिवस आहेत. जाणिजे छ ९ सफर. बहुत काये लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद..

¶*Khanderao Dabhade to Bajirao : reads him a touching sermon on the duty of the ruler in protecting his people. He must not constantly persecute them on one pretext or another.*

---

१ उघड्या पाठीचा.

२ हें मोगलांकडे असावें.

३ जिकडून धाऊन-मदतीस यावें.

४ वरचढपणा, छाप.

No. 9] [1726 ?

श्री

पुरवणी. राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
गोसावियासी.

विनति उपर. राजश्री चिमणाजी पंडित राजाज्ञा येथे आले हे वर्तमान अपणास पूर्वी लिहिले होते. त्याचा जाब आपण लिहिला कीं कर्जाची वाटी जे करून घेणे ते घ्यावी. वरचीले[1] म्हणाल त्यास सिध्र आहो म्हणून लिहिले. त्यास प्रस्तुत चिरंजीव राजश्री कृस्णाजी दाभाडे याणी आपणास सांगावयाचा अर्थ सांगितला तो कललाच आहे. मुख्य गोस्टी पंडित मारानिलेचा अगत्यवाद आपणास आहे तैसा आणिखी दुसरियास आहे यैसे नाही. त्याहीमधें मारानिले येथे येऊन बसले, हुजरून निघाले, हा लौकिक परकीयानी यैकून बहुत काही संतोष मानून आदरपूर्वक कागद पत्र आले ते अम्ही दस्टीने पाहिले. जाणारास काही नाही. परंतु हे गोस्टी जाऊं देणारास युक्त नव्हे. कर्जाचा विचार पाहता राजपुत्रांकडील प्रसंग आहे. बहुतसा अगाध तुम्हा आम्हास पडतो यैसे नाही. हुजूर गेलियावर उभयेता मिळून विनति करून घडेल निकाल तैसा काढि(ला) जाईल. तूर्त करिता इतकेच, येकवेल आपण येऊन समाधान करून चिताची स्थिरता करावी, जाऊ देऊ नयेत. पुढे विचारे विचारें जैसे होईल तैसे करावें. याची हैगै न करावी. बहुत काय लिहिणे ? छ १२ मोहरम.

मोर्तब
सुद.

¶*Chimnaji Damodar was removed from the office of Rajadnya on 24th September 1728. This letter seems to be addressed by Khanderao Dabhade to Bajirao requesting him to adjust the dispute about Chimnaji's debts.*

---

No. 10] [1727 ?

पैवस्ता छ ८ रबिलोवल
तीसरास आले.

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी, सकलगुणालंकरण अखंडित-लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर.

[1] वरचिल = शेष, वरकड, अधिकउणें.

येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. [१]निघोजेचे मुकामास येणें म्हणून लिहिले त्याप्रमाणे येतों. परंतु लोक मागून येताती ते त्या मार्गे आम्ही आलियाने दगावतील, याजकारितां आजी आबी धारगावचा मुकाम करून सिबलापुरचा (?) घाट उतरोन थेहरेवर येतो. आपणहि त्याच घाटे थेहरेवर यावे. भेटी होतील. त्यानंतर विचारें करून जे * * तें करावें. लोकांमुले आम्हास या मार्गे जाणें लागलें. प्रवरातीरी आपल्या आमच्या भेटी होतील. जाणिजे. रा छ ९ रविलावल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

( शिक्का ) (मोर्तब सुद.)

¶*Khanderao Dabhade to Bajirao, mentioning the route he is taking to join the addressee.*

---

*No. 11*] [*1727?*

## श्रीजयति.

सेवेसी विज्ञापना. आम्ही आज दोन प्रहरा येथे आलों. राजश्री रायांची व सौ मातुश्री काकीची भेटी होऊन वर्तमान सांगितलें. त्यास त्याजकडेहि तिकडील बातमी याचप्रमाणें आली आहे. हली राजश्री रायास बरे वाटत नाहीं. म्हणून आपली भेटी घेऊन राजश्री त्र्यंबकरायास फौजसमेत द्यावे, आपण राहावेंसे चितांत विचार आला. परंतु ते गोष्टीवरी दोन शह. एक राजश्री छत्रसिंग ठोंके याचे पत्र आले कीं तुम्ही आल्याविना बांडे हाती लागत नाही. तुम्ही आधी येणे. ते कार्य राहतें. दुसरे त्र्यंबकराऊ, तुम्ही जाऊन याणी राहावें कोठें? जेव्हां एखादे गर्डी राहावें तेव्हां सारी फौज जेथे हे रहातील तेथें गला पडेल. येणेकडून विचारास उतम नाहीं. याजनिमि(त) आपली व रायाची भेटी होऊन जो पोख्त विचार कर्तव्य तो करावा. विचारे जावेसे जाले, तैसेच येतील. येथे आपले विचाराखेरीज दुसरा विचार किमपि नाहीं. यास्तव लस्कर विचारे चाकणेचे रोखे यावेसे जाले तरी पाठवावे. आपण यावें. नाहीतरी एक मुकाम तुळापुरीच करून आपण व राजश्री तात्यानी येथे यावे. सर्व वर्तमान विदित होऊन जो विचार होईल त्याप्रमाणे राजश्री सेनापति मान्य आहेत. तरी यावयाचें केले पाहिजे. यांचे विचारे व काकीचे विचारे राऊ गेल्याविना फौज

---

[१] तालुके खेड.

जथत नाहीं. तुम्ही याणी एक होऊन लांब लांब मजल करून ते प्रांते जावें पवार सोमवंशी बांडे पिलाजी जाधव कर्नाजी भोसले व ते एकत्र होऊन जे काम करणे ते करावेसे आहे. परंतु आपण येथेच येऊन विचार करावा आणि कूच दरकूच जावेसे आहे. येविसी जे आज्ञा कर्तव्य ते करून आपण यावें. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The letter is not clear. It seems to refer to Bajirao's compaign in Malwa The handwriting suggests Ramajibava Chitnis as the writer who appears to be addressing Chimaji.*

---

*No. 12*] [*15-4-1727-28*

छ २ शाबान

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नों कृष्णाजी पवार विश्वासराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. सातारियाच्या मुकामी अपल्या आगमनाची प्रतीक्षा केली. परंतु आपले येणे व्हावयासी विलंब लागला. राजश्री स्वामींनी पूर्ववत गुजराथ प्रां चिरंजीव राजश्री उदाजी पवार यासी व आपणांस जावयाची आज्ञा केली. येसियासी या प्रसंगाचे बीजारोपण अभिमानपुरस्कर आपण करून आमचा सर्वस्वे अभिमान धरिला. येसे असतां ये गोष्टीचे उभारणीचे पारपत्य व्हावयासी विलंब लागतो याजवरून अपूर्व दिसोन येते. पूर्वीपासून आम्ही आपले पदरीचे, चिरंजीव राजश्री उदाजी पवारहि आज्ञाधारक; येदर्थी दुसरा अर्थ नाही. प्रथम आपण ये गोष्टीचा अभिमान धरून आम्हास आज्ञा करणे ते केली त्यायोगेच या प्रसंगात पडावेसे झाले. तरी अभिमान धरिल्यासारिखे येविशईचे उभारणीविसी राजश्री राणोजी सिंदे व राजश्री मलारजी होलकर व चिरंजीव राजश्री तुकोजी पवार व राजश्री आनंदराऊ पवार यासी आज्ञा करून ते व आम्ही येका विचारे होऊन मामला निवडून ये ये[१] तो अर्थ करावा. ये गोष्टीने येश आपले पदरीं पडल्ये. येदर्थी दुसरा अर्थ नाही. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणे चतुर्वर्गास आज्ञापत्रे सादर करून ते आम्ही येकत्र होऊन मामला निवाडून ये ये तो अर्थ करावयासी आपण सर्वज्ञ आहेत. विशेष लिहिणे तरी

---

१ दुबार शब्द.

आमचा सांभाळ पूर्वीपासून केला आहे, पुढेही आपलीच आश्रय आहे. येदर्थी विस्तारे काये लिहिणे? कृपावृधि केली पाहिजे. बरेकडे फौजा आपल्या आहेत तेणेप्रमाणेच हेहि फौज आहे. येविसीचा साकल्य अर्थ राजश्री आपा व राजश्री आवाजीपंत याजजवली निवेदन कला आहे. ते विस्तारे श्रुत करितील. लोभ असो दीजे हे विनंती..

मोर्तब
सुद.

¶*Krishnaji Pawar solicits the Peshwa's help to retrieve the position in Gujarat where the Pawars appear to have been defeated. It was, he adds, on the Peshwa's initiative that the expedition was undertaken. To whom else could they now look for succour?*

---

*No. 13*] [*9-7-1727?*

छ ९ जिल्हेज

**श्री**

**राजश्री बाजीराऊ पंडित**
**प्रधान गोसांवी यांसी**

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्या श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणऊन स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर लिहिले पाहिजे. जवार रामनगर येथील बोली आपली आमची निमेनिमप्रा जाली आहे. त्याप्रा चालवावे यैसे आसेल तर आपणाकडील कमाविसदार येकत्र राहोन आमल परस्परे अनुमते करून बोलीप्रा वसूल घेऊन मुलूक स्वस्थ होये यैसे करावे. येविषई राजश्री पिलाजी जाधवराऊ यास व बरकड कोणास पत्रे लिहिणे असतील ती परिछिन लेहून पाठवावी जे; धामधूम न करीत यैसे केले पाहिजे. जाणिजे छ ३० जिलकाद. बहुत काये लिहिणे कृपा आसो दिल्हे पाहिजे हे विनंती

श्री ०
राजा शाहु स्वामि
छत्रपति खंडेराव
दाभाडे सेनापति

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, asking for a half share in Jawar and Ramnagar.*

No. 14] [21-9-1727 ?

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ता। राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून तां। छ १६ सफर गुरुवासरपरियेत कुशल असो विशेष. आजी छ मारीं प्रहरा रात्रीस दरबारास गेलो होतो. त्यास निजामनमुलुख याच्या लस्करातून बातमी जोडा आला. त्याणे वर्तमान सांगितले की सुलतानजी निंबालकर याच्या भेटी होणार आहेत. त्यास लस्करचे कूच छ १४ रोजी आगर छ १६ रोजी होणार. म्हसवडावरून सातारियास यावे यैसे वर्तमान सांगितलियावर राजश्री नारबाबा यास बोलाऊ पाठविले. अगोधर दरबारी राजश्री प्रतिनिधी व आनंदराऊ व मोरो शामराज होते. त्यावर मंत्री आले. भास्करबावा व नरसीपंत यास बोलाऊन आणून विचार करून स्वामीस व सेनापतीस व सिदोजी निंबालकर सरलस्कर यास पत्रे सहीची लेहून मुजरद जासूद रवाना केले. ती पत्रे स्वामीस पावतील. त्यावरून सर्व अर्थ कलो येईल. सारांश विचार राजश्री स्वामीच्या चितांतील व सामादिक यांच्या चितातील सेनापतीस व स्वामीनी येकत्र होऊन दाहा बारा हजार फौज कनिष्ट पक्षे उभयेताची जमा होईल ते जमा करून गनिमाचा शहावर जावे म्हणजे गनीम तुम्हावर येईल यैसा विचार आहे. कलेल. गनीम टाकून शाहराकडे प्रस्तूत जावे यैसा विचार नाहीं. स्वामीनी मनसुफीयाचा विचार काये केला आहे तो अर्थ सविस्तर राजश्री स्वामीस वरच्यावर लेहून पाठविणे. स्वामीकडे बातमी आली असेल त्याचे वर्तमान लिहिले पाहिजे. राजश्री स्वामीस ये प्रसंगी स्वामीचा व सेनापतीचा भरवसा आहे. येविसाचा अर्थ तीर्थरूप राजश्री तात्यासमागमे स्वामीस सागोन पाठविला आहे, त्यावरून कलो येईल. तर स्वामीनी याउपरी विचार काय केला, फौज जमा करून कोठे रोखे जाणार, सेनापतीचा आपला येक विचार होतो कीं नाहीं, यैसे अवघे वर्तमान राजश्री स्वामीस लेहून पाठविले पाहिजे. ये प्रसंगी स्वामीनी उत्तम प्रतीने स्वामिकार्य करून राजश्री स्वामीस संतोष होये ते केले पाहिजे. राजश्री आपास सत्वर पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malharpant Purandare to Bajirao : communicates Shahu's desire that Bajirao and Dabhade should unite their forces and march against the enemy, and report whether Bajirao and Dabhade would agree to co-operate.*

No. 15] [22-9-1727 ?

छ १७ सफर

## श्रीशंकर.

### राजश्री बाजीराऊ पंडितप्रधान गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. कदमाकडील होलकर वगैरे लोक यांची बोली करून आपण ठेविले ते न ठेवावे या विचारें दोनी बंद तपशील लेहून पाठविला. त्याचा जाब अगदीं गाळून राजश्री कृष्णाजी दाभाडे याचा जाब सांगतील म्हणून पत्र लिहिलें. त्याजवरून मारनिलेस पुसतां सांगितलें कीं ये गोष्टीची चर्चा तेही आम्हासी केली नाही म्हणून सांगितले. याजवरून विचार अपूर्व अडलला. सांप्रत राजश्री नागोजीराऊ पाटणकर यांस हती घोडे कबूल कबूल[1] करून बोली लाविली म्हणून येकिले. येसियासी मारानिले गतवर्षी आम्हाकडे होते. सालमारी बोली न करितां येथून आपणाकडे जाते तरी ते गोष्टीचे कांहीं नवते. त्यास येथे बोली केली. नालबदी नख्त च्यार पाच हजार रुपाया खेरीज कापड दिल्हे येसे असोन आपण त्यांची बोलीचाली करिताती तेव्हां काय म्हणावे ? मसलतेचा प्रसंग; उभयेतानी सौरस्यें जाऊन मनसबा साधावा हें काय, परस्परें भेटी होवी हें काय, आणि इकडे ज्यांची बोली होऊन नालबंदी घेतली त्यांस आपण नेऊन बोली करावी हें काय ? यामुळे विचार अगाध दिसतो. आपण तों जें करणें तें मनसबियास अनुकूल तेच करीत असतील. परंतु अडलला प्रसंग मनसबियास प्रतिकूल दिसतो, याजकरितां लिहिलें असे. याचा अर्थ विशदें लिहिला पाहिजे. आणि आपण चिखलीस कधी येणार हे लिहिले पाहिजे. आम्ही कूच करून जाणार तों चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे आपणाकडून आले. त्यांचे विचारावर आपला मार्ग लक्षित मुकाम केला असे. काली राजश्री स्वामीकडून खासदस्तुरें शफथपूर्वक आज्ञापत्र आले. तैसेच आपणासहि आले असेलें.[2] याजकरिता अत:पर विलंब कार्याचा नाही. जाणिजे. छ १७ सफर. बहुत काय लिहिणे. कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनती.

मोर्तब सुद.

¶*Khanderao Dabhade to Bajirao, complaining against Nagojirao Patankar.*

१ दुबार शब्द. २ शिक्का.

No. 16] [6-11-1727

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसांवी यांसी.

ई श्रीमत् सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालियादारभ्य, कागदपत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. येथील वर्तमान तरी, आम्ही मजल दरमजल येऊन नर्मदा छ १९ रबिलोवली पार जाहालो. पुढे गुजरात प्रांते मजल दर-मजल जाऊन. रा कठाजी कदम हे रेवा कार्तिक सुध प्रतिपदेस उतरून दाहोदेपलीकडे गेले. रा पिलाजी गाईकवाड सुरतेकडे गेले आहेत. आम्ही उभयेताचे दरमियाने त्वरेनेच जात असो. आपल्या प्रतापे जे होईल (व)र्तमान ते वरचेवरी लिहून पाठऊन. आपणहि निरंतर वर्तमान लिहित असावे. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ असो द्यावा. रा छ २२ रबिलोवल. हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao: informs the addressee of his having crossed the Nerbudda and that Kanthaji Kadam had preceded him three weeks earlier.*

---

No. 17] [पो 4-2-1759

पो छ ४ रजब
फाल्गुन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी.

विनंती सेवक गोपाल संभाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशेल जाणून स्वकीयें लेखनआज्ञा करीत असावें विशेंस. कृपा करून पत्र पाठविले ते छ २७ माहे जमादिलाखरी पावलें. पत्री लिहिले कीं राजश्री रायांस घेऊन घणदिवी नवसरीवर सत्वर जावें. त्यास आपले पत्रा-अगोधर आज तीन रोज येथे आलो आहो. त्यास पाहांताना सर्वाचे मते येश आपणच घ्यावें; मग सरकारकाम लौकर हों किंवा लांबणीवर पडो ऐसा विचार आहे. आम्हास नारोपंतानी लिहिले कीं पुढे न येणे. तेथेच राहाणे. परंतु

आम्ही हळू हळू दाहा कोस पुढे आलोच आहो. सुरत येथून दाहा कोस आहे. विचार बहुताचा दंडक; नासले तरी निमित्ये दुसरेयावर घालावे. कार्ये केले तर आपण केले यैसे दर्शवावे यैसे आहे. बरे, सर्व विपरयासच आहे. परंतु राजश्री रावसाहेब कार्यास चुकावयाचे नाही. राजकारण केले आहे. जर घडोन आले तरी उत्तमच आहे. हे साहेबकामास चुकावयाचे नाही. घडोन येईल ते खरें. इंग्रेजाची व हबसियाची लडाई च्यार पाच रोज सुरू जाहली आहे. जंगी बंदरांत इंगरेज उतरला आहे. हबसी पेचात आलाच आहे. राजश्री कृष्णाजीपंत व बोरगे ताकपीर व भोसले बाबर व त्रिंबकराऊ सदासिव व राजश्री रावसाहेब येका विचारे आहेत. मुलूक कौली. ताकीद उतम प्रकारें करितो. धणी असतां ताकिदीचा हैगई होते. परंतु आमचे आम्ही आहो येसे जाणून वहुत निकडीची ताकीद आहे. कडब्यासिवाय काही उपद्रव देत नाही. कडबाहि रानातून आणितों. +बहुत काय लिहूं? लोभ असो दीजे हे विनंती[१].

¶*The writer Gopal Sambhaji Khandekar refers to a naval engagement between the Sidi and the English.*

---

*No. 18*] [*21-4-1728*

छ २१ रमजान

**श्री**

**पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. दाभाडियाकडील वर्तमान तरी उमाबाई यानी सालगुदस्ताचा हुझूरचा येवज पाच (हजार ?) रुपये राजश्री (यशवंतराव ?) दाभाडे याजपासी दिल्हा * * * * * घेऊन तलेगावास आले * * * * सहवर्तमान गुजराथ प्रांते * * * गायकवाड व कठाजी कदम * * * * सहवर्तमान ये (मधील दोन ओळी फाटल्या आहेत) * कृष्णाजी पवार * * * उदाजी पवार येकत्र * * * रून विंध्याद्री पावेतो उमाबाईनी राजश्री

यासमागमे येवज देऊन रवाना केले. ते समई सांगितले की पैका हुझूर नेऊन देणे. त्यास मागून उमाबाईनी पत्र कृष्णाजी दाभाडे यास पाठविले की नारप्रभु व कृष्णाजी पवार उदाजी पवार येकत्र होऊन गुजराथ प्रांते जातातो.

+ From here the writer's hand.

१ हें नानासा कारकीर्दीतील पत्र अगोदर आलें आहे.

हुझूर खासगीकडे माहाल ठेविले. चापानेरचे ठाणे राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे व आनंदराऊ पवार यानी घेतले. याकरितां गुदस्ताचा पैका हुझूर द्यावासा नाही तरी तुम्ही पैका न देणे. हुझूर खासगीकडे माहाल ठेविले आहेत. त्याच्या सनदापत्रा करून घ्याव्या. मुलकात दुसरी फौज न जाये ते करावे. येसी रदबदल करून आपला मुदा हसिल[१] जाला तरी पैका द्यावा नाहीतर न द्यावा म्हणून पत्र त्यास असे लिहिले आहे म्हणून वर्तमान आहे. खरे लटके कलत नाही. राजश्री स्वामीनी कृष्णाजी दाभाडे यास आज्ञापत्र पाठविले की तुम्ही सिवापूरचे मुकामास भेटीस येणे. त्यानी उतर पाठविले * * * * सातारियास गेली * * * * * येऊन म्हणून पत्र आ * * * * * कलावे या करितां लिहिले असे. * * * विदित जाले पाहिजे.

*¶Purandare to Bajirao, informing him of the attitude of Umabai Dabhade so far as the dispute between Shahu and herself was concerned.*

---

*No. 19]* *[1728*

## श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी आपा यांसी प्रति चिमणाजी दामोदर अनेक आसीर्वाद. येथील कुशल जाणौनू स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. राजश्री कुसाजी गणेश हे आमचे पुरातन सेवक कार्येकर्ते आहेत. याकरितां आपणाकडे आलेत आहेत. तरी यां योग्य सेवा असेल ते यास सागोन यांचे हाते सेवा घेतली पाहिजे. यांचे आम्हास अगत्यच आहे आपणहि यांस वचन केले आहे. याकरिता याचे सर्वविसी आाभिमान धरून चालविलें पाहिजे. केवल पडमूते[२] नाहींत. ज्या कार्यावर ठेवाल तेथे तत्पर राहातील. आणि आमचेहि आहेत. येसे चितात आणून, याचे सर्वस्वे चालविले पाहिजे. बहुत लोभ आसो दीजे. हे आसीर्वाद.

*¶Chimnaji Damodar requests Chimaji Appa to take into service Kusa Ganesh, his own servant for a long time.*

---

१ प्राप्त. २ पडमूत – डबघाईस आलेलें, नादान.

*No. 20]* *[1728?*

**श्री**

**राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान गोसांवी यांसी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. भिकाजी सिंदे यांजकडील पत्र आले तें व आपले पत्र पाठविले त्याजवरून वर्तमान अवगत जाले. अनर्थास मूल मुलीहूनच जाले आहे, यांत पाहावे. येत्न साध्य करावयास त्यांजकडे सभ्य मनुष्य पाठविले आहे. देहावर आणून विचार सांगणार येसेच पाठविले आहेत. सांप्रत आपण कोणे जागा आहेत, कोणे मार्गे येणार, परकीयांकडील बातमी सांप्रत येका दो दिवसांत कांही आली असेल तें व आपला विचार सविस्तर लिहिला पाहिजे. त्याप्रा आम्ही विचार करून सुमुहूर्ते कूच करून बाहेर आलो. पूर्णिमेनंतर येथून कूच आहे. कळले पाहिजे. छ १३ सफर. बहुत काये लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

० श्री ✓
राजा शाहू स्वामि
छत्रपति खंडेराव
दाभाडे सेनापति

¶*Khanderao Dabhade to Bajirao, promising to start with his armies.*

---

*No. 21]* *[1728?*

**श्री**

**राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान**
**गोसावी यांसी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे व राजश्री नरसिंहपंत व राजश्री माणकोजी * * * * (वायेसे) याचे भेटीनंतर येथील वृत्त व शरीरभावना कळली असेल. प्रस्तुत आपणांकडील भिकाजी शिंदे मौजे कोरेगाऊ परगणे पुणें येथं येऊन कदमाकडील लोकांसी व रयेतीस उपसर्ग

देतात. वडगावीं कुळें धरून नेऊन हाणमार करून रुपये लाविले आहेत. गतवर्षापासून आपणांस आम्ही सांगितलें कीं तेथें ठाणें न ठेवावें; परंतु चितास न आणितां सांप्रत शिंदा पाठविला. काय म्हणावें ? आत:पर तऱ्ही त्यास पत्र पाठऊन ठाणें उठवावें. लटिका धंदा आपण चितांत आणावा यैसें नाहीं. जाणिजे. रवाना छ ११ जिलकाद. बहुत काय लिहिणें कृपा आसो दिल्ही पाहिजे हें विनंती

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade remonstrates with Bajirao on the high-handed action of the latter's adherent.*

---

*No. 22*] [*1728?*

छ २९ जिल्काद

**श्री**

**पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडितप्रधान गोसांवी यांसी**

विनंती उपरी. गतवर्षी ज्या मनसबियाचे उदेशें इतलाखी फौज ठेविली त्यास तो विचार अवघाच येकीकडे राहून जो प्रसंग जाला तो आपणास विदित आहे. चिरंजीव राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे सेनाखासखेल तों आपणासमागमें होते, पावले न पावलें हें कळले आहे. तेंसेच साताराचे मुकामी नेहमी राऊत होते त्यास कांही पावलेंच नाही. चिरंजीव राजश्री कृष्णाजी दाभाडे यांसमागमे फौज देऊन उतरेकडे पाठविले. त्याचीहि समाजाविसी जाली नाही. येवंच अवघी समजाविसी हातावर करावी येसे प्राप्त जालें. अगत्यास्तव लिहिणे लागलें. तरी य वोढीचे प्रसंगास तूर्त पनास हजार रुपयेपावेतो पाठविले पाहिजेत. पुढे आपले आमचे भेटीनंतर भलते विचारे निर्वाह करून देविला जाईल. परंतु तूर्त अनमान न करितां लिहिलेप्रमाणे येत्नपूर्वक अगत्य अगत्य पाठविले पाहिजेत. जाणिजे. छ २२ जिल्काद. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Dabhade (Khanderao?) to Bajirao: requests a supply of funds to pay troops with.*

1082

No. 23] [Before 1729 ?

छ ४ जिल्हेज

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
गोसांवी यासि

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिलें पाहिजे विशेष. राजश्री स्वामीकडील निकडीची आज्ञा आली. त्याजकरितां तेथे जाऊन येका दो दिवसांत सर्वानुमते विचार आचार करणें तो करून, सोमवारी दोनी प्रहरा पुणियास आलेत. दरबारचा प्रसंग आवघा आम्हास कलावा, याजकरितां पत्र लेहून पाठविलें. प्रविस्ट होऊन वर्तमान विदित जाले. पुढें कूच करायाचा विचार व आणीक विचार कर्तव्य तो आपले आमचे भेटीनंतर करावा लागतो. राजश्री चिमाजीपंतहि समागमे आले आहेत. आपणाकडून राजश्री माणकोजी बायेसे यांस पाठवावे. तदनंतर दरबारचे वर्तमान त्यांजपासी सांगोन, भेटीचा विचार करणे, तो करून, आपणाकडे पाठवितो. तर सत्वर रवाना करावे, म्हणून लिहिले. त्याजवरून कालीच रवाना करावे तर, वैधृती होती. आजी रात्री त्रिंबक जिवाजी व मारनिले आपणाकडे पाठवितो. येतील. जो विचार केला असेल, तो उभयेतांस सांगावा. आपले विचाराविरहित आमचा विचार नाही. दुसरी गोष्टी आपण लिहिली कीं, राजश्री

[शिक्का] स्वामियासी तुमचेबारचे आम्ही, च्यार गोस्टी विचाराच्या सांगोन, राहावयाचे आज्ञापत्र वार्तिकासमागमे मागून येईल म्हणोन लिहिले. तर हे गोस्टीचे अपूर्व नाही. तुम्ही प्रसंगी आसलेस म्हणजे आम्ही आहो. आम्ही आहो तेथे तुम्हीच आहा. परस्परें येकमेकाचे न्यून न दाखवावें, यातच लौकिक आहे. त्याप्रमाणे आपण केले. उतम गोस्टी केली. उभयेता मारनिलेचे भेटीनंतर सविस्तर कलेल. जाणिजे. बहुत काये लिहिणे, कृपा आसो दीजे. छ ४ मोहरम हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade proposes a personal meeting to Bajirao and assures him of his cordial help. It seems their disputes were settled by Shahu.*

No. 24] [Before 1729?

श्री.

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

गोसावी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराऊ दाभाडे सेनापती दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करवीजे विशेष. राजश्री कालोजी भोंसले यांजकडे बाबतीचा यैवज पा भामेर व पा वणी रुपये साडेसा हजार आहेत. त्यास येक हजार रुपये सदरहूपैकी तकूब ठेविले पाहिजेत. आपली आमची भेट होईल, ते समई आम्ही हजार रुपयाचा निकाल करून देऊ. बरकड यैवज वसूल होईल. रुा

४००० पाा भामेर रुा ५००० पाच हजार पैकी तकूब १००० येक हजार ठेऊन, च्यार हजार रुा घ्यावे.

१५०० पाा वणी.

---

५५००

येकूण पांच हजार पांचसे रुपये वसूल देतील. येक हजार रुपये राहातील. त्याचा निकाल करून, आम्ही देऊ. माारनिलेस हजार रुाच्या तगादा न होये, ते केलें पाहिजे. बहुत काय लिहिणे? छ १२ रविलावल.

मोर्तब सुद.

¶*Khanderao Dabhade requests Bajirao to allow a remission of one thousan rupees to Kaloji Bhosle. (Does this Kaloji Bhosle belong to the Nagpu family?)*

---

No. 25] [Before 1729

छ १६ जिल्काद मुाा सातारा.

श्री

राजश्री अंबाजीपंत गोसावी यांसी.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेाा खंडेराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष. राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यांचे आमचे बोलीचे मध्यस्थीस तुम्ही आहा. बोलिले

वचन सत्य करून आले वसुलाची बाकी पाठविली पाहिजे. वरचील पंडित मारनिले यांच्या पत्रावरून कलेल. बहुत काय लिहिणे ? कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Khanderao Dabhade to Ambajipant Purandare, alluding to the adjustment of the writer's dispute with Bajirao.*

---

*No. 26]* *[Before 1729?*

छ ९ जिल्हेज

## श्रीशंकर.

**राजश्री बाजीराव पंडितप्रधान**
**गोसावी यासी.**

ℰ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य प्रतीपूर्वक सौभाग्यादिसंपन्न उमाबाई दाभाडे दंडवत विनती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे. काा कडूसच्या कारभारां इमानपूर्वक प्रमाण करून कबूल केले की आपण पत्र करून देतो. त्याजवरून आपणाकडे रंगो लक्ष्मण व खंडोजी घोरपडे पाठविले. परतु पत्रे निखालस करून न दिल्ही. याजवरून बोलीचे प्रमाण पुरते दिसोन आले. हे गोस्टी करावी यैसे नाही. जे बोली बोलल ते वचनप्रमाणें काा मजकूरची पत्रे करून पाठऊन देणे. अपल्या चितात नसल, केले वचने सेवटास न न्यावे यैस असिले तर, पस्ट उतर पाठवणे. आपण वारंवार लेहावे, आपण भिडस्त, मान्य करून सेवटी न करावे याजमधे उचित नाही. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Umabai Dabhade rebukes Bajirao for not keeping his word. It should be noted that in spite of the fact that her husband is living this lady takes a notable part in political controversies.*

## श्रीजयति

अपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती. स्वामीचा निरोप राजश्री रामचंद्र मल्हार याजबरोबर आला कीं फौज रजपुतांची घेऊन यावेसें असिलें तरी दो दिवस राहून आपण फौज घेऊन येऊं, तुम्ही महमदाबादेस[1] फौज आहे ते बराबर घेऊन गांव लेहून पाठविले तेथें जाऊन दाणापाणी लस्करास करणें. नाहींतरी याच म्हणाल तरी रातोरात लेहून पाठवणें. आपण लस्करांत येऊन फौज मागाहून जे येणें ते येईल म्हणून आज्ञा सांगोन पाठविली. यैशास, फौज बराबर सारी घ्यावी हे गोष्ट उत्तम, परतु फौज येते ते भारी आहे नाहीं हें कलतच आहे; अगर खासा तऱ्ही येतो तरि तेंही नाहीं आणि लस्करची गत कांहीं ल्याहावीसी बाकी राहिली नाहीं. यैसी गोष्ट असतां स्वामीनी फौज आणायास दोन दिवस च्यार दिवस म्हणून गुंतोन राहावेसें नाहीं. रजपुतांची फौज बगर सिमगा जाल्याखेरीज निवते यैसें नाहीं हे स्वामीसही विदितच आहे. त्यास राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे आमचे विचारे येकच विचार कीं शत्रूवरी जाणें अगर भलताहि विचार करणें तो आपले कुवतीवरी आहे. पुढें पडीचे दिवसांत होतोसें नाही, यास्तव तेथें त्यासी त्वरेनें फौज पाठवासी बोली करून राजश्री बाबूराव[2] यास ठेवावें आणि स्वामीनी लस्करांत यावे. महमदाबादेची फौज जे असेल ते बराबरी घ्यावी. स्वामी लस्करांत आलियावरी जो विचार कर्तव्य तो करून शत्रूवरी जाणें तरी जाऊं अगर प्रवासांत च्यार दिवस राहाणे तरी राहूं. परंतु आपण तेथें राहावेसें नाहीं. सर्व कारभार आपले जोरीयावरी आहे आणि केवळ त्यांची निसरसांडहि करावीसें नाहीं. यास्तव त्याजवल येकजण ठेऊन आपण लस्करास यावें. महमदाबादेची फौज बरोबर घेऊन जें कर्तव्य तें करावें हें उत्तम आहे. आम्ही उदईक सोमवारीं महमदाबादेवरी येऊन राहतों. स्वामीनी तेथें जो ठेवणें तो ठेऊन हे फौज बरोबर घ्यावीसें करून उदईक लस्करास यावें. येथें आलियावरी पुढें जो विचार कर्तव्य तो करून. परंतु उदईक लस्करास आलें पाहिजे. +राजश्री बाबूजी नाईक व राजश्री बाजी भिवराव यास स्वामीचे आज्ञेवरून बोलाऊं पाठविलें असे. खंबा-

---

१ अहमदाबादेअलीकडे. २ अंताजी मल्हार वर्वे, बाजीरावाचा मामेभाऊ.

+ येथून अक्षर खुद्द चिमाजीचें.

इतचे साठ हजार वसूल जाले ते आले. याउपरी होत नाहीं. ढवलकियाचे गिरासीयाचे साडेसतेचालीस हजार करार केले होते त्यांपैकीहि येक रुपया वसूल जाला नाही. हे विनंती.

¶*Chimaji Appa to Bajirao, referring to the campaign in Gujarat. Both the brothers are camping near Muhammadabad.*

---

*No. 28*] [*27-3-1728*<br>[*16-3-1729 ?*

**श्री**

राजश्री अंबाजीपंत तात्या गोसावी यासी सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मी-आलंकृत राजमान्ये श्नेहांकित उदाजी पंवार दंडवत विनंती उपरी. येथील जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. येक दोन पत्रें आपणाकडे पाठविली. याचे उतर छ २६ साबानी मौजे निखाली पाा झाबवा येथे पावले. आलीकडे वर्तमान, कंठाजी बांडे लोणवाडीयावर आले. दाहोदेस शामजीपंत कमावीसदार कंठाजीकडील आहे, त्यास लिहिले कीं आपण लस्करसहवर्तमान येतो, तरी तुम्ही गावंगना ताकीद करून गुरेढोरे येकीकडें लावणें म्हणोन वर्तमान तत्वता आले म्हणोन आपणास लिहिले असे. उदैक आपला मुकाम दोहदेनजीक होईल तरी आपण यावयाचा विचार करून अविलंबे आले पाहिजे. याउपरी विलंब यावयास सर्वथा केला न पाहिजे. आम्ही मार्ग लक्षीत असों. पिलाजी गायेकवाड डबईवर आहे. मोर्चे लाविले आहेत. जेर केली आहे. विदित जाले पाहिजे. हे विनंती.

(मोर्तब सुद)

¶*Udaji Pawar to Ambaji Purandare, both in Gujarat.*

---

*No. 29*] [*17-3-1729*

**श्रीशंकर**

राजश्री अंबाजीपंत तात्या गोसावी यांस श्री सकलगुणालंकरणं अखंडितलक्ष्मी-अलंकृत राजमान्य श्नो. उदाजी पवांर दडवंत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. काली छ २६ साबानी पत्रें आपणाकडे रवाना केली. त्यास आजी कूच करून दोहदेनजीक जावयाचा सिधांत

होता. त्यास कंठाजी कदम याचे खबरीस माणसें पुढे पाठविली होती ती आली. यानी वर्तमान सांगितले कीं कंठाजी कदम लोणवाड्यावरी होता. त्यास आम्ही आपणापासून निघालो तेसमयी त्याची वातमी होती. त्यानी तेथे खबर नेली कीं उदाजी पवार दोन हजार सडी फौजनसी निघाले त्यावरून लोणवाड्याचे मोर्चे काढून आजी छ मारी कूच करून दोहदेवर येणार. पुढे आमचे वर्तमान तत्वता मनास आणून आम्हांसी गाठी घालावी हा सिधात तेथील जाला आहे. यास्तव आम्हीं आजी येथेच मुकाम केला. पुढे आमचे वर्तमान मनांस आणून तो तत्वता गाठी आम्हासी घालितो यांत संदेह नाहीं. आणीकही माणसे वातमीस रवाना केली आहेत. त्याची सडी फौज आठ दाहा हाजार आहे. पिलाजी गाईकवाड डबईवरच आहे. त्यासहि वर्तमान आम्ही आलो येसे लिहिले आहे येसे वर्तमान तत्वता एका भल्या मनुष्याने वातमीवरावरी सागोन पाठविले. आपणहि कूच करून राजगडानजीक आले म्हणोन चिरंजीव राजश्री आंनदराऊ याणी लिहिले त्यावरून कलो आले. तरी आपण याउपरी सडी फौज दाहा हजार घेऊन पुढे चालतात तरी गाठी पडोन ईस्वर येश देतो. ये गोष्टीस येका दिवसाचा विलंब करावा येसे नाही. याउपरी तिकडील वर्तमान आम्हांस येऊन आम्हीं आता आपल्यास ल्याहावे येसी सवड नाही. संधीचा विचार आहे. वहुत काये लिहिणे ? कृपा आसो दील्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Udaji Pawar to Ambaji Purandare, who was with Chimaji Appa in Gujarat, describing the movements of Kanthaji Kadam Bande in the vicinity of Dohad.*

---

*No. 30*] [*17-3-1729*

छ २८ शाबान

**श्री**

सहस्त्रायु चिरंजीव राजमान्य राजश्री आनंदराऊ पवार यासी प्रति उदाजी पवार आसीर्वाद उपरी. आम्ही ता॥ छ २७ साबान कुशल आसो. यानंतर आजी बातमी कंठाजी कदम याजकडील आली. त्यास वर्तमान सांगितले की, कंठाजी लोणवाड्यावरी होता. आम्ही जेव्हा निघालो तेंव्हा बातमी आम्हापासीच

होती. त्यानी खबर त्यास जाऊन सांगितली कीं, उदाजी पवार सडी दोनी हजार फौज घेऊन आला. त्यावरून लोणवाड्याचे मोर्चे काढून थोडा बहुत पैका घेऊन आजी छ मारी दाहोदेस दाखल होणार. आठ दहा हजार सडी फौज. त्याचा सिधांत विचार हा आहे कीं खानखा आम्हांसी गाठी घालावी. आम्ही आजी कूच करुन दाहोदेनजीक जात होतो, तो यैसी बातमी आली. याज-करिता मुकाम केला. परंतु तुम्हाकडे खबर पाठवावी हे सवडी दिसत नाहीं. तुमचेंहि पत्र आजी आले कीं राजगडानजीक मुकाम आहे. तरी तुम्ही राजश्री तात्या यांसी पत्र पावताच जाऊन त्यांस बहुत प्रकारे सांगोन कूच लाब लाब मजली करवणे. आमझरे व धार येथील कार्य असेल तरी राजश्री पिलाजी जाधव यांस तेथे ठेऊन सडी फौज तुम्हीं आठ दाहा हजार घेऊन पुढे चालणे. मागे बहुत कार्य होईल. दों ती मजलीचा कारभार आहे. ये गोष्टीस विलंब न करणे. ईस्वर येश खानखा देतो. यैसे सांगोन पत्र पावताच हे तजवीज करणे. त्याची तो नजर आम्हावरी घाटी घालावी यैसे आहे. हे वर्तमान तेथील येका भल्या माणसाने सागोन पाठविले. याउपर खबरीची वाट न पाहाणे. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

मोर्तब
सुद.

¶*Udaji Pawar after informing Anandrao Pawar of the movements of the armies tells him that Kanthaji Kadam intends to meet him. Udaji therefore asks him to proceed by forced marches along with the forces of Pilaji Jadhao.*

---

*No. 31*] [*28-4-1729?*

## श्री

### राजश्री पंतप्रधान गोसांवी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र छ ७ सवाली पाठविले ते छ १० सवाली मौजे वाघोलीचे मुकामी पावोन सविस्तर वर्तमान राजश्री अंबाजीपंताचे पत्री लिहिले होते ते कलो आले. फौजेसहवर्तमान जुनराभोवते राहून धिराजी पवार बाहेर न निघे यैसें करणे व लोकाची समजावीस करणे. आपणास राजश्री सेना-

पतीच्या अडामुळें च्यार दिवस राहणे जाले; सत्वरीच येऊन म्हणून लिहिले. यैसियास फौजेचा विचार, गंगथडीस येताच वैरण नाही यामुळे तमाम लोकानी निरोप घेतले. त्यास राहवावें तरी पोटास दिल्हे पाहिजे. वैरणीची तो काडी न मिळे याजकरितां निरोप दिल्हे. समजावीस करावी परंतु आपली भेटी जाली नाही. भेटी घेऊन आपले आज्ञेप्रमाणे समजावीस करावी यामुळे समजावीस राहिली. आपली पत्रे लोक गंगथडीपासून गेलियावरी येक मुखेईचे मुकामी आलें, दुसरे गावास आलीयावरी आलें. राजश्री अंबाजीपंत सातारियास येत होते त्यास न येणे म्हणून आज्ञा जाली, यास्तव सासवडी राहिले आहेत. याउपरी आपली आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. विशेष काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao to Bajirao, proposing to proceed to wherever he may be ordered.*

---

*No. 32*] [*22-5-1729*

## श्रीजयति

### अपत्यें चिमाजीनें साष्टांग नमस्कार विनंती.

येथील क्षेम तागाईत छ ४ जिलकाद मुकाम मौजे सावली नजीक पायागड येथास्थित असे. विनंती : आम्ही विरमगावापासून माघारे फिरलों. सरबुलंद-खान यार्णी भेटीस यावेसें केले होते. राजश्री आनंदराऊ पवार तेथें गेले. त्याजवळ करार केला होता; परंतु त्याचें लोकांनीं गवगवा केला म्हणून ते न आले, म्हणून भेटी राहोन ढवलके पेटलोदकडे आलों. पुढें पावागडाकडे येतो म्हणून पूर्वी येक जोडी रवाना केली ते प्रविष्ट होईल. त्याजवरी प्रस्तुत किले पायागडासमीप आलों. याउपरी येथील बेगमी आधीं करावी, पुढें राहावेसा विचार राजश्री आनंदराऊ पवार याचे विचारें आहे. राहिल्यानें पुढ मुलूक आमचा, गडचा उपरालाहि राहातो; परंतु पोटास पाहिजे, त्यास यंदा रुपय मिळाला नाही. कर्जदार दिवाण लोकांची समजावीश, तिन्ही गोष्टी वाराव्यास पैका जथला नाही; याजकरितां दोहींकडून संकट आहे कीं, राहावें तरी पोटार

---

१ ताळुके शिरूर.

पाहिजे, न राहावे तरी मुलूख आपले हातचा जातो, याजनिमित्यें येथें हाली आहो. आधीं गडची वेगमी करून मग दुसरा विचार करावा म्हणून येक दोन मुकामे करून जो विचार कर्तव्य तो करून निश्चयेंरूप वर्तमान विचार जो लिहिणें तों मागाहून लेहून पाठवितों. सवाईजी तो मुकुंददरियाकडे गेले. अभयसिंग आपले जागियासच आहेत. आम्ही अभयसिंग राणाजी सवाईजीकडे पत्रें पाठविली व चिंतो गिरमाजी राणाजीकडे पाठविला आहे. त्यांजकडील मनसबा काहीं यंदा कार्यास येतोसें नाही. वरकड वर्तमान राजश्री दादोरायानी पूर्वी आपणांस लिहिलें आहे, त्यावरून कळेल. वरकड पुरवणी दादोरायांनी आम्हास लिहिली ती पाठविली आहे ती सविस्तर पाहावी आणि तेथें गृहस्थ गेले त्यांस च्यार महिने हरयेक तह न देता थोपून राखिले पाहिजे. राजश्री बाबूजी नाईक यांजवळ रुपये २५००० पंचवीस हजार देऊन औरंगाबादेस रवाना केले ते राजश्री बाबूराव वकील यांजवळ पाठवितील ते स्वामीकडे रवाना करितील. सेवेसी विदित जालें पाहिजे. +बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji Appa to Bajirao, referring to his doings in Gujarat and dealings with Sarbulandkhan and the Rajput princes.*

---

*No. 33*] [*1729 ?*

(पहिला बंद गहाळ) २

समीप आला आहे. कागदपत्रावर सिके जाले पाहिजेत हा अर्थ चितात आणून स्वामीच्या घरास दसऱ्याचे दिवसी अथवा अगोधर आले, आणि सिके कटार स्वामीचे हाती देऊ लागले, तर जिल्हा मामला गुजरात दिल्ह्याखेरीज होत नाही. सिके करून मात्र तुम्हापासी बसून राहू. हती द्यावयाची गोष्ट तो मान्य न करितां सिके कटार दिल्ही तर घ्यावी. फौजा तो रवाना करून मुलूख पालथा घालावाच म्हणजे सहजेच डोले उघडतील. परंतु अंहेवदोरा[१] हातास येऊ लागला तर टाकावा येसे नाही. दोप्रहरा सुभेदारास जो विचार सुचला तो आम्हास सांगितला. त्यावरून पत्र लिहिले आहे. परंतु आमचे विचारे हती द्यावे गड द्यावा; मोबदला गुजरातेचा नाही. इतके नसता समजावे येसे नाही. हती गड न मागता सिकेकटार दिल्ही तर रुसव्याची गोष्ट बोलतच असावी. परंतु सिकेकटार घेऊन फौजाची रवानगी करावी. काल सुभेदारास जो विचार

---

\+ येथून अक्षर लेखकाचें.

१ गळसरी, मालमत्ता (आलंकारिक).

सुचला तो त्यानी सागितला त्यावरून लिहिला आहे हे विनंती. नेर गालणा निंबाईत येथील जमीदाराचे हातचा हिसेब पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास निंबाईत गालणियाचा हिसेब पहिले पाठविला आहे. त्यात गालणियाचा हिसेब जमीदाराचे हातचाच आहे. निंबाईतचा जमीदार कोणी हिसेब व्यावयाजोगा रुजू होत नाही. जो वसूल आला तो मात्र घेतला आहे. नेरचा जमीदाराचे हातचा हिसेब सासवडास आहे तो आणविला आहे. मागून पाठवितो हे विनती.

¶*The handwriting of this letter, of which the first sheet is missing, is Chimaji Appa's and it appears to be addressed to Bajirao in connection with the assignment of Gujarat—about which there was a dispute with the Dabhades, at the Court of Shahu.*

---

*No. 34*] [*1729 ?*

पौ छ १९ जाकर

श्री

पुरवणी राजश्री राऊ

स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. सोमाजी सोनवणी निरवीकर राजश्री उदाजी चवाण याकडे चाकर आहेत. ते नालबंदीबद्दल सातारियास आले आहेत. त्याकडे कृस्णार्जी दिवेकर वस्ती मौजे वरवड ताा पाटस याणे जबानी वर्तमान सांगितलें की बांडे व मल्हारजी होलकर राणोजी शिंदे यामधें युध्य जालें. बांडे मोडून रनाली यामध्यें घातलें म्हणून माणूस पाटसामध्यें आलें, म्हणून वर्तमान सागितलें खरें लटकें कलत नाहीं. याकरितां स्वामीकडे तत्वता वर्तमान येईल तें लेहून पाठविलें पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती+.

¶*Bajirao is informed that Sindia and Holkar have attacked Bandey who consequently had to seek the protection of the walls of Ranala.*

+ पत्र बाजीरावास.

No. 35] [1-1-1730 ?

छ २२ जमादिलाखर

**श्रीआईआदिपुरुष**

विनंती उपरी. राजश्री त्रिंबकराऊ दाभाडे व यासमागमेचे सरदार यास हुजूर दर्शनास आणावयास हुजरे पाा आहेत यासी रुपये

| | |
|---|---|
| त्रिंबकजी सावळे १ | माहादजी कराडकर १ |
| तानाजी पांढरे १ | शामजी चवाण १ |

चौघेजण पाा आहेत यासी रुपये

| | |
|---|---|
| १० त्रिंबकराव सेनाखासकेल | ५ जाऊजी दाभाडे |
| १० कृष्णाजी दाभाडे | ५ कृष्णाजी पवार |
| ५ कालोजी भोसले | ५ माणकोजी वायेसे |
| २५ | १५ |

येकून चाळीस रुपये लेहून देविले पाहिजेत हे विनंती

¶*Before the battle of Dabhoi on 1st April 1731 in which Trimbakrao Dabhade was killed, Shahu seems to have made an attempt to conciliate him by sending him special messengers, as indicated in this paper, to bring him into his presence at Satara.*

---

No. 36] [30-1-1730 ?

छ २१ रजब

**श्री.**

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी पोष्य वासुदेव जोसी सां. नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. ये प्रांतीचे वर्तमान सेवेसी पुर्वी लिा. आहे. यैशास दाभाडियाचा उपद्रव मावलास बहुत लागला आहे. सांप्रत वर्तमान ऐकीतो की दाभाडे फौज कल्याण भिवंडी प्रांतातून कोलवण फिरंगण प्रांते पाठवणार आहेत. त्याची फौज आली म्हणजे हा मुलूक पायमलीखालीच उठोन जाईल. आम्हाजवल राऊताचा जमाव आहे तो स्वामीस विदित आहे. कळावे म्हणून लिा असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Wasudeo Joshi to Chimaji Appa, complaining of Dabhade's activities in the Konkan.*

1093

No. 37] [पो 26-2-1730 ?

छ १९ सावान

**श्री**

पुरवणी राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व नारप्रभु याची पत्रे हूजूर राजश्री स्वामीस आली कीं माहाराजाचे आज्ञेप्रमाणे आम्ही उभयेता फौजसहवर्तमान फतेपुरास गेलो. राजश्री उदाजी पवार याची भेटी घेऊन त्याची समजावीस करून आम्ही त्रिवर्ग येकत्र होऊन गुजराथ प्रांते जातो म्हणून पत्रे पाठवीली आणि राजश्री उदाजी पवार याणीही राजश्री स्वामीस विनंती पत्र पाठविले कीं आपण येकनिष्टपणे सेवा करितो माहाराजानी ऊर्जित केले पाहिजे म्हणून पत्रे पाठविली. उमाबाई रनालीयास आली होती. कदमाची समजावीस करून मागती नवापुराकडे गेली. राजश्री स्वामीच ऐवज गुदस्ताचा रवाना केला. चांदवडपावेतो पैका आला म्हणून वर्तमान आले आहे. विदित जाले पाहीजे सेवेसी श्रुत होये. हे विज्ञापि.

¶*Purandare to Bajirao, informing him of the reconciliation of Udaji Pawar and the movements of Umabai Dabhade.*

---

No. 38] [28-5-1730 ?

**श्री.**

राजश्री जेठीबोर ठाणे गजरे गोसांवी यांसी अखडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्नो. विसाजी भास्कर किले पावागड आसीर्वाद विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. गोसांवीयांकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाहीं तरी सविस्तर लिहिणे. यानंतर राजश्री पंत स्वामीकडील पत्रे मागे गोसांवीयानी पाठविले ते पावले. त्याआलाकडील वर्तमान कांहींच कलत नाही. तरी लस्कर कोठे आहे काये देशास गेले किंवा आलीकडे[1] कोठे आहेत, हे सविस्तर लिहिणे व महीपलाकडील ठाणीठुणी जांगा वजागां आहेत. राजश्री नारायेण जोशी व राजश्री बाजीराऊ वासुदेव आमदाबाजेस आहेत. त्यास ठाणे मजकुरास यावयाची आज्ञा जाहली होती. त्यास आले की नाहीत, त्याजकडील काये वर्तमान, ते व राजश्री पिलाजी गायकवाड व कंठाजी कदम व उदाजी आनंदराउ पवार हे कोठे आहेत, हे सविस्तर लिहिणे. किले मजकूरचे वर्तमान तरी आजी ताा सुखरुप आहो. आम्हाविसी कांहीं

१ अलीकडे.

फिकीर न करणे. राजश्री पंत स्वामीची आज्ञा आम्हास आहे कीं, जे कामकाज लागेले ते तुम्हास लिहावे. त्याचा सरंजाम सर्व तुम्ही ठाणे मजकुराहून करावा, म्हणून आज्ञा आहे. यैसीयास येथील सर्व सरंजाम गोसांवियासी करणे लागेल. काही खर्चाची वेगमी केली पाहिजे. वहुत काये लिहिणे, कृपा असो दिजे. रा. छ २१ जिल्काद हे विनंती.

¶*Visaji Bhaskar, killedar of Pavagad, writes to Jethibor inquiring of Bajirao's movements and asking for provisions for the fort.*

---

*No. 39]* *[12-11-1730*

**श्री**

अपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १२ जमादिलौवल यथास्थित असें विशेष. स्वामीनी दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्रीच्या चित्तांत गुजराथेच्या सनदा अथवा सहीचीं पत्रें करून देऊन दाभाड्याचा आपला कजिया लावावा यैसा अर्थ आहे. यैसियास सनदा अगर सहीचीं पत्रें दिल्हीं आणि कांहीं पैका मान्य करा, यैसें म्हणूं लागले तर, पैका मान्य करावा किंवा न करावा, सनदा अगर सहीचीं पत्रें द्यावीं कीं न द्यावीं, याचा विचार काय तो लेहून पाठवणें म्हणून लिहिलें. ऐसीयास, हंगाम वसुलाचा गेला. आगदीं वसूल मुलकांतील पिलाजीनें घेतला. याकरितां पैका मान्य करणें तो विच्यारें करून थोडाबहुत करावा. वरकड दाभाड्यांनीं कजिया केला तर तो आम्ही संभाळतों; त्याची फिकीर आहे यैसें नाहीं. परंतु जर ते निजामास जाऊन भेटले तर परिछिन्न त्याचा हुद्दा दूर करावा येवढी गोष्ट मात्र राजश्री शीं खरी करून ठेऊन सनदा देतील त्या मान्य कराव्या. पैका तों ये वर्षी हातचा गेला; परंतु नक्षाची गोष्ट आहे याकरितां मान्य करावें. आतां आमची फौज पांच सात हजार ते प्रांतें गेली तर त्याच्या फौजानीं येऊन आमचे फौजेपुढें उभे राहावते ऐसें नाहीं. याकरितां सनदा करून दिल्यातर कबूल कराव्या ऐसें आमचे विच्यारें आहे. यांत स्वामी वडील आहेत, हें विनंती+.

पैवस्ति छ १३ जमादिलौवल संध्याकाळ

¶*Chimaji to Bajirao, referring to the recovery of dues in Gujarat and a possible conflict with the Dabhade.*

---

+ सबंध पत्र चिमाजीच्या हातचें.

No. 40] [18-11-1730

**श्री.**

राजश्री चिमाजीपंतआपा साहेबाचे सेवेसी,

ऽ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंक्रुत राजमान्ये राजश्री श्वों मल्हारजी होलकर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल तागाईत कार्तिक वदी ५ मुा रजाणे स्वामीचे कृपादृष्टींकरून येथास्ति (त) आसें विशेष. वार्तिकासमागमें पत्रें आली त्यावरून आपण फौजेंनसी मुहूर्ते कार्तिक वदी २ कूच केले आहे. जमाव करीत आहों. कोणी लोक जमा होताती, कोणासी पत्रे पाठविली आहेत. तेहि जमा होतील. त्यासी आपण धुळे सोनगीर प्रांते येतो. साहेबाची आपली भेटी तेच स्तली होईल. व देसीची फौज तो तुम्हासमागमेच गोविंदपंताबराबर येईल. वरकड वर्तमान तरी आमित्र उभयेता खोपलीकडे गेले. निमे पिलाजी गायेकवाड राजपिपले येथे गेले. श्रुत होये. तुम्ही पत्र पावताच आति सत्वर येणे. आनमान करावयाचे कार्य नाही. चारी दिवसी मुलू(क)गिरीचे निघोन गेले हे तो स्वामी जाणतच आहा तेथे विस्तार लिहिणे लागत नाही. सूज्ञ आहा. बहुत लिहिणे नलगे. परंतु आति सत्वर फौजेनसी आले पाहिजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Malharrao Holkar to Chimaji Appa, advising the latter that he will join him at Dhulia Songir.*

---

No. 41] [27-11-1730]

**श्री**

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती सेवक नारो गंगाधर कृतानेक सा सनमस्कार विनंती. येथील क्षेम ता कार्तिक वद्य त्रयोदसी मुा साखरी प्रा भामेर येथास्थित असे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते बारावे रोजी सोनगडास पावलो. मार्गीच सेनापतीचीहि भेट घेतली. आज्ञेप्रमाणे सविस्तर वर्तमान व पत्रे निवेदन केली. त्यास बहुत समाधान पावली. आपण राजश्री पंताचे भेटीस येणे, भेटीनंतर जे आज्ञा करितील ते प्रमाण, येसे मान्य केले. गायेकवाडास पत्रे दिल्ही. त्यानी उत्तरच लिहू दिल्हे तेच

वोजिनस सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित होईल. वरकड वर्तमान दरशनांती निवेदन करून. मुख्य गोस्टी मातुश्री उमाबाईचे चिती की येदा आपणास स्वारी समागमे रा पंती न्यावे. सेनाखासखल हे पद साताराहून करून आणवावे. खर्चवेच बसल तर राजश्री पंताचे आमचे विचारे होईल तो मान्य करावा, आणि आपली बंदोबस्ती करून फौजासहत आपणास न्यावे येसे म्हणतात; आणि दरशनानिमित्य सोनगडीहून स्वार होऊन साखरीस आली. कृष्णाजी दाभाडे रनालियास बांडियास आणावयानिमित्य गेले. येका दो दिवसी बांडे भोसले समजावून त्यास घेवून स्वामीचे रोखे येणार. स्वामीची स्वारी कोणते मार्गे होईल ते आज्ञा करावी. याचे ठाणी व पागा दोन अडीचें घोडे आवजी कवडे यानी घेतली, म्हणून श्रमी फार आहे. सेवेसी श्रुत होय ये विनंती.

¶*Naro Gangadhar Mujumdar to the Peshwa, giving details of his mission to Dabhade and his attitude.*

---

*No. 42*] [*2-12-1730*

**श्रीराम**

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव तथा राजश्री चिमाजीपंत यास प्रीतिपूर्वक नारो राम कृतानेक विनंती. येथील कुशल मार्गसिर्ष सुध चतुर्थी बुधवार जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. वार्तिकासमागमे लोहनेरचे मुकामीहून पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं. लस्करसहवर्तमान आपणांस जाणें लागलें तो प्रसंग व पुढील कितेक विचार विस्तारें लिहिला व लोहनेरचें वर्तमान लिहिलें तें कलों आलें. अशास तुम्हीं त्याप्रांते त्वरनें जाल असें नव्हतें. याकरितां आम्हीं राजश्री स्वामीपासून तलेगावास आलों. तुमची आमची भेटी होऊन विचारें होईल तें करावें असा प्रसंग होता; परंतु तिकडील विचारामुलें तुम्हांस जाणें प्राप्त जाहालें. आम्हीं येथें आल्यानंतर येथील वर्तमान मनास आणितां यांचा दुराग्रह विशेपच दिसोन आला. पुरातन जें आहे ते येक खेडें उणें न होतां आमचें आम्हांकडे देऊन शेवा घ्यावी, हा बायांचा मुदा. ये गोष्टीची उदासीनता करून जावें तरी गर्गशा तुरूतच वाढणार. राज्यांतील मऱ्हाटे चौघे चौंकडे गेले, राहिले त्यांसही घालवितात हें निमित्य उत्तम नव्हे. याकरितां यांस आम्हीं सांगणें [१] सागोन धण्यापावेतों न्यावें हा उपाय करीत होतों. परंतु यांचे कोणी समागमें येत नाहीं. लोहनेर व इत्यादिक तिकडील

---

१ खुद्द. जसेंच्या तसें.

खेडियांचीं वर्तमानें यैकोन विशेषच संतप्त होतात. तुम्ही तों दूर लांबलेस. आम्ही येथें येऊं येथील मनसुबा द्रष्टीस पडोन विचार प्राप्त जाहला. राजश्री अंबाजीपंतहि समागमें होते. गर्गशा वाढल्यानें राज्याच्या मनसुबियास उपयुक्तता नव्हे. तुमची भेटी होती म्हणजे हरयेक विचार करून निकाल काढिला जाता. तो प्रसंग राहिला. तेव्हां राजश्री कृस्णाजी दाभाडे यांस समागमें वेऊन राजश्री स्वामीकडे स्वार होऊन गेलों. येथें यांजवळी दाहा हजार फौज याणी तयार केली आहे. तिकडील फौजेचें वर्तमान तुम्हांस कलतच असेल. गनीमही तुम्हांसमीपच त्या प्रांतें आला. यामधें ग्रहकलह निर्माण जाहला, तेव्हां येखादे निमित्य येऊं शके. वरकड लोहनेरचा परिहार तुम्ही लिहिला. येथें मनास आणितां, आपला मुलूख खानदेश बागलाण सुरतपर्यंत त्यांजकडील अमलास तफावत करित नाहीं, असें असतां उगेच नाना प्रकारचे उपद्रव करितात म्हणून याणी सांगितलें. अशास किरकोली बोभाट होऊं द्यावे यांत काहीं अधिकोत्तर नाहीं. जेणेंकरून कोणेविसींचे निमित्य न ये, लौकिक उत्तम दिसे तोंच विचार केल्यानें उचित आहे. आम्हीं राजश्री स्वामीकडे गेल्यानंतर तेथंही जो प्रसंग होईल तो तुम्हांस लेहून पाठऊन. गर्गशा वाढला याचा विवेक होये ते केल्यानें सर्व गोष्टीस उपयुक्त आहे. तुम्ही विचारास चुकाल असें नाहीं; परंतु राज्यांतील मऱ्हाटे घालवितात हें निमित्य न घ्यावें. जें करणें ते राज्यकारभारास व्यत्यय न दिसे तें केलें पाहिजे. दाभाडे येथून बाहीर निघणार. गनीम समीप येतो. याकरितां हरयेक प्रसंगांस बहुत सावधपणे आपला नग राहे, लौकिकविरुध न दिसे, तो विचार करून वरचेवरी वर्तमान आम्हांस लेहून पाठविलें पाहिजे. येथीलही जो विचार होईल तो तुम्हांस लेहून पाठऊन. आम्हीं आजी येथून स्वार होऊन गेलों. सविस्तर राजश्री अंबाजीपंत तुम्हांस लिहितील त्यावरून कलों येईल. कललें पाहिजे. सर्वां+ गोष्टी, पहिली बाजी राखिली त्यान्वयें बाजी राखणें. श्रीनें तुम्हांस येश बहुत दिल्हें तें जतन करणें. निमित्य सर्वथा न घेणें. गनीम बहुत दगेखोर आहे, सावधपणें राहत जाणें. याच्या मुलकास उपसर्ग न देणे. किरकोळी केलीयानें उपहास मात्र होती, इतकाच आर्थ आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Naro Ram to Bajirao. The writer along with Ambaji Purandare was dispatched by Raja Shahu to Talegaon to effect a reconciliation between Bajirao and the Dabhades. The writer admonishes Bajirao not to injure the interests of the Dabhades in trifling matters. He should take care, lest such powerful Maratha Sardars by deserting the cause of Shahu, create a bad name for the Government.*

---

+The writer's hand.

No. 43] [1730 ?

श्री

सेवेसी प्रार्थना ऐसिजे. रा कृष्णाजी दाभाडे सुभेदार यांचा शह चितांत बहुतसा आणतील तर तैसा कांही नाहीं. त्यांचा हिसेब कितेब आहे. स्वामींनी अभिमान धरलीया शहाचे निवारण सहजातच होईल. माझ्या सिरावर स्वामींचा अभिये कर जाहाला म्हणजे वाजबी हिशेब आहे तो सेवेसी निवदन करीन. त्यावरून श्रुत होईल. सारांश अभिमानच धरिला म्हणजे सर्व उतम होईल. येविशई काये आज्ञा ते केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Offering to settle the dispute of Krishnaji Dabhade.*

---

No. 44] [1730 ?

पुरवणी बंद २

तो कोण्ही नव्हते. यास्तव हे जरूर जाणोन जोडी हरकारियाची रुपया येकेवीसपावतो तयार करून स्वामीकडे रवाना केले. त्यास ते जोडी ज्या ठिकाणी पोहचेल त्या मकानाचे नाव व तारीख लिहून पाठविले पाहिजे. वरकड नवल विशेश आडलिया स्वामीस वरचेवर पावल. साराऊश उमाबाई न आलीया वांड्याचा गाईकवाडाचा इतबार नवाब हर्गीस[1] करीत नाही. त्याचा वकील त्यास साफ सांगितले, जोवर उमाबाई तुम्हास सामील होत नाही तोवरी आपणास इतबार येत नाही. प्रसतूत ऐसा प्रसंग. स्वामींनी आपली मोहीम सिरा चढऊन मुदई[2] पेशमान[3] होत ते केले पाजे. बहुतसे काय लिा हे विनती.

¶*Complications about Dabhade and the Nizam.*

---

No. 45] [13-1-1731 ?

पो छ ३० रजब

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

ॐ श्रीमंतसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित अनंदराऊ पवांर कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशेल ताा छ १९ रजबु मुकांम आरणी पांा ललिंग जाणून स्वकीये कुशेल लेखनं करावयासी आज्ञा

१ बिलकूल, मुळींच. २ दावेदार. ३ पस्तावलेला.

करीत असिलें पाहिजे विशेष. राजश्री राणवा व मल्हारबा यैसे नेवालबारी उतरून गेलेसे आम्हास वर्तमान कललियाउपरी आम्हीं कूच दरकूच नीट मार्गें जात असतां, जावजी दाभाडे व बांडे व दलपत टोके हे सात हजार फौजेनसीं रनालियासीं होते ते रातवा खपोंन चालोंन आम्हांवरी आले. कोसावरी कहीवाले यांस आढललियावरी त्यांणी आम्हांस खबर सांगितली. मग आम्हीं सडे फौजेनसीं निवडोन त्यांजवरी गेलों. त्यांचें व आमचें युध्ये बरे वजेने जाले. अमित्रांचा पराजये होऊंन पलों लागले. त्यांजकडील निशांणे भगवीं २ वगैरे ३ येकूण पांच व नगारे ३ येणेप्रों पाडाऊ जालीं. लस्करात घोडी अडीचतीनसेंपावेतों आलीं. दलपत टोके यास जखम लागोन त्याचा बस्ता घोडा आम्हांकडील जावजी वंडगर यांजकड आला आहे. पयेदुम (गायेदुम ?) सोंनगीरपर्यंत पांच कोस पलाले. त्यांचे पाठीवरी आम्हाकडील स्वांर होते. फारसे गर्वेकरून आले होते. आपले पुंण्येप्रतापें त्यांचा हागरा मोडिला. जालें वृत सेवेसी लिहिलें असे. आम्हाकडील वीस पंचवीस खासे खासे माणूस जखमी जाले.

| चौकोनी शिक्का |

वरकडहि लोक व घोडीं जखमीं जालीं आहेत. विदित जालें पाहिजे. बहुत काये लिहिणे? कृपा अखंडित असों दिल्ही पाहिजे हे विज्ञापना. हरघडी स्वकीये कुशेलार्थ लेखन करून संतोषवित असांवे. विस्मरण न कीजे हे विनंती.

(मोर्तब सुद.)

¶[*Anandrao Pawar to Chimaji Appa, describing a slight skirmish which the writer had with Dabhade and Bande in which he defeated them decisively.*

---

*No. 46*] *[2-4-1731*

तेरीख ११ सवाल

**श्री.**

राजश्री कृष्णाजी कदम गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद. सुहूर सन इहिदे सलासीन मया अलफ. राजश्री त्रिंबकराऊ दाभाडें सेनापति व बांडे, गाइकवाड, उदाजी पवार व निजामनमुलुकाची फौज यैसी डबईस आली. आम्हीहि आपलेच फौजेनसी डबईनजीक दो कोसावरी दोन रोज मुकाम केला. नित्य सेनापति कोसावरी येऊन युध्यांस उभे राहात. तेथे युध्यास न बने यास्तव

छ ४ सवाली कूच करून थवाई ग्रा डबई येथे आलो. सेनापति कुल फौज जमा करून युध्यास आले. युध्य जाले. सेनापति ठार पडले. मलोजी पवार पडले; जावजी दाभाडे पडले; पिलाजी गाईकवाडाचा लेक पडला; उदाजी पवार पाडाव जाले; चिमाजीपंत धरून आणिले. पंधरा सतरा हतीं व नगारे निशाणे पाडाव जाली. वाडे गाईकवाड आनंदराऊ पलोन गेले. कुवर बाहादर जखमी आहेत; पलाले. तुम्हास कलावे यास्तव लिहिले असे. तेथे मुस्तफीखान आहे त्यास व पिलाजीचे फौजेस ताराजं[1] करणें. आपला अमल मुस्त करणें. पैका मेलवणे. जाणिजे छ ९ सवाल.

बाजीरावाचा शिक्का

लेखन सीमा.

*¶Bajirao to Krishnaji Kadam, describing the battle between his own forces and those of Dabhade, Gaikwad, Powar and Nizam, in which Bajirao inflicted a severe defeat on the enemy. The spoils of the battle are given.*

---

*No. 47*] [*7-5-1731*

## श्रीमलारी मार्तंड भैरवाय नम:

### श्रीमंत राजश्री पंतप्रधान
### व राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नरसो कुसाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येर्थाल कुषल येर्थाल कुषल जेष्ट शुध १३ जाणोनु स्वकीये स्वानंद वैभव लेखनआज्ञा केली पाहिजे. आज्ञापत्र पाठविलें पावलें. पावोन परम समाधान जालें. वर्तमान लिहिणें म्हणोन आज्ञा. त्यास राजश्री येशवंतराऊ दाभाडे सेनाखासखेल व राजश्री पिलाजी गायकवाड राहोडीयावर गेले होते. राजश्री भावसिंग राये कबिले निघोन सुरंगाणांत गेले. खासे राहोडीयांत होते त्यांचें कांहीं न चाले. मग नाशकास आले. सात दिवस येथें होते, श्रीत्रिंबकराजासही गेले. येक दिवस जाऊन नाशकास आले. जे दिवशीं आले ते रात्रीं नवाबसाहेब निजामन-मुलुक बहादुर यांचीं पत्रें आलीं. वाचून तेच घडीस स्वार जाले ते सुकेण्यावर मुकाम केला. दुसरे दिवसीं तेथें होते. राजश्री उदाजी पवार व आनंदराऊ यांच्या भेटी जाल्या नाहींत. रुसवा करून ते वाघाडियाकडे गेले. राजश्री

१ हैराण.

सेनाखासखेल व राजश्री पिलाजी गायकवाड येवलीकडे गेले. नवाब साहेब छ. ९ जिल्हेजीं अवरंगाबादेस दाखल जाले. यांच्या त्याच्या भेटी होणार आहेत. वार्ता आहे कीं पुणतांबीयावर येऊन राहावें. पुणतांबिहून नगर अथवा पेडगांवीं छावणी करावी. नवाबसाहेबीं अबदुलाखान दिवाण दोन हजार स्वारांनसी करनाटकाकडे भागानगरास रवाना केले आहेत. त्यास मातुश्री उमाबाईनी आपले सरदारास पत्रें पाठविलीं कीं तुम्हीं तुरूत ताबाकडे न जाणें. मागें फिरोन जाणें. त्यास राजश्री भावसिंगराये यानीं मौजे पिंपलगाव परगणे लोहनेर चांदवड बारी यासी आहे. गावास गढी होती तो गांव बलावला. फते आबखान याची फौज आली होती. दाहा वीस खून जाले. फिरोन गेले. त्यास दाभार्डायाची फौज त्याजवर जाणार हेहि वार्ता आहे. सारांश गोष्ट राजश्री पिलाजी गायकवाड यांसी स्वामीचें भये फारसें आहे. ते कांहीं नवाबसाहेबाचे स्नेहाचा पक्ष सोडीत नाहींत आणि नवाबसाहेबासही तुमच्या विरुधाकारे सर्वांचा श्नेह करणें; उभये पक्षीं विचार यैसा आहे. त्याहिवर आपणही शैन्यां पत्रें पाठविलीं आहेत. सविस्तर वर्तमान आलियावरी सेवेसीं लेहोन. आम उत्तर घेऊन जासूद राजश्री भावसिंगरायाकडे उत्तरासाठीं गेले. तेथून राजश्री उदाजी पवार याजकडे उत्तरास जातील. दिसगतीं लागेल. तों स्वामीचे चौहूकडून वर्तमानावर वर्तमानें येतील आणि आपणहि नवल आपूर्व वर्तमान लेहावयास अंतर करणार नाहीं. हरघडी सेवेसीं लेहोन. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Narso Kusaji to the Peshwa, giving the positions of the armies of the various Sardars and in the end discussing the chances of the Sardars leaving Peshwa's side and joining that of the Nizam, who is trying to befriend them.*

---

*No. 48*] [*7-11-1731 ?*

**श्री**

**राजश्री पंतप्रधान**
**गोसावी यांसी**

॰ श्रीमंत सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १७ जमादिलोवल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गतवर्षी किले पायागड येथील मजकूर राजश्री उदाजी पवार यासी केला होता तो योग घडोन न आला. हाली राजश्री कृष्णाजी दाभाडे याजकडून

राजकारण आले आहे कीं, पंनास हजार रुपये देऊन, गडदेखील वस्तभाव आपले हवाला करावी. ऐसी बोली आली आहे. आपणास लिहिले आहे, तर विचार करून, राजश्री आपास लिहिणे. तेथून उतराची प्रतीक्षा आसेल तरी, आम्ही शुक्रवारी प्राथ:काली स्वार होऊन जातो. आपल्या उतराची प्रतीक्षा करितो. उतर आलियाउपर त्यास जे लिहून पाठवावयाचे, ते पाठऊन. विशेष काये लिहिणे. कृपा आसो दीजे. हे विनंती.

[ पिलाजीचा शिक्का ]

¶*Pilaji Jadhao communicates to Bajirao Krishnaji Dabhade's request for the delivery of the fort of Payagad.*

---

*No. 49*] [*13-11-1731*

पा छ २३ जमादिलोवल

## श्रीभवानी प्रसन्न

विनाति उपरी. राजश्री येसवंतराव दाभाडे सेनापति यास व उमाबाई दाभाडी-यास दर्शनास हुजूर येणे म्हणोन खास दस्तके[1] देऊन जासूद जेथे[2] दर्याजी नाईक पाठविले, यास मसाला रुपये

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | केदारजी पवार | २५ | बुबाजी पावला. |
| २५ | नरसोजी नलवडा | २५ | जोत्याजी कदम |
| ५० | | ५० | |

येकूण सभर रुपये रास[3] सेनापतीकडे आ (का) रून देविले पाहिजेत. उमाबाई याचे पत्र वली[4] भरून देणे हे[+] विनंती.

¶*Umabai and Yashvantrao Dabhade visit Shahu, after Trimbakrao Dabhade fell in the battle of Dabhoi.*

---

१ दस्तक = हुकूम, हुकूमवजा पत्र. २ जथे = जथ्यापैकी. जथा = जमाव, कंपनी.

३ रास = संख्या. ४ वली भरून = मजकूर लिहून.

+ अक्षर निराळें.

No. 50] [1731 ?

# श्री

## राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री कुवर बहादर विनंती उपरी. येथील क्षेम जानऊन तुम्ही आपुले स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे. याउपरी बहुत दिवस जाले, गोसावी यानी पत्र पाठऊन परामृश न केला. यैसे गोसावियास न पाहिजे. याउपरी आपण ऐकिले कीं या प्रांता येणे होनार आहे. यैसीयास आपला हेत भेटीचा आहे; तर कितेका दिवसा आगमन होईल हे लिहिले पाहिजे. वरकड आपुले वर्तमान तर कितीयेक मल्हारी कदम जबानी सांगता कलो येईल. सदैव पत्री सांभाल करीत असिले पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Kuwar Bahadar was a Rajput Sardar fighting on behalf of Dabhade a Dabhoi. He writes this letter to the Peshwa.*

---

No. 51] [27-2-1732

पो. छ १२ रमजान.

# श्रीराम.

राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांसी सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. रा बाजी त्र्यबंक खोले यांजविशयीं आपल्यास समक्ष सांगणे तें सांगितले आहे. आपणहि मान्य केले आहे. तुम्ही ब्राम्हणकार्यास चुकणार नाहीत, याजकरितां लिहिलें असे. आपण पांचसे रुा देतो. तुम्ही येक हजार रुा देऊन ब्राम्हणाची मुक्तता होय ते गोस्टी केली पाहीजे. ये विशयीं अनमान सहसा न कीजे. आज सुटका तेथून करून उदईक रविवारी मारनीलेस आम्हाकडे पाठऊन दिल्हें पाहिजे. बहुत काये लिहिणे. लोभ आसो दीजे. छ ११ रमजान हे विनंती.

¶*Umabai Dabhade requests Bajirao to use his influence to effect the release of one Baji Trimbak Khole who appears to be her partisan.*

No. 52] [21-9-1732 ?

छ १ जावल

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान श्वामीचे शेवेसी**

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। आश्विन सुध त्रयोदसीपरियंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून शेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा कीं बाबतीचे रुा।विसी वरचेवर हटकीत जाणे आणि सेनापति जोपरियेंत ते प्रांते आहेत तोवर तुम्ही न येणे म्हणून आज्ञा. यैसियासी सुध पंचमीस राजश्री बाबूराव * * * (सेना) खासखेल व मातुश्री उमाबाई या उभयतासी खटखट जाली. त्यास खासकेल तो रुसवा करून हलदाणीस गेले. मातुश्री उठोन वरशास गेली. राजश्री सेनापति व दमाजी गाईकवाड नवापुरीच राहिले. दुसरे तिसरे दिवसी सेनापति जाऊन मातुश्रीस समजाऊन आणिले. मग राजश्री बाबूराऊ यासहि घेऊन आले. मग दमाजी गाईकवाडास वस्त्रें मातुश्रीनें द्यावी यैसा करार जाला आणि रुपये बावीस लक्ष द्यावे यैसा निचय जाला होता. त्यास राजश्री बाबूराऊ याणी दमाजी गाईकवाड यास फितवा देऊन सोनगडी गेला यैसे वर्तमान आहे. फौजेचे वर्तमान तर राजश्री दमाजी गाईकवाड याणे नवी व जुनी आठ दहा हजारपरियेंत ठेविली आहे व मातुश्रीजवल तो दीढ दोन हजार आहे देखील टोके. राजश्री कंठाजी कदमराऊ याणी तों अदियाप ठेविली नाहीं. •उदाजी पवार तो फतेपुरीच आहेत. राजश्री बापू शंकर येऊन बसिले आहेत. पवाराचाहि निकाल निघता दिसत नाही. दमाजी तो येत नाहीं. पुढे कसे होईल ते ईश्वर जाणे. गुजरात प्रांतीचे वर्तमान तर पाऊस बहुतच जाला. धारण विसा सेराची आहे. सुरत प्रांतीचे वर्तमान तर साल मजकूरचा पैसा झाडियानिसी गाईकवाडाने वसूल घेतला. सराफखानासी व किलेदारासी हमेशा शहरात जुजे होत. सातशे हवेली पडली यैसे वर्तमान आहे. माहाराज छत्रपति श्वामीचे हुजरे येऊन बसिले आहे परंतु सेनापति काही देसीं येता दिसत नाहीं. अदियाप काही मातुश्रीस रुा येक गाईकवाडाने दिल्हा नाही. कर्ज काढून मातुश्रीने राजश्री श्रीपतराऊ यांचे रुा रा केलें व देवांचे राजश्री उधोपंत याजबरोबर रुा रा केली. दुसरा कोणास (पैका) दिल्हा नाही. निजामाची पत्रें गाईकवाडास आली आहेत की जंबुसर आमोद व भडोच व खबाईत येथील जाहागिरीचे रुा पाठऊन देणे, नाही तर उतर सत्वर पाठवणे,

यैसी पत्रें आली आहेत. बहुत काय लिहिणे? कंठाजी कदम म्हणतो की दोन ल(क्ष)रु देणे म्हणजे नवी फौजे ठेवितो नाहीतर शे पनास पागेची तटे आहेत त्यानिर येऊन चाकरी करून. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji reports the dissensions of Baburao Senakhaskhel with h brother and Umabai.*

---

*No. 53*] [*29-9-17*

बार छ २० राखर सन सलास सलासीन

**श्री**

यादी राजश्री येसवंतराऊ दाभाडे सेनापति यांसी पत्र जे तुम्हांकडील लस्कर सबनिसी राजश्री लक्ष्मण त्र्यबंक यांकडे आहे त्याप्रमाणे करार आहे. हाली या रा मोरो यादव यांस आपले तरफेने मुतालकी सांगोन पाठविले असेत. त तुम्हीं याचे हाते सबनिसीचे प्रयोजन घेत जाणे. यास वेतन पेसजीप्रमा प्रविष्ट करणे म्हणून पत्र

१

देणें

¶*Shahu appoints Moro Yadav as Dabhade's sabnis.*

---

*No. 54*] [*1732?*

शाहुदप्तर रु. नं ४८

**श्रीरामवरद**

यादी सहित्यपत्रें

किता पत्रे—दोन वरसेपर्यंत सुरत महालचे व गुजरात महालचे परगणे खासगीकडे ठेऊन अमलास राजश्री नारो विठल प्रभू व राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व राजश्री उदाजी पवार ऐसे ठेविले असतां दोन वरसाचा वसूल तमाम तुम्ही घेऊन सेवटी तमाम फौज याजवर रवाना केलीत. तर हुजूरचा हुकूम मोडावा आणि

किता पत्रें. हुजूर खासगीकडे सुरत प्रांतीचे महाल व गुजरात प्रांतीचे महाल ठेऊन अमलास तुम्हास रवाना केले वगैरे परमुलखी सनदा असतां अमल चालो न दिला. त्यास प्रस्तुत दाभाडियास आज्ञापत्रें सादर केली असत. तरी दुसाला वसूल वगैरे अमल त्याणी सुरलीत देणे. दिल्हा तर उत्तमच जाहलें. सुरलीत देणे. दुसाला

अमल चालो न द्यावा हे गोष्ट तुम्हा सेवक लोकापासून दूर होती. परंतु ऐसा तुम्ही अविचार करून अमल न दावा ऐसे नाहीं. याजउपरी दुसाला जो खासगीच्या माहालातून जो वसूल घेतलात तो देणे वगैर अमल सुरलीत जे खासगीचे परगणे बाा सनदेप्रमाणें देणे. सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करीत नाही तरी दुसाला महालचा वसूल तुम्हांस सरकारचा सुटतो ऐसे नाहीं व महालचा तो साल मजकूरचा अमल सुरलीत देणे म्हणोन पत्रें :

१ मातुश्री उमाबाई दाभाडी.

१ राजश्री यसवतराऊ दाभाडे सेनापती.

१ राजश्री बाबुराऊ दाभाडे.

३

महंत अमरगीर गोसावी मुकाम असलाज यास समाधानाचे.

पत्र १

महालचा वसूल व खासगीचा महाल अमल न देत तरी तुम्हास कळल तैसा जबरदस्तीनें अमल खामखा घेणे. यास अंतर न करणे. दाभाडियाचा सरंजामात जो तुमचा हात चालल तेथ दुसाला वसूल व सालमजकूरचा अमल घेणे येविसीं तुम्हास आज्ञा असे म्हणून पत्रें:

१ राजश्री नारो विठल नाा खासगी

१ राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ.

१ राजश्री उदाजी पवार यास पत्र.

३

राजश्री कृष्णाजी दाभाडे यासी पत्र जे सरकारचे पागेच्या घोड्या कुमेत व बोर यैशा दोन घोड्या थाळनेरात गेल्या. त्या अद्याप तुम्ही ताकीद करून सरकारच्या पागेच्या घोड्या न दिल्हात. तर याजउपरी पत्रदर्शनी घोड्या राजश्री नारो विठल याचे स्वाधीन करणे. यास उजूर न करणे म्हणोन पत्रे १

देशमुख देशपांडे प्राा थालनेर यास ताकीदपत्रें १

२

येकूण पत्रे ९

एकून नऊ पत्रे देणे.

¶*This is an important paper which mentions the troubles in Gujarat created by the undefined spheres of activity entrusted by Shahu to his various commanders. The paper unfortunately bears no date.*

No. 55] [1732?

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामींनी पत्र पाठविले तेथे आज्ञा लिहिली कीं, राजश्री सेनापतीकडे राजश्री आयावा पाठविले आहेत. त्याणी सल्याचा प्रसंग केला तरी कैसा तह द्यावा ये गोष्टीचा विचार लेहून पाठऊन देणे म्हणून स्वामींनी लिहिले. तरी त्याच्या मनांत सालमजकुरी तह करावा यैसे नाही. स्वामीच्या * त्र भेदे * * * म्हणतील. त्याहिमध्ये त्याणी निकालस तह केला तरी निमे मुकासे देखील ठाणी निमेनीम द्यावी. बाबती सरदेशमुखीचे दोन रुपये मल्ला स्वामींनी केला आहे. त्यास निमे त्याजपासून स्वामींनी घ्यावा. दिवाणांसी त्यास प्रयोजन नाही. त्याची फौज (व) राजश्री आपा यार्णी येकत्र होऊन पोट भरावे. मूल (क) कौली आहे. त्यामध्ये उभयेताचे अंमलदार देखील ठाणी येथे ठेऊन आम(ल क)रावा यैसा तह निकाल जाला तर करावा, यैसा विचार मजला सुचला, तो लिहिला असे. यामध्ये स्वामी धणी आहेत. स्वामीच्या विचारास कर्तव्य येईल ते केले पाहिजे. याउपरी दुसरी गोष्टी कार्याची नाही. परतु सुचली ते लिहिले आसे. स्वामीस कर्ज जाले आहे. कर्ज फिटले पाहिजे. याकरिता सेनापतीची बोली घालावी. येका रुपयापासून त्यांच्या संतोषे जितके देतील तितके पाच सात वरसे कर्ज फिटे तोवर त्यांणी आपले तकसीम पैकी स्वामीस द्यावे. यामुले काही * * * * करीत तरी ते गोष्टी सोडून द्या(वी). विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Peshwa Bajirao is informed of the terms of peace to be settled between the Peshwa and the Dabhade.*

---

No. 56] [19-1-1733

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ
वडिलांचे शेवेसी

आपत्यें नानाने सां। नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। माघ वद्य प्रतिपदा भृगुवारपावेतो मौजे जेजुरी येथें सुखरूप असों विशेष. पायागडीहून कासीद आले. त्यास येक कासीद उमाबाईनी नेला. येक कासीद येथें आला. तो

आपणाकडे पाठविला आहे, यास आज्ञा काये करावयाची असेल ते केली पाहिजे. यानंतर राजश्री वासुदेव जोशी याजकडून स्वामीस पत्रे आली आहेत. तेच वजिनस लाखोटा पाठविला आहे. त्यावरून सविस्तर वर्तमान कळेल. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञापना.

¶*Balaji Bajirao's letter to his father. He was just eleven years of age at the time.*

---

*No. 57*] [*31-12-1733*

छ ६ साबान

**श्री**

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. आजी छ ५ साबानी सोमवारी राजश्री स्वामी व राजश्री नारबाबा व राजश्री आनंदराऊ व आम्ही वरकड मनुश्य जवळ कोण्ही नवते ते समई राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, "उमाबाईचा विस्वास नाही. याणी मुकाम नसरापुरी केला आहे. तिकडून आपाये जाला, म्हणजे राज्यास अपाय झाला येैसे समजोन पाच सात पत्रे पाठविली की किल्याच्या आश्रयाने राहणे. ते गोष्टी त्याच्या चितास आली नाही. याउपरी पोवार हुजूर आले. उमाबाई सिवापुरच्या मार्गे येईल, याकारिता सावध असणे म्हणून पत्र लिहून पाठविणे" त्यावरून स्वामीस पत्र पाठविले आहे, तरी पत्र पावताच तेथून कूच करून राजगडाच्या आश्रयास जाऊन राहिल्ये पाहिजे. येविसीं अनमान केला न पाहिजे. स्वामीनी दुसरा विचार ध्यानात न आणिता कूच करून राजगडाचे पाठीमागे घाटमाथा राहावे. राजश्री स्वामी बोलिले कीं " उमाबाईने तळेगावीहून कूच करून सिवापुरच्या मार्गे सातारियासी यावयाचा विचार करून कूच केल्याउपरी रायानी कूच केल्यावर वदनक्षाची गोस्ट आहे येन्हवी उमाबाईसी कटकट जालियावर प्रसंगी राऊ चुकतील येैसे नाही परंतु काळदेश वर्तमान कळत नाही," येैसे फार ममतापुरस्कर बोलिले. तरी स्वामीनी अगत्यरूप कूच करून राजगडच्या पाठीमागे किलाच्या आश्राने जाऊन राहावे, येविसीं अनमान न करावा. आमच्याहि विचारे राजश्री स्वामी बोलिले हा विचार उतम आहे. तरी सहस्त्र विचार एकीकडे ठेवून कूच करावे. आधी कूच करावे, अनमान न करणे. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Mahadoba Purandare to Bajirao and Chimaji, communicating Shahu's advice for the latter to take shelter at Rajgad, in order to avert a possible attack by Umabai Dabhade.*

No. 58] [1733?

श्री

श्रीमंत राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी पोश्यांतरगत दासानुदास चेरणरज नारो शंकर दिाा राजश्री मल्हारराऊ होळकर सा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीये आज्ञा केली पाहिजे. याउपरी मातुश्री उमाबाई दाभाडीण फौजनसी या प्रांती येऊन पत्राराचे निमित्य ठेऊन वहुताची घर लुटिली. आपण पागेसहवर्तमान मौजे आबे पाा दिंडोरी येथे होतो. तेथे आपणावरी श्वारी येत असता आपण सावध होऊन बाहीर निघालो. परंतु सात श्वार येवलियास कापडावदल पाठविले होते. त्यासी मार्गी श्वार टोकियाची घाटी पडोन वस्तभाव सुधा धरून नेली. मातुश्रीस पत्र लिहिले की आपण श्रीमंत याचे चाकर असता घोडी न्यावी हा विचार कार्याचा नाही. परंतु त्याच्या चितास ना आले. त्रिंबकरायाच्या दुखाचे श्मरण जाहाले. "ते गेले त्याचे आम्ही काये पारपत्य केले, ते तुम्ही धणियासी लिहून काये कराल ?" हे उत्तर दिल्हे. स्त्रीनाइकीचा विचार आहे. याजकरिता सेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे. याचे पारपत्य करणार श्वामी आहेत. येक पत्र मातुश्री उमाबाईस व राजश्री बलवंतराऊ ठोके यासी ताकीदपत्र पाठविजे कीं घोडी सोडणे व वस्तभाव जे नेली असल ते देणे. सांप्रत ओझरे[१] प्रांती आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Shankar, attached to Malharrao Holkar at the time, writes to Bajirao complaining against Umabai Dabhade for plundering some of his villages. Umabai seems bent upon taking revenge against the Peshwa for the death of her son Trimbakrao. The letter is all in one hand.*

---

No. 59] [1733?

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री आपा यांसी

आसीर्वाद उपरी. सोमसेट मधवे याजकडील मजकूर लिहिला तो कलला पावागडचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास आम्ही राजश्री स्वामीस लिहिले होते त्याचे जाव आले की तुम्ही गडची बहबुदी करून गड खामखा जतन करणे म्हणून लिहून आली व राा येसवंतराऊ दाभाडे सेनापति व उमाबाई व बांडे यास राजपत्रे आली त्याच्या नकल्या पाठविल्या आहेत त्याजवरून कलेल.

---

१ तांबयाचे ओझर, ता. दिंडोरी.

आम्ही राजश्री मल्हारजी होलकर व रा। राणोजी सिंदे यास येततविशई लिहिणे ते लेहून पत्रे पाठविली आहेत. तुम्हीहि त्यास लिहिणे ते लिहिले पाहिजे. सारांश गड जतन होये ते करावे. कदाचित त्याजकडील कोणी आडवे आले तरी त्याचे पारपत्य करणे ते करीत ते करावे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद. पिलाजी जाधव याचा कागद पाठविला तो आम्ही आपणाजवल ठेविला आहे. त्याजवल दिल्हा नाहीं. राजश्रीची पत्रे सेनापति उमाबाई व कदम यांसी आली ती त्याजकडे पाठविल्यास ते जावसुधा देणार नाही म्हणून पाठविल्या नाही. आपणाजवल दस्तावेज असावा म्हणून ती पत्रें ठेऊन घेतली आहेत. कलले पाहिजेत हा आसीर्वाद.

*¶Bajirao to his brother Chimaji, that the fort of Pawagad has been granted to him by Shahu. The fortifications should be repaired and the place be held against all opposition.*

---

*No. 60]* *[24-2-1734 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी,

विनंती. सेवक बाबुराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत छ १ सौवालपावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपण वाईस लग्नाकारणें स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों. श्रीकृपेनें व स्वामीचे पुण्यें लग्नसिधि जाली. पुढें लग्न संपूर्ण करून श्रीशिवरात्रीकारणें ब्राम्हणसंतर्पणा-निमित्य जरारें गंगातीरीं यावया स्वार जालों. वरकड लग्न चिरंजीव रामचंद्र-समागमें पुण्यास जावयाचा विचार केला, तें पुण्यास येऊन सर्व निवेदन केलेंच असेल. आपण त्वरेनें येथें येकादशीस पावलों. तिसरे दिवशीं शिवरात्र; ब्राम्हणसमुदायहि मिळाला. संतर्पण स्वामीचे कृपेनें होणें तें जालें, विदित जालें पाहिजे विशेष. इकडील बंदोबस्तीचा विचार तरी अगदीं जिल्हा अबदुल-अजीजखान यांचा. अद्याप जमाबंदी कितेक होणें आहे. आजी तीन वर्षे परगणे खराब होतात, जमाबंदी करितात, शेवट वसूल झाडून होत नाहीं. त्याहीमध्यें याप्रांतीं हींव अतिशय जालें त्यामुळें रबी व उंस नाबूद जालें. कमीचें साल आहे. लस्करची रहदारी तरी फौजा येतां जातां पायेमल्ली जाली व सांप्रत होत आहे. कोणी कोणाचा धनी ना चाकर ऐसा अर्थ जाला आहे. सांप्रत दाभाड्या-कडील हणगोजी बोरगे दोनशें स्वारांनशी या प्रातें आले. तमाम मुलकांत घास-

दाणा घेत गंगेसंनिध आले. येथून परगणे चांदवड येथें गांवगंना सरसुभा म्हणून चौथाईचे रोखे केले. जागीर राजश्री कुवर बाहादर याची आहे त्याचे तर्फेनें फौजदार आहेत. ते व सोमवंशी याकडील कमाविसदार येकत्र होऊन यांचा त्यांचा मुकाबला कादवा नदीसंनिध जाला. युद्धप्रसंग होऊन परस्परें घोडीं माणसें जखमीं जालीं. बोरग्याकडील बाळोजी सोनवणी पालक जखमी भारी जाला. ते समयीं बोरगे याणी शिकस्त खादली. बुणगे खानदेशांत गेले. सडे शंभर राऊत निघोन मौजे गोंडेगांव परगणे नाशिक गंगातीरीं आले. तेथें बाळोजी दाभाडा पालक लेक मृत्यु पावला व सोमवंशी याकडील भला माणूस राणोजी शेलार जखमी जाला होता तोहि मृत्यु पावला. पुढें उभयपक्षीं विरुद्ध मांडोन खराबी प्रजेची व्हावी हा विचार आपण पाहिला. त्याउपरी दोहींकडे पत्रें भले लोक पाठऊन जें लिहिणें तें लिहिलें कीं तुम्ही परस्परें भांडोन मुलूक खराब करितां, मुलुकास खावंद कोणी आहे कीं नाहीं? ऐशी भली प्रीति दर्शऊन आर्जीच कोठुरियामध्यें उभयतां समुदाय आणून समजावीस केली. प्रस्तुत चांदवड परगणे यांत यांणीं रोखेपत्र न करावें, खानदेशांत जावें, ऐसे करून कलह तोडिला आहे. विदित जालें पाहिजे हें विनंती.

¶*Baburao Malhar to the Peshwa, reporting Dabhade's depredations in Pargana Chandwad.*

---

*No. 61*] [*March 1734*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे सेवेसी,**

विनंती उपरी. किल्ले त्रिंगलवाडी नाशिक परगणेयांत घांटासंनिध श्रीत्र्यंबकांसमीप दोगावांवरी आहे, तेथें त्रिंगलवाडीच्या पाटलाचे हातें भेद करून दिवसास लोक चढोन किल्ला घेतला. कोणें घेतला हा नामनिर्देश दोन च्यार दिवस येकंदर न होता. गडावरी दाहा बारा माणसे मात्र, आणि येक किल्लेदार होता. खालून भेदानें वीस माणूस दरवाजापावेतों गेले. येथे दरवाजकरी होता तो मारिला तों खालून आणखी लोक चढले. किल्लेदार जखमी होऊन दस्त करून ठेविला. गडाखालीचे गांव लुटून कांहीं दाणेहि नेले. हें वर्तमान संगमनेरीं मखबुल अलम यास कळतांच फौजेनशी स्वार होऊन रात्रीचा दिवस करून त्रयोदशीस संध्याकाळीं गडाखाले हजार स्वार व बरकंदाज यांचे सर्वांचे मोर्चे लागले आहेती. कोणाच्या लोकीं गड घेतला हें तत्वतः

अद्याप आलें नाहीं. येक दोन दिवस लोक मनमानेसें म्हणतात परंतु आपण तत्वत: कलल्यावेगळें कोणाचें नांव लिहावें ? यामुळें या प्रांतीं दहशत निर्माण जाली. जरी लौकर गड याचे हातास आला तरीच बरें. किल्ला मोठा चोखटहि आहे. आणखी मोगलाईची फौज येईल. उभयेपक्षीं सल्ला असतां मध्येंच गड किल्ले घेतात, सुरळित धंदा चालतो त्यास विक्षेप आरंभला आहे. आपण मखबुल अलम यांस पत्र लिहिलें होतें त्याचें उत्तर कालीं संध्याकाळीं आलें. कितेक शब्द लाऊन लिहिलें कीं हा विचार काय आहे ? आपल्या खावंदास लिहिणें ऐसें लिहिलें आहे. कोणाच्या लोकीं घेतला गड हें अद्याप त्यांस श्रुत नाहीं. तत्वत: कलल्यावाचून काय लिहावें ? पुढें कळेल आणि सेवेसी लेहून पाठऊं(न). हें पत्र लिहिल्याउपरी आमचे चौकीदार यांचीं पत्रें आलीं कीं लोक किल्ले कोहजेहून विठ्ठल विश्वनाथ यांणीं पाठऊन किल्ला घेतला ऐसें वर्तमान लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. यानंतर अरकाटेहून तीर्थरूप बाबाचें पत्र व राजश्री कृष्णाजीपंतांचीं पत्रें आलीं तीं राजश्री धोंडो गोविंद यासमागमें सेवेसी पाठविलीं. पावलीं असतील. त्यांची उत्तरें काशिदांबरोबर स्वामीनें पाठविलीं असतील. कार्य थोर आहे. कदाचित न पाठविलीं असलीं तरी त्वरेनें पत्रांची उत्तरें काशिदांसमागमें पाठऊन सेवकास उत्तर पाठविलें पाहिजे. तुरकताजखान मेले, दरवेश महमदखान मेले, हें वर्तमान ऐकोन नवाब थोरले शहरास येणार ऐसें वर्तमान आहे. नवाब शिकारीस गेले होते, घोड्यावरून पडले, हातीं तीर होता तो तळहातास लागला आहे व पायहि दुखवला आहे. सैदजमालखान यास वराडचा......तालुका आजतगीर सुजायेतखान व औरंगाबादेचाही तालुका नवाबापासून होणार ऐसें ऐकिलें वर्तमान सेवेसी विनंती लिहिलें असें. विदित होये, हें विनंती.

¶*Baburao Malhar reports to the Peshwa the capture of fort Tringalwadi and deaths of Turuktaj Khan and Darwesh Mahammad.*

---

*No. 62]* *[3-3-1734*

पा छ २२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाबूराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत छ ८ सौवाल पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपण या प्रांते

आलेयावरी सेवेसी विनंती पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर वृत्त निवेदन जालें असें. किल्ले त्रिंगलवडी कोणाकडील लोकांहीं घेतली? नामनिर्देश कोणाचा नाहीं परंतु किला घेतला हें वर्तमान संगमनेरीं अवदुल अजीजखान यांस कळतांच रात्रीचा दिवस करून हजार फौजेनशीं किल्ल्याखाले येऊन वेढा घातला हें सविस्तर सेवेसी पूर्वीं लिहिलें आहे. मोगल किल्ल्याखाले जाऊन मोर्चे चालविले. जवारकरें येकेकडून मोर्च्या चालविला. गडावरी कांहीं माणूस होतें. उपराळा कोणांकडून न होय. खालीकडून मोर्चे दरवाजापावेतों आले तेव्हां वरता धीर न धरवें, राजकारणावरी घातलें. तांब्रांनीं पांच हजार रुपये मान्य करून अभय दिल्हें. हजार रुपये रोख वरते पाठविले त्यावरून लोकांहीं दरवाजा मोकळा केला. माघ वद्य ११ येकादशीस किल्ला घेतला. आठवें दिवशीं तांब्राचे लोक वरते चढले, तेव्हां मारामार होऊं लागली. वरचे लोकीं भय धरून चाळीस माणूस दुसरिया दरवाजानें निघालें; त्यांत पळतां पळतां पंधरा सत्रा दगडानें मारिलें, वरकड पळालें, वरकड वीस माणूस वरते धरिलें. यांत बारा माणसांचीं डोकीं मारिलीं. सात मऱ्हाठे व येक ब्राह्मण जिवंत ठेविले. पळतां मारिलें त्यांची व गडावरी सांपडलें त्यांत बारा येकूण आठावीस तीस माणसांचीं डोकीं अवरंगाबादेस रवाना केलीं. जिवंत जें धरिलें त्यांपाशीं, कोणाचे लोक, पृछा केली, बहुत मार केला. दो चौकडून नावें घेतलीं; शेवटीं नांव दाभाड्याकडील घेतलें कीं आपण त्याचे लोक. इतका खराखुरा विचार केला. गडीची बेहबुदी करून तांब्र स्वार होऊन काल नासिकास आले. किल्ला फिरोन घेतला यामुळें बहुत श्लाघ्यता मानिली आहे. दाभाड्याकडील वगैरे कमाविसदार व लोकांस भय निर्माण होऊन येकेकडे आले. उत्पात फारसा मांडिला आहे. सर्वांकडील कामकाज बंद जालें आहे. आपण पूर्वी त्यांस पत्र लिहिलें होतें; दुसरेंही पत्र लेहून पाठऊन विचारें कामामुळें भेटीहि घेणें लागेल. त्याचींही येक दोन पत्रें आली होतीं. सांप्रत नाशिकास आले, महिना पंधरा दिवस राहणार, दर्शनास जावें लागेल; कामकाज अगदीं होणें आहे. स्वामीच्या [illegible] बंदोबस्त करून घेणें तें करूं(न). अद्याप [illegible] लागला नाहीं. जमाबंदी चुकत आहे. दरमाहेचा ऐवज माघमास राजश्री अंबाजीपंताकडे पुण्याहून पावला. फालगून मासाची रवानगी करावी त्यास अद्याप वसूल चालीस लागला नाहीं. बाबती व सरदेशमुखीचा पैसा आला [illegible] पाठवितील यास्तव आहीं. दरमाहेचा तों अगत्य विचार; राजश्री तात्या माणसें गव्हास्यापावेतों माणसें न पाठवीत ऐसें करावें. चैत्रमासीं

1114

ऐवज रवाना करुं(न). वरकड नवल अपूर्व लिहिणेंसें नाहीं. यानंतर चिमणाजी दामोदर देवाज्ञा पावलियाचें वर्तमान आहे. तत्वत: खबर आलियावर सेवेसी लिहूं(न). विदित होये हे विनंती.

*¶Baburao Malhar Barve to Bajirao, that the fort of Tringalwadi has been recaptured by the Nizam's forces from Dabhade, whose men had occupied it when there was peace between the Nizam and the Marathas.*

---

*No. 63*] [*6-3-1734*

पाा छ २२ सवाल

**श्री**

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाबूराव मल्हार साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ ११ सवालपावेतों जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर वाईस आपण लग्ननिमित्य गेलों. स्वामीचे कृपेनें लग्नसिद्धि जाली. गगातीर प्रांतीं कामकाज होणें; वरचेवरी पत्रें आलीं कीं सत्वर येणें. यास्तव पुण्यास न येतां परभारेंच कोठुरीयासी आलों. श्रीशिवरात्रीचा महोत्सवहि कालासारिखा जाला. किल्ले त्रिंगलवाडी कोणाच्या लोकांहीं घेतली त्यास्तव त्वरेनें अवदुल अजीजखान संगमनेरीहून किल्ल्याखाली जाऊन मोर्चे लाविले हें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलें आहे. आलीकडे वर्तमान किल्ला फिरोन याणीं घेतला आणि नाशिकास आले, हें सविस्तर पूर्वी छ ८ रोजीं पत्र पाठविलें ते वेळेस पावलें असेल. सविस्तर निवेदन होईल. यानंतर श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचें पत्र कालीं आलें तेथें आज्ञा कीं हुताशनी कारणें आपण पुण्यास आलों. इष्टमित्र सर्व बोलाविले आहेत तरी तुम्ही अगत्य येणें. पंचमी जालियावरी आज्ञा घेऊन जाणें म्हणून पत्रीं आज्ञा केली. ऐसियासी आपण इकडे आलों तों तांव किल्ल्याखाले आला, यामुळें कितेक कामांस अंतर पडलें. सांप्रत किल्ला घेतल्यावरी बहुत कुर्मी चढली आहे. दाभाडियाकडील लोकाही गड घेतला हे तत्वत: जाले आहे. त्याहीमध्यें चोघांचीं नावें म्हणतात. खरें खोटें कोणाचे नांव होईल न कळें. परगणे नाशिक वणी दिंडोरीचा जमाबंदीचा प्रसंग आहे, यामध्यें आपणांस येऊन पंधरा दिवस जाले. इतक्यांतच त्वरेनें येथून गेलियानें नानाप्रकारचें तर्क करितील, कामास अंतराय होईल. दुसरी गोष्ट आपलें शरीर स्वाधीन नाहीं. उष्णकाल दिवस. जातां येतां श्रम होईल यास्तव हुताशनीस यावया अंतराये जाला. स्वामीनें श्रीमंत राजश्री रायास समजाऊन विदित केलें पाहिजे कीं त्यांचें चितांत ये.

आम्हा स्वकीये लोकांचें छत्र स्वामी आहेती. दुसरे कोण बोलावील आणि गौरव करील? परंतु कार्यामुळें अंतराय जाला, क्षमा केली पाहिजे. यानंतर दरमाहेचा ऐवज माघ मास राजश्री तात्याकडे पावतां जाला. फाल्गुन मासचा ऐवज पावावा त्यास इकडे अद्याप पैसा वसूल बाबतीचा अगर सरदेशमुखीचा नाहीं; यास्तव राजश्री तात्याकडील रवानगी आमावास्यापावेतों होत नाहीं. त्यांचीं माणसें येतील यास्तव लिहिणें लागलें. त्यांस लेहून आमावास्यापावेतों माणू(स) न ये ऐसे करावे. चैत्र मासीं रवानगी करितां. विदित जालें पाहिजे. कृपा कीजे हें विनंती.

¶*Baburao Malhar Barve to Chimaji Appa, referring to the news of the capture of Tringalwadi fort by Abdul Ajijkhan.*

---

*No. 64*] [*10-5-1734?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामी राजाचे सेवेसी

विनंती. सेवक माधवराऊ निंबाजी कृतानेक सा नमस्कार विनंती विज्ञापना येसीजे. येथील कुशल ता छ १७ माहे जिल्हेज मु॥ सोनगड जाणऊन स्वानंद वैभवलेखन लेखकास आज्ञा केली पाहिजे. यानंतर रा गोविंद गोपाळे आप ल्याकडून आले. यांची भेटी नरमदेच्या मुकामी राजेश्री देवजीबाबाची जालि यावर आपणास आज्ञा जाली कीं, तुम्ही याजला समागमे घेऊन उभयेता बंधू राजांची भेटी घेणें. त्यास पूर्वी श्रीमंत राऊ पंतप्रधान याची भेटी घेऊन पुनरपि रा आपाच्या दर्शनास जाणें. यैसियास, श्रीमंत राऊ पंतप्रधान खानदेशात आले आहेत. आज छ मारी स्वार होऊन पंतप्रधानजीच्या भेटीस गेलो. भेटीनंतर आज्ञा मार्गान स्वामीराजाच्या दर्शनास येऊन भेटीनंतर विज्ञापना उ करणे ते करून. सेवेसी कळावे म्हणौन विनंतीपत्र लिहिले असे. वरकड वर्तमान रा गोविंद गोपाळ यानी सो विनंतीपत्र लि॥ आहे त्यावरून सर्व निवेदन होईल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

हे विनंती.

¶*Madhaorao Nimbaji informs Chimaji Appa of his intention to visit Bajirao in Khandesh.*

---

१ कामतेकर, गायकवाडांचे पदरचा.

*No. 65*] [*28-5-1734*

नकल.

# श्री.

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही उतरप्रांते गेले आहा. तिकडील बंदोबस्त ज्या रीतीनें करावयाचा तेसा केलाच असेल. बुधमंत येसश्वी सेवक आहा. राज्यभारास उपयोगी प्रसंग तोच संपादून नक्ष कराल हा स्वामीस भरवसा आहे. तदनुसार वि(चा)रास व मनसुव्यास तुम्हापासून अंतर होत नाही यावरून स्वामी अतिशयेसी संतोसित आहेत. त्या प्रातीचे अमीर व मुख्य आदिकरून येथास्थितीच आहेत अथवा त्याचा विचार विचारे करून रक्षिलाच असेल. इकडील प्रसंग तरी नवाब निजामनमुलुक बऱ्हाणपुरावर राहिले आहेत. अशास त्याच्या चितांतील भावगर्भ कांहीं कोणास अवगत होतो असे नाही. तुम्हासहि वर्तमान वरचेवरी कलतच असेल. तुम्ही सावधतेस चुकणार नाही हा निशा आहे परंतु कोणाचा विश्वास मानावा असे नाही. याकरिता हे पत्र लिहिले असे. तरी त्या प्रांतीतून माघारे देशास येतेसमई बातमी बरी चोकस राखोन बहुत खबरयाने सावधपणे यावयाचा विचार करणे. उमाबाई दाभाडे नवापुर सोनगड प्रांते बहुत दिवस जाऊन राहिले आहेत. दर्शनास यावयाचा विचार करीत नाही; आणि हुजूरचा पैकाही त्याजकडे मबलगा येणे त्याचाहि निवाडहि अद्यापिवर केला नाही. बहुधा दर्शनासहि यावे हे त्याचे चितात येत नाही असे दिसते. एसियांस यांचे पदरी मातबर पदे, फौजाचे येख्तियार, त्याणी जे समई आज्ञा होईल ते समईच हुजूर यावे हेच त्यास उचित आहे. तदनुरूप त्याजपासून विचार घडोन येत नाही हेच अपूर्व भासते! स्वामीनी दोन वर्शे त्याचे येण्याचा मार्ग लक्षिला तथापि काहीच विचार त्याणी ध्यानात न आणिला. अत:पर ये गोस्टीचा विचार न करावा तरी उतम नाही. याकरितां तुम्ही माघारें देशास याल ते समई त्याचा मार्गे येऊन उमाबाई व राजेश्री सेनापति यास बोधयुक्ती च्यार गोस्टी कलतील त्या रीतीने सांगोन त्या समागमे होऊन येणे. स्वामीस त्याचा अगत्यवाद व अभिमान कोणे प्रकारे आहे, त्याजवरी ममताहि कोणे रीतीने करितात, हे सर्व तुम्हास अवगत आहे. त्याचे ध्यानात येत नसेल तरी तुम्ही विचार करून व ममतापूर्वक भाशण करून उभयेतासहवर्तमान स्वामीचे दर्शनास येणे; इतकाहि प्रसंग त्यास प्रशस्त न वाटे आणि यावयाचा प्रसंग न करीत, त्याच प्रांतें राहावयाचा विचारच सोडला, तरी राज्यभारास विरुध वर्तणारास येथायुक्त रीतीप्रमाणे वर्तावे उचित आहेच. तुम्ही येख्तियारीच आहां. प्रसंगानरूप कलेल ते रीतीने पुढे घालून उभयेतास स्वामी-

सनिध घेऊन येणे. हा विचार अलक्ष मानून त्यास येकेकडे टाकून न येणे. जेथे असतील तेथपर्यंत जाऊन लक्ष प्रकारे त्यास घेऊन येणे. यास अंतर सहसा न करणे. त्याचे समाधान जेसे करावयाचे तसे करून घेऊन येणे. त्यास टाकून आल्याने स्वामीस मानणार नाही. हरयेक गोस्टीचे व मुद्याविसी काही वचन गुतो न देतां समाधानपूर्वक घेऊन येणे. हुदा खासखेलीचा येविसी वचन गोवाल. वरकड सर्व प्रकारे त्याचे समाधान करणे. सरजामासी सरकारचा पैका याची काही बोधू न करणे. वरकड समाधान करून घेऊन येणे. त्यास सांडून येणे हे तुम्हास उचित नव्हे व राजभारासही उचित नव्हे हेहि जाणत आहा. रा। मंत्री लिहितील त्यावरून कलेल व राजश्री माहादाजी अंबाजी लिहितील त्यावरून कलेल. वाटेंत सावध येणे. बहुत काये लिहिणे? सूज्ञ असा.

¶*Shahu's orders to Bajirao asking him to bring to obedience the recalcitrant Dabhade and his mother Umabai who are defying openly the King's authority and possibly intriguing with the Nizam. The paper is valuable in view of the further developments of the affair.*

---

No. 66] [22-7-1729 ?
[28-5-1734 ?

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. दाभाडियाकडील हुजूरचा यैवज येणे तोहि येत नाही, व मसलतीस फौजहि नाही, व घरचाहि येक विचारे बंदोबस्त नाही. कितेक अव्यवस्तपणाची वर्तणूक. यामुले व प्रस्तुत गायेकवाडाचेहि राजकारण लागले यामुले त्याची फारच अनास्था जाहाली आहे. आम्ही येथे आलियावर, राजश्री स्वामींनी आम्हास आज्ञा केली कीं राजश्री प्रधानपंत उतरप्रांतीहून येतील तेव्हा दाभाडियासी त्रिवर्गास समागमे घेऊन यावे. न येत तर मार्कूल[१] करून आणावे. येविसी आम्हीहि पत्र लिहितो. तर आमच्या पत्राप्रमाणे तुम्हीहि पत्र देणें म्हणजे कासीदजोडी रवाना करितो. त्यावरून आम्हीहि पत्रे लिहून दिल्ही

---

१ शाहाणा, समजूत पाडून.

आहेत; परंतु कासीद अद्याप रवाना जाहाला नाही. रवाना होऊन स्वामीपासी पत्रे येतील. जाले वर्तमान स्वामीस. कळावे, याकरिता लिहिले असे. हे विनंती.

¶*Purandare to Bajirao, communicating Shahu's orders to bring the three Dabhade brothers into the presence of the King, using his powers of persuasion, if they would not come willingly.*

---

*No. 67*] [*28-5-1734*

छ ६ मोहरम

**श्री**

**पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ**

**स्वामीचे सेवेसी**

विनंती. दाभाड्याचे व गायेकवाडाचे केवल वैमनस्य जाहाले. दाभाड्याचा विचार तर येकात येक नाहीत. त्याहीमधे काही विचार असता तर कसे तऱ्ही चालते. केवळ अविचारामुळे काही चालत नाही. प्रस्तुत राजश्री दमाजी गायेकवाड याणी राजश्री स्वामी यासी राजश्री फतेसिंगबावासी राजकारण केले की, गुजराथ व सुरत माहाल हे आपलीकडे पूर्ववतप्रमाणे चालवावे. येक खेडे तफरका न करावे; व माहाराजाच्या चितास येईल (ते * वेले) ला किताब द्यावा. तूर्त दाहा लक्ष (राजश्री) स व दोन लक्ष रुपये सौ विरूबाई यासी व दोन लक्ष रुपये राजश्री फतेसिंगबावास द्यावे. तूर्त नजर सदरहूप्रमाणे तूर्त द्यावी. पेस्तर सालापासून दरसाल सा लक्ष रुपये द्यावे. दोन हजार फौजेनसी हमेशा येक भाऊ हुजरातीस चाकरीस द्यावा; व मोहीममसलतीस दाहा वीस हजार फौजेनसी यावे. कोणी सरकारकून आमचे निसबतीस हुदे मागतील तर न द्यावे, आमचे कारकून आहेत यासी जे अधिकार आहेत तेच हुजरून करार करावे. राजश्री पंतप्रधान आपल्यास छडीतील, तर माहाराजानी साहित्य करावे. ऐसे मुदे सागोन पाठविले. त्यावरून राजश्री स्वामीनी सदरहू मुदे करार करून यादीवर दस्तक करून दिल्हे. त्यावरून गायेकवाड याकडील कारकून आले होते, ते त्याकडील माहादाजीपंत यासी आणावयासी गेले. राजकारण ठीक लागले आहे. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊ. दमाजी गायेकवाड याणी तूर्त हुजूर न यावे. माहादाजीपंत येथे येऊन अवघे बोलीप्रमाणे ठीक करावे म्हणजे गायेकवाडानी आपला भाऊ पाठवावा. त्यापासी बोलीप्रमाणे सनदा पत्रा द्याव्या. दमाजीस जो किताब देणे त्याची वस्त्रे सोनगडास पाठवावी, यैसा

करार जाहाला. * (विदि) त जाहाले पाहिजे. राजकारणाचा विचार काही राजश्रीपासून आम्हास दाखल नाही. परभारा वर्तमान मात्र जाणतो; परंतु राजकारण खरेखुरं आहे. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

*¶Purandare to Bajirao: communicates the terms of agreement which Damaji Gaikwad effected with Shahu and Fatesing Bhosle. This letter appears to have been written after the death of Khanderao Dabhade, whose sons did not mutually agree and were indiscreet in their conduct. Damaji Gaikwad took advantage of this and claimed the title of Senakhaskhel from Shahu. The terms of the agreement are given above and are clear and definite. This is the origin of the dispute with the Dabhade brothers. The Peshwa had no hand in the matter. Damaji Gaikwad warns Shahu not to allow the Peshwa to interfere with the agreement.*

---

*No. 68]* *[31-5-1734?*

## श्री

### श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनती. आज्ञाधारक मलार दादाजी सां नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ ९ मोहरम स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्थित असे. यानंतर सरकारचा खजाना हजीरा हर्जार मालवियातून आला तो येथून आम्ही कावनईस राा बाबाजी बलकवडे याजवल पावता केला असे. तेथून स्वामीजवल प्रविष्ट करीतील. येसजी बलकवडे याणी नासिकी आबदुल अजीजखान याचे पागेवरी येऊन घातले. बारगीर खबरदार होते, जुज जाले. येसजी व दाहा विसा माणूस कामास आले. वरकड पलोन गेले. हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होते. ती पत्रें पावलीच असतील. येसजीने बेफामपणें हे कर्म केले. होणारास काये करावे? श्रीमंत राजश्री रायानी मोगलाई आमलाविसी लिहिले त्यावरून राा सदासिव कासी अमीन पाा नासिक यास पत्रें पाठऊन कामकाज काही आकारास आणिले होते. त्याणी भेटीस यावे, बोली चाली करणे ते करावी, येसे केले तों येसजीचा दंगा येऊन पडिला, त्यामुळे ते सावध जाले. मातुश्री उमाबाईचा आश्रा करून राहिले आहेत. बाईच्या चितात मोगलाई अमल आपणाकडे ठेवावा येसे आहे. आम्ही केवल सैल सोडीत नाही. होता होईल ते करीतच आहो. अकोले, कोतूल, धांधरफल येथे बाईने राऊत पाठविले. मोगलाचा वसूल मागेच बहुतेक जाला आहे. रेजों[1] बाकी तिही परगण्यात

---

१ जूज बाकी.

राहिली ते वसूल बाई घेणार. तिही परगण्यात राऊतीनी ह(गा)मा केला आहे. वर्णाचा अमीन पाटील व जमीदार घेऊन ठाण्यात बसला होता. वसूलवासिलात मागेच उरकिली. काही हजार पाचसे बाकी राहिली त्यामुळे गडबड ऐकताच जमीदार पाटील पुढे चालून किले अहिवंतास गेला. ठाणेयात चालीस पनास बरकंदाज ठेविले. आम्हास वर्तमान किलियास व रा। कोनर माधवराऊ व मलार माधवराव कमाविसदार दिा। भोसले यास व आम्ही आपलियाकडील कमाविसदार व राऊत बरकंदाज वर्णीस पाठऊन ठाणे घेतले. सांप्रत कमाविस-दार व आम्हाकडील लोक ठाण्यात आहेत. त्यास मातुश्री उमाबाई याणी शभर राऊत तेथे पाठविले. कटकट आरंभिली आहे. कलावे (या) निमित्य लिहिले असे. आपलिया विचारास येईल तर मातुश्रीस येक पत्र पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे की, मोगलाईच्या अमलास ती खटखट न करीत. तसेच बावाजी बलकवडे यास ताकीदपत्र की नासिक परगणियात धामधुम न करीत. होणार जाले. रयेतीस अजार दिल्याने सार्थक नाही. सेवेसी श्रुत होये. मातुश्री उमाबाई म्हणतात, माहाल मोकासे आमचे आहेत. मोगला * * * रेजा बाकी राहिली ते आपण वसूल घेऊ. त्याजवल दोन अडीच हजार फौजही तुर्त आहे. विदित होये हे विनंती.

¶*Malhar Dadaji (Barve) to Chimaji Appa, describing the reverse suffered by Yesaji Balkavade on account of his indiscreet attack on Abdul Ajijkhan. He further communicates the differences that had arisen between him and Umabai regarding the collection of dues from the Moglai province round about Nasik.*

---

*No. 69]* *[1734?*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी यासी विनंती उपर. सर्वस्वे उभारणी आपली आहे. त्यास त्यानी माहालामधें धामधूम बहुत केली आहे. यैसियास माहाराज राजश्री स्वामीस विनंतीपत्र पाठऊन राजश्री शेनापती यास राजपत्रे व हुजरे आणविले पाहिजेत जे, राजश्री हिंदुराव याजकडील फौज सरलस्कर-समागमे दिल्ही आहे, आणि तुम्ही त्या माहालामधें धामधूम करावयास प्रयोजन नाही म्हणून पत्रें आणविली पाहिजेत. राजश्री शेनापती याजकडेहि पत्रे पाठऊन त्याजकडील ताकिदी आणविल्या पाहिजेत. राजश्री चिमाजी आपा त्या प्रांतास जात आहेत, त्यास पत्रे पाठविली पाहिजेत जे, सोनगीर+ परगणि-

+ In Khandesh.

यातील त्याजकडील ठाणे उठऊन आम्हाकडील ठाणे बसऊन अमल चाले ते गोस्ट करविली पाहिजे. नाहीतर आम्हास काये आज्ञा करणे ते केली पाहिजे. निंबाळकराकडील शेह आणि सेनापतीकडील शे यैसे जाहले आहे, त्यास आम्हास तो तुम्ही वडील आहां. ज्याप्रमाणें आज्ञा कराल त्याप्रमाणे वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Addressed to the Peshwa, soliciting Shahu's orders on the subject of restraining the Senapati.*

---

*No. 70*] [पो *28-1-1735*

छ १४ रमजान

## श्रीराम

### पुा राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यांसी

विनंती उपरी. साताराचे मुकामी आपण राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे यांस पत्रे दिल्ही होती, ते राजश्री दमाजी गायेकवाडाकड पाठविली. कडी विरमगावपावेतो गेले होते. हे पत्रे पावताच माघारे फिरोन महीतीरास आले. उदाजी पवार व रघोजी कदमराव आलीमोहनाच्या रानांत आहेत. पलीकडे जाणार त्यास तुम्हाकडील फौज सरदेसच आहेत. तर सातारा पत्र दिल्हे होते त्याजप्रमाणे हालींहि रा मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यास पत्रे लेहून सत्वर आम्हाकडे पाठवणे म्हणजे ते पत्र गायेकवाडाकडे पाठऊन देऊन ते त्यांजकड पत्र प्रविष्ट करून येका विचारे होऊन प्रसंगानरुप गांठ घालून नतिजा पावितील. याजकरितां पत्र पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे. छ १४ माहे रमजान. हे विनंती.

¶*The writer requests Bajirao to order Ranoji Shindia and Malharji Holkar to join him.*

1122

No. 71] [28-1-1735 ?

## श्रीराम

राजश्री वाजी भिवराव
गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रति उमाबाई दाभाडे दंडवत. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे. यानंतर तुम्ही पत्र पाठविले, पावोन वर्तमान विदित जालें. दाहोदचे वर्तमान लिहिलें त्याजवरून कलों आलें. उतम गोस्टी जाली. सातारांचे मुकामी रा। मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यांस पत्रें दिल्ही होतीं ते गायेकवाडाकडे पाठविली. कडी विरमगावपावेतों गेले होते. हें पत्रें पावतांच माघारें महितीरास आलें. उदाजी पवार व रघोजी कदमराव आलिमोहनाच्या रानात आहेत. पुढें जाणार. तुम्हाकडीलहि फौजा सरदेसच आहेत तर सातारा कागद दिल्हा होता त्याजप्रमाणे हाली मल्हारजी होलकरास व राणोजी सिंदे यास पत्र लेहून आम्हाकड सत्वर रवाना करवणे. ते पत्र गायेकवाडांकड पाठऊन देऊं. ते त्याजकड प्रविस्ट करून येका विचारे होऊन प्रसंग पाहून नतिजा द्यावयाचा तो देतलि, याजकारितां राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस सांगोन कागद सत्वर पाठवणे. रखमाजी भापकरास ताकीदपत्र पाठविलें आहे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ १४ रमजान हे विनंती.

¶*Umabai Dabhade informs Baji Bhivrao that she would forward letters to the Gaikwad as requested and unite in the campaign along with the others.*

---

No. 72] [20-6-1735 ?

## श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

सेवक गोविंद कृष्णा कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ ८ मोहरमपावेतो स्वामीचे कृपादिर्ष्टीकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. सोनगडाकडून वर्तमान यैकिले की, गंगाजलनिर्मल उमाबाई व राजश्री सेनापति व राजश्री बाबूराऊ सवाई यैसी त्या प्रांतास गेली. त्यास उमाबाई व सेनापति सोनगडी राहोन, राजश्री दमाजी गायेकवाड याची भेटी घेतली आणि मनमानेसारिखी बोली लाविली. बाबूराऊ मुलकात सिरोन मुल्क मारून गोरेढोरे वलीत करून, बहुत नास केला. सेवटी दमाजीने येकच जाब दिल्हा

की, तुम्ही मुलूक मारिता आणि त्रिवर्गाची येक बोली नाही. येक विचार करून न्यायाने चालाल, दरम्याने बोलीस कोणी द्याल, तरीच आपण बोलीस उभे राहोन, मान्य करून. नाहितर चितास येईल तैसी तुम्ही खावंदगिरीने वर्तणूक केलीत तर, आम्हा सेवक लोकांचे काये गेले ? त्यावरून बाबूराऊ यास सोनगडास आणून, त्रिवर्ग येकत्र जाहाली. सेवटी बोलीचा फाट पडोन, याचे त्याचे युध्य जाहाले. त्याजकडी याजकडील काही थोडी लोक पडले; काही जखमी जाहले. दमाजीची फौज मुलुकगिरीस गेली आहे. ते आलियावरी मागती याचे त्याचे युध्य होणार. सोनगडची पेठ याणी जालिली, यामुळे व मुलकाचा नास जाला यासमधे बोलीत काही ताळ न दिसे. याजकरिता त्यासी विरोध करून, गड बलकाऊन बैसला आहे. रा कृष्णाजी दाभाडे यासहि द्रव्याचा उपसर्ग लावणार. हे यैकोन, तोहि सोनगडी बैसला. यैसे वर्तमान यौकिले. आपणाकडे कागदी पत्री आले आसेल, ते प्रमाण. सेवेसी कलावे म्हणून लिहिले असे. राजश्री पंतप्रधान आपल्या चितानरूप मनसबा करून माघारे फिरले, यैसी बोली आहे. आपल्याकडे पत्रे आली असतील, ते प्रमाण. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे. हे विज्ञाप्ति.

¶*Govind Krishna (?) informs Chimaji Appa of the fight between Damaji and Umabai and Baburao Dabhade at Songarh.*

---

No. 73] [13-8-1735?

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करविले पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविले तें पावले. कापड सनगे रुजु पाहून पटीप्रा पाठवणे म्हणोन लिहिलें, त्यावरुन रा दादो हरि यासी सांगोन कापड रवाना केले असे. त्यामध्ये कांही अंतर नाही. याउपर आपले जाणे खानदेशातून जाहले तरी प्रा. थालनेर आमचा मोकासा; तेथें कांही उपसर्ग न लागे यैसे कीजे. पहिल्यापासून वडिलीं लोभ केला आहे. आमचे बहुत प्रकारें चालविले आहे त्याप्रा तुम्ही दया करीत असिलें पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ वर्धमान कीजे. छ ९ रबिलाखर हे विनंती.

¶*Krishnaji Dabhade requests Chimaji Appa to spare his Mokasa villages in his expedition through Khandesh.*

No. 74] [23-9-1735

पा. छ १६ जमादिलावल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री
अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामींनी लिहिले की बाबूराऊ दाभाडे याणी मनमानेसारिखी धुंदी मुलकात मांडली व कूच करून भीमेवर गेले. आम्ही पारपत्य करावे तरी पहिले येक निमित्य आले. आताही तैसेच करावे तर लौकिक विरुद्ध. यास्तव तुम्ही राजश्रीस विनंती करून राजश्री सेनापतीस निरोप देणे म्हणजे त्याचे साहित्य करून त्यास विचारावर आणू व येशवंतराऊ पोतेनीस यासी पाठऊन बाबूराव। यासी हुजूर आणावे येसी विनती राजश्रीस करणे म्हणून स्वामीनी लिहिले. येसियासी पहिले देवजी सोमवंसी याच्या कागदाच्या नकला पाठविल्या ते वर्तमान लिहिले आहे त्यावरून विदित होईल. प्रस्तुतहि स्वामीच्या पत्राप्रमाणे राजश्रीस विनंती केली त्यावरून राजश्रीनी दोन पत्रे स्वामीस लिहिली आहेत आणि आम्हास-हि त्याहावयासी आज्ञा केली आहे की बाबूरायानी सिलेदार मेलविले आहेत ते स्वकीये वळणातीलच आहे. तरी तुम्ही तमाम लोकास ताकीद करून कोणी त्याजवळ न राहात, उठोन येत ते करणे. जो कोणी नौदिगरे[1] करील त्यास सज्या द्यावा म्हणजे बाबूराऊ मार्तीचो[2] माल राहून अपेअप हुजूर येतील येसे सांगितले. व येथून कोणी मातबर पाठऊन त्यास अणवावे तरी ते काही येत नाही. तयास्तव तुम्हीच राजश्री पंतप्रधान यासी लेहून सदरहूप्रमाणे लोक त्यापासी न राहात ते करणे येसे सांगितले. त्यावरून हे पत्र लिहिले असे. तरी स्वामीनी राजश्री स्वामीचे आज्ञेप्रमाणे लोकास ताकीद केली पाहिजे. याउपर राजश्री सेनापतीच्या निरोपाविसीहि विनंती केली. त्यावर राजश्री स्वामी राजश्री नारबावास बोलिले की सेनापति येथे ठेविल्याने उपयोगी नाही. तयासीहि निरोप द्यावा. हे जाऊन कलेल ते रीतीने बाबूरायास माकुल करितील येसे बोलिले. साराउष सेनापतीसहि निरोप लौकरच होईल. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Shahu considers measures to restrain the rebellious behaviour of Baburao Dabhade.*

१ अडथळा. २ कवडीमोल.

No. 75] [23-9-1735

पा छ १६ जमादिलावल

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री बाबूराऊ दाभाडे यानी मनमानेसारिखी वर्तणूक केली. यास्तव त्याच्या पारपत्याविसी दोन पत्रे स्वामीस लिहिली आहेत. येक खासा त्याचे पारपत्य करावे येसा मजकूर व येक पत्र की जे लोक त्यापासी जमा जाहाले असतील त्यास ताकीद करावी की कोणी त्यापासी राहू न पावेत. नौदिगर करील त्याचे वर कैद करावे व पागेस घोडी लावावा येसे लिहिले आहे. येसियासी खासा त्याचा पारपत्याची गोष्ट स्वामींनी येकायेकी करावी येसे नाही. सेनापतीसहि राजश्री दोचौ रोजा निरोप देतात. हे स्वामीपासी येतील याचे साहित्य करून जे करणे ते करावे म्हणजे आपल्याकडे निमित नाही. कदाचित सेनापतीसहि होईना आणि मनास येईल तेसी वर्तणूक करू लागले तरी येक पत्र राजश्रीस पाठवावे. येथे श्रुत करून करणे ते करावे यैसी राजश्री मर्जी आहे. तदनुरुप लिहिले असे. वरकड सिलेदार लोकाचे ताकिदीविसी काही हुजूर आहे येसे नाही. स्वामींनी कलेल ते रीतीने ताकीद करून सांगावे. ना आइके त्याचे पारपत्य करावे. येका दोघाचे पारपत्य जाहाले म्हणजे धास्त पडेल आणि लोक बाबूरायापासील तमाम उठोन जातील. साराउंप लोक कोणी त्यापासी न राहेत ते करावे येसी राजश्रीची मर्जी आहे. विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shahu desires the Peshwa to punish Baburao Dabhade for his unruly conduct.*

---

No. 76] [23-9-1735

छ १९ जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामींनीं पत्रे पाठविली तेथें लिहिले कीं राजश्री बाबूराऊ दाभाडे याणी राजश्री देवजी सोमवंशी याचे महाल त्रिंबकजी जाधव सिलेदार यासी देऊन

सनदा चालविल्या व त्याणी पत्रे देवजी सोमवंशी यासी लिहिले आहेत त्याच्या नकला पाठविल्या आहेत म्हणून लिहिले ती पत्रे बुधवारी संध्याकालच्या सहा घटका दिवसास येथें आली. त्यावर साइकाली राजश्री स्वामी सिकारीहून आली-यावर दरबारास गेलो. राजश्री मंत्री व राजश्री सुमंतहि होते व आणिकहि लोक बहुत होते. ते वेलेस आम्ही वर्तमान विदित केले कीं राजश्री बाबूराव याणी राजश्री देवजी सोमवंशी याकडील सरंजाम व पवाराकडील गैर लोकाच्या माहालावर सिलेदाराच्या समजाविसी करून सनदा चालविल्या व मनमानेसारखी मुलकात धुंद पडली आहे. या गोस्टीचा काये विचार म्हणून अर्ज केला. त्यावर राजश्री बोलिले कीं तुम्ही कांहीं उगेच वरकडासारिखे नव्हां जे आम्हापासी बोभाट सांगतां. बाबूराऊ कांहीं आमचा हुकूम मानीत नाहीं. आम्ही त्यास हुजूर यावयाची आज्ञा करितो परंतु ऐकत नाहींत. त्याची बुधी कांहीं उतम नाहीं. यास्तव अकुर बलावला नाहीं तोच मोडावा यांत उतम आहे. राज्यांतील मुलकांवर आपल्या सनदा जेव्हां चालवितो तेव्हां पुंडाईस बाकी कोणती राहिली? याउपर तुम्ही किमपि उपेक्षा करूं नका. कलेल ते रीतीनें त्याचे पारिपत्य कलेल ते रीतीनें करणें. ऐसे बोलिल्यावर आम्ही अर्ज केला कीं एविसी एक सहीचे पत्र राजश्री प्रधानपंतास द्यावे. यैसे बोलिल्यावर राजश्री बोलिले कीं पत्र एक सोडून दहा देवितो. याउपर तुम्हाकडे कांहीं अदेश नाहीं. तुम्ही खामखा पारपत्य करणे यैसे बोलोन एक पत्र स्वामीस की कित्येक आज्ञा कर्तव्य ते राजश्री महादाजी अबाजी यापासी केली आहे कीं ते लिहितील त्याप्रमाणे दुसरा विचार न करितां वर्तणूक करणे व दुसरे एक पत्र स्वामीस लिहिले आहे कीं सिलेदार व सरदार बाबूराऊ यापासी राहिले असतील त्याचे कबिले धरणे व घोडी पागेस लावणे आणि ताकीद करणे कीं याउपर कोणी त्यापासीं राहील त्यास नतिजा देणे म्हणून आम्हास हुजुरून आज्ञा आहे येसी ताकीद करणे म्हणजे त्यापासीं कोणी राहाणार नाहीं. मालाचा मालच राहातील. तथापि जर पांचसातसे कोणी मिळालेच आणि सुधी वर्तणूक न करीत तरी परिछिन्न पारिपत्य करणे यैसी आज्ञा आम्हास करून स्वामीस पत्र लिहिले असे. त्यावर मल्हारजी होळकर व राणोजी सिंदे व उदाजी पवार व मानाजी पवार यासी सहीपत्रे दस्तक करून दिल्ही आणि त्याहावयासी आज्ञा केली कीं बाबूराऊ दाभाडे जिकडे जातील तिकडे त्याचे पारपत्य करणे यैसी पत्रे लिहिविली व पारसी पत्रे अभयसिंग यासी व जयेसिंग यासी लिहिविली कीं बाबूराऊ दाभाडे यासी हुजुरून तगीर केले असे, यैसे असतां मुलकांत धुंध करीतील तर तुम्ही तंबी करणे व बाबूराऊ यासी दमाजी गायेकवाड सामील जाहाले अगर उमाबाई सामील

1127

जाहाली तऱ्ही तुम्ही तंबी करणे आणि गुजराथेंतून काहाडून देणे. सदरहू-प्रमाणें आपल्या सरदारांसही लिहविलें व चिटनिसास हुकूम केला कीं याउपर त्यासी सेनाखासखेल यैसे लिहित न जाणे यैसे बोलिले. आणिकहि राजश्री रागे भरून वहुतच बोलिले. मध्यरात्रपर्यंत दरवार जाहाला होता. मजकूर हाच होता. पत्रीं कोठवर ल्याहावे? आम्हास राजश्रींनीं आज्ञा केली कीं तुम्ही राजश्री प्रधानपंतास लिहिणे जे बाबूरायानें आमचा हुकूम मोडिला आहे व बदफैली फार केली आहे. तरी तुंम्ही माझें चाकरेस असिलेस आणि पराक्रमी अहा तर बाबूराऊ मालाचे माल राहून हुजूर येत यैसे करावे. येविसी अंतर कराल तरी तुम्हास शफत असे यैसे बोलिले. त्यावरी येशवंतराऊ पोतेनीस यांसी राजश्री बोलले कीं तुम्हास आम्ही जाऊन बाबूराऊ यासी घेऊन या म्हणून सांगितले ते तुम्ही न करितां आपल्या पुतण्यास पाठविले, अखेर ते न आले यैसे बोलिले. त्यावर येशवंतराऊ बोलिले कीं बाबूराव यावयासी सिद्ध जाहाले होते. परंतु राजश्री पंतप्रधान याचे पत्र त्यास गेले कीं तुम्ही सातारियासी न जाणे. आम्हीं उतरप्रांते जयसिंग याचे कुमकेस जातो तरी तुम्ही आम्हाबराबर चला यैसे पत्र आले. ते वजजिन्नस त्याणी हुजेरेयासी व यासी दाखविले आणि उठोन गेले. त्यावर आम्ही येशवंतराऊ यासी बोलिलो कीं ह्या लटक्या गोस्टी तुम्ही दरबारांत बोलाव्या हे उत्तम नव्हे. राजश्री प्रधान उतरप्रांते महाराजास पुसिल्याविना कसे जातील व जाणे जाहाले तरी बाबूराऊ कोणते वकुबदार गेले जे त्यासी सामील करून घेतील? यैसे बोलिलो. तो राजश्री स्वामी त्यासी बोलिले कीं लबाड गोष्ट दरबारांत कशास बोलता? राजश्री प्रधानपंत कांहीं उत्तरेस जात नाहींत व गेले तऱ्ही बाबूरावास सामील करून घेत नाहींत. उगीच बाबूरायाचे साजीसीची गोष्ट कशास बोलता? त्यावर येशवंतराव उगेच राहिले. राजश्री मंत्री यासी बोलिले कीं गतवर्षीच आपण ये गोष्टीचा बंदोबस्त करीत होतो परंतु बाबा बोलिले कीं सेनापती दिवालखोर आहे. त्यास सवसारीं कांहीं कलत नाहीं. यास्तव बाबूराऊ याजवरीच येखत्यार द्यावा हे उतम म्हणून सेनापतीचा सिका त्याचे हवाला केला. त्यावर बाबा बोलिले कीं आतां या रूपास हे गोष्ट आलिया-नंतर बंदोबस्त करणे तो करावा, यैसे बोलिले. त्यावर राजश्री बोलिले कीं पतीसहि पुसावे. त्याच्यानें फौज ठेवून साहेबकाम व मुलुकाचा बंदोबस्त रचा बंदोबस्त होऊन हुकुमाप्रमाणें वर्तणूक होत असिली तरी बरेच जाले. न होय तर एवढी फौज बुडवावी आणि जागा जागा मुलुकांत डोहोणे खारे करावे यात काय फायदा आहे? दुसरा सरदार उभा करावा. तो दिवाणाचा पैकाहीं देईल व फौज ठेवून हुकुमाप्रमाणे वर्तणूक करून साहेबकाम

करील यैसे बोलिले आणि सेनापति बोलावयासी पाठविले. ते आले. त्यासी राजश्री बोलिले कीं राज्यांत तुमच्या बापानें हुकुमाप्रमाणे वर्तणूक करून लहानाचे थोर जाहाले. कष्टहि फार केले. तुमचे वाईट आम्ही करावेसे नाहीं. तरी तुम्हास हा कारभार होऊन आपले घरचा बंदोबस्त व फौज व हुकुमबारदारी व साहेबकाम होत असेल तरी तसेच सांगणे, नाहीं तर साफ उत्तर देणे. त्यावर बोलिले कीं साहेबी पुस्तपन्हा केल्यास इतक्याही गोष्टी होतील. त्यावर राजश्री बोलिले कीं येधवा तुम्ही जाणे आणि विचार करणे कीं तुमची पुस्तपन्हा कसी करावी ? तुम्ही बंदोबस्त कसा करितां ते विदित करणे, बाबूरायासी हुजूर आणविता की न आणवितां हे सांगणे. तोपर्यंत राजश्री प्रधानपंतास व वरकड सरदारास पत्रे लिहिली आहेत त्याची रवानगी करीत नाहीं यैसे बोलिले. त्यावर दरबार बहुर्डा[१] होऊन राजश्री वाडियांत गेले. जाहले वर्तमान सेवेसी विदित व्हावे यास्तव लिहिले असे विज्ञापना.

¶*Baburao Dabhade's rebellious conduct was the subject of a long discussion at Shahu's Court, which is reported to the Peshwa by Purandare in this letter, which is of interest to prove how the Dabhades lost their position by sheer negligence, although Shahu was ever ready to support them.*

---

*No. 77]* *[2-10-1735*

**श्री**

**तीर्थस्वरूप राजश्री राऊ स्वामी**
**वडिलाचे सेवेसी.**

आपत्ये शंकराजी जनार्दन सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २५ जमादिलावल गुरुवासर मुकाम चादखेडे[२] प्रात:काळ वडिलाचे आसिर्वादे येथास्थित असे विशेष. पंताजी मोरेश्वर याजविसी राजश्री बाबूराऊ दाभाडे सेनासरखेल याचे पत्र आजी प्राथ:काळी आलें. ते बजिनस सेवेसी पाठविले आहे. त्यावरून विदित होईल. त्याजपासी दोन च्यारसे राऊत जमा आहेत म्हणून चितात संशये आणितील तरी येतद्विशाई वडिलाचे आसीर्वाद समर्थ आहे. ते तले-गावीहून कूच करून आबेकुरडी येथे नदीपलीकडे सेनाखासखेल राहिले आहेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे चुलत भाऊ आहेत त्यास सेनाखासखेल याणी हती व पालखी देऊन उभारणी केली. दोन हजार फौजेनसी त्यांणी

---

१ खलास. २ चिंचवडजवळ, ता. हवेली.

चाकरी करावी यैसी बोली केली. यैसे वर्तमान तेथील भला माणूस आला त्याणे सागितले, त्यावरून सेवेसी लिहिले आहे. दाभाडे यापासीहि राऊत च्यार पाचसे जमा आहेत. विदित जाहाले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Shankraji Janardan to the Peshwa, informing him of the equipment of Baburao Dabhade and the latter's agreement with the cousin of Pilaji Jadhao to entertain him into his service.*

---

No. 78] [10-11-1735?

श्री

पुा राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसावी यासी विनंती उपरी. चिरंजीव राजश्री बाबूराव दाभाडे सेनाखासखेल याजविशयी हुजूरची आज्ञापत्रे आलीं याच्या नकला व त्याचे गुणानवाद स्वमुखे बुधिवाद सांगितला त्याचा विचार सविस्तर लिहिला त्याजवरून कलो आला. यैसियास लिहिल्या गोष्टी येथार्थ, त्यास अंतर नाहीं. आपणहि सांगावयास किमपि अंतर केले नाही. तत्रापि याचा विचार पूर्वीच तुम्हास सांगितला. परंतु लेकरु. विचारे करून हालखुंद वर्तोन वडीलाचे नाव संरक्षण करवावे याजमधे स्वधर्म आहे. त्यानी तो उपहासिक कर्मास अंतर केले नाही. तितक्या गोस्टी येकीकडे ठेऊन आम्हावर दस्टी देऊन राजश्री स्वामीस जे विचारे लिहिणे तो अर्थ लेहून त्याची वक्रता जाऊन कृपा होये तो अर्थ करणे तुम्हाकडे आहे. पुढे ते या प्रांतास येणार, ऐकत नाहींत म्हणून लिा. यैसियास ते तेथून उलगडून आलिया विचारे वर्तनूक करतील यैसे नाही. पुन्हा संकट तुम्हास पडल याजकरीतां त्यास विचारे करून अविचार लोकिकात न दिसे, हालखुद होऊन आपनापासी स्थिरता होये तो अर्थ कीजे. येविशयीचा बुधिवाद आपणास लेहावा यैसे नाही. विचारे करून कर्तव्यें ते केले असल. त्याचे पदरी उपहासिक कर्म पडलियाने तुम्हावर शब्द आहे याचा अर्थ चितांत अणावा. सांप्रत राजश्री चिमणाजीपंतापासून अंतर जालें तर तुम्हास वडीलपणे साभालणें लागलें. त्यासी अंतर केले तर वडीलपणास शब्द लागतो यैसा विचार चितात आणून जे गोस्टीने चिरंजीव हलखुद राहे, अर्जिले येश वडिलानी त्यास विक्षेप न होये, तुमच्या आमच्या माथा वडीलपण त्याजवर शब्द न ये ते गोस्टी करणे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे छ ९ रजब हे विनंती.

¶*Letter appears to be written by Yashvantrao Dabhade to Bajirao, requesting the latter to pardon his brother Baburao and put him in the right path.*

---

१ यथास्थित.

No. 79] [31-5-1736 ?

छ १ सफर

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नाो कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखण करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले त्यावरून वर्तमान अवगत जाहाले. राजश्री स्वामीचे दर्शनास जावयाचा मजकूर लिहिला की अवश्येमेव जावे. राजश्री माहादाजीपंतास लिहिले आहे की त्याचें विचारे द्रव्यें देणे. त्यासी येथील वर्तमान तरी राजश्री स्वामीकडील हुजरे रा। धोंडो गोपाल व खासबरदार आले आहेत. जेष्ट सुध्ये ५ पचमीस निश्चय केला असे. द्रव्यें घेऊन स्वार होऊन जावे हा ईदेर्थी[1] आपणास कलावा म्हणून लिहिला असे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे. छ २९ मोहरम हे विनंती.

श्रीसांबचरणी
सोमाजीसुत
कृष्णाजी दाभाडे

¶*Krishnaji Dabhade to Chimaji Appa : informs the addressee of his intention to go with money and visit the King at Satara.*

---

No. 80] [24-3-1736

श्री

श्रीमंत राजश्री अपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुन वद्य नवमीपरियंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानतर दहेकाबा। दुसाला रुपये मातुश्री उमाबाई काकी याजकडे येणे, त्यास राजश्री वासुदेव जोशी त्याणी मातुश्रीसी करार करून आम्हास हाती दिल्हे. त्यास राजश्री दमाजी गाईकवाड याजकडील कारकून आला होता. त्यास तो छ १७ जिल्हेजी आज्ञा घेऊन गेला. आम्हीहि समागमे

[1] इत्यर्थ.

जावयासी आज्ञा मागत होतो. त्यास म्हणों लागली कीं आमचे पत्राचा जाब आलियावर मग तुमची रा करू. जाले वर्तमान सेवेसी लिा आहे. ज्याप्रा आपली आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करू. बहुत काये लिहिणे ? सेवेसी विज्ञापना हे विनंती.

¶*Visaji Bhikaji to Chimaji Appa with reference to the recovery of dues from Umabai Dabhade.*

---

*No. 81*] [*8-4-1736*

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चइत्र सुध नवमीपरियेंत स्वामींचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीनी आज्ञापत्र पाा, पावले. लिहिला अभिप्राये कलो आला. तेथे आज्ञा कीं मातुश्री उमाबाई काकी याणी आम्हासी दोहे महिनियांचा करार केला कीं जाते क्षणी दहेकचे रुपये साडे बेतालीस हजार देतो त्याचे वसुलास तुम्हास पाा. त्यास मातुश्रीस हटकिता किंवा नाही हे न कले म्हणुन लिा. त्यास आम्ही काही स्वामीसेवेसी अंतर कदापि करणार नाही. वारंवार तो हटकीतच आहो. आणि मातुश्रीसहि रुपयांची कालजी आहे; परंतु तिचाही उपाये नाही. यैवज सोनगडी ठेविला आहे; परंतु यांचे आज्ञेखेरीज काही हातास येत नाही. मुजरद कासीदहि रा केले आहेत. त्यास आठा चो दिवसी जासूद यावे यैसे आहे. उतर आलियाने रुा येतील. रा दमाजी गाईकवाड माघारे फिरोन बडनगर विशालनगर यांचे रोखे आले आहेत म्हणून वर्तमान आहे. अमदा(बा)देच्या रोखे गेले म्हणजे समागमे मातुश्रीचा कारकून घेऊन जातो आणि निर्गम करून घेतो. प्रस्तुत काळ लस्करांत माध्यान कालाचे पडले आहे. यैसा प्रसंग मातुश्रीचा आहे. बहुत काये लिहिणे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Addressed to Chimaji Appa on the recovery of dues from Umabai Dabhade.*

No. 82] [30-4-1736

छ १६ मोहरम

श्रीराम

राजश्री चिमणाजीपंडित गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले, पावोन वर्तमान आवगत जाले. रा विसाजी भिकाजी यानी साद्यंत वृत सांगितले त्याजवरून कलों आलें. सर्व प्रसंग आपल्याविगला आहे येसें नाहीं. आपलियाकडील येवजाची वरात गायेकवाडाकडे दिल्ही आहे. त्यास प्रस्तुत त्याजकडे वराताचा भरणा विशेप जाला आहे आणि ते मुलुकगिरीसहि गेले आहेत. जेष्ठमास ते सोनगडास आलियावर आपला येवज प्रविष्ट होईल. सदैव पत्र पाठऊन साद्यंत आर्थ लिहित गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ २९ जिल्हेज हे विनंती.

¶ *Umabai Dabhade agrees to pay the Peshwa's dues from Gujarat.*

---

No. 83] [11-5-1736?

छ १३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जेष्ट शुध चतुर्दसी शुक्रवारपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री अंताजी रघुनाथ[१] यास पाठऊन देणे म्हणोन आज्ञा, त्यावरून रवानगी केली आहे. परंतु त्याचें वृत यैकजेतें कीं आपली आज्ञा घेऊन

१ कावळे, मालाडचा.

कल्याणास येतां तलेगावास जाऊन मातुश्री उमाबाईसीं राजकारण करून सर्वश्वें त्याचे पदरीं पडावें, फिरंगणचा मनसबा त्यांजकडून सिधीस न्यावा यैसें करून कांहीं कापड व नख्ताचे यैवजी मोत्याचा तुरा व पदक यैसें घेऊन येथें आले. वस्ता गाहाण ठेऊन पैका करीत असतां आम्हांपर्यंत वस्ता आल्या तै समई तर्कहि आम्ही केला आणि वर्तमानहि कळों आलें त्यावरून मुदा हाताखालीं घालावे याकरितां तुरा गाहाण ठेऊन दीड हजार रुपये सिंपी कारभारी पुढें करून आणिला होता त्यास दिल्हे; आणि आपणांकडे हे वृत्त लेहून पाठवावे तों त्याणें जागजागा बोलला कीं ह्या वस्ता राजश्री रायानी आपणांस दिल्या आहेत. निमित्य कीं राजश्री आपास कळावयास कार्यास न ये. त्यावरून संदेह प्राप्त जाला होता. इतकियांत आपलेंहि पत्र घेऊन पोहचलें कीं त्यास समाधानयुक्त सांगोन बराबर माणसें त्याचीं नसलीं तरी आपलीं दाहा पांच माणसें देऊन पाठवणे म्हणून. त्यावरून आपणांसहि हें वृत विदित जाहालें यैसें चितांत आलें. रुजूमाझ्या पाहातां तथ्य याणीं त्यांजकडे राजकारण लाविलें यैसें आहे. त्यास आपले आज्ञेप्रमाणें याची रवानगी केली. परंतु हे परम चालक आहे. आपण दाभाडियाकडे राजकारण केलें हें स्वामीस व आम्हांस दखल जालें यैसें त्याचे ध्यानांत आलें आहे. कदाचित तलेगावास माणूस पाठऊन दाहा वीस श्वार आणून मार्गांतून परस्परें तळेगावास जाईल. आपले राज्याची कैद कळलीच आहे. याकरितां आधीं तों येक दोन रोज यास रवानगीस लावितों. तथापि याणी आग्रह केला तरी बराबर दाहा श्वार देऊन बोरघाटे लोहगड डावा घालून पाठवितों. आपण दाहा वीस श्वार पुढें खंडालिया पावतां पाठऊन घेऊन गेलें पाहिजे. आपण सर्वश्वें चालवीत असतां बेमानी करून तिकडे अनुसंधान लाविलें अशा मनुष्यास कैद करून ठेवावें यैसें ध्यानास जालें होतें. परंतु स्वामी शब्द लावितील यास्तव पाठऊन देतों. यास निर्बंध ठेविलियानें पुण्यामध्यें सुधां राहावयाचा नाहीं. येकादे स्थलीं ठेवावा नाहींतर कार्याचा नाश करील. आम्ही येथेंच कैद करून पर्वतारोहण करीत होतों, परंतु आपली आज्ञा नाहीं यास्तव लिहिलें असे. तरी प्रत्योत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*This letter refers to some intrigue of Antaji Raghunath Kawale with the Dabhades regarding the Bassein campaign.*

1134

No. 84]

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ २९ मोहरमपरियंत स्वामीचे कृपेकटाक्षे करून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर या प्रांतीचे वर्तमान तर मातुश्री उमाबाई यांणी राजश्री सदाशिव कासी याजपासून रुपये दाहा हजार घेऊन नासिकचे ठाणे त्याचे हवाला केले. वणीचे ठाणेयात माहानाद सुलतान फौजदार होता, त्याचा गला वीस खडी दास्तान होते तेही भरून आणिले व चार हजार नख्त रुपये घेतले. खांदेश प्रांतें हजार पांचसे राऊत रा केले आहेत. जागा जागा डवणा करितात. अवड्यापद्याकडील भागरे व दिघे गौळी राहतात, त्यास वलाऊन आणून वस्त्रे व सोन्याचीं कडी दोघा चौघांस दिलीं आणि त्यास किल्याचे राजकारणास तिकडे रवाना केले. कोणीकडील राजकारण केले हे न कले. त्यास तिकडील सूत्र येतांच राजश्री जावजी दाभाडे यासमागमे फौज रा बकोजी सरपाटील याची पागा व वळवंतराव टोंके यांची पागा देऊन अकोलेयासी जाऊन बसले आहेत. खादेशातीलहि स्तळ हस्तगत येकादे करावें म्हणून तरतुदेत आहेत. राजश्री चिमणाजीपंत व रा यादोपंत यांही रा वासुदेव जोसी यांजपासी करार केला कीं दोहो महिन्यांत रुा विसाजीपंताजवल देऊन रा करितों. त्यास यावतकाळपरियंत रुा येतां दिसत नाहीं, आणि आमची रा[1]हि गाईकवाडांकडे करीत नाहीं. ते म्हणतात कीं मातुश्रीचा रोख पाहू, त्यासारिखी तुमची रा करू. रुपये तो येतील, चिंता कांहीं नाहीं. परंतु दो तिही महिन्यांत येतील. आम्ही एकदोन वेळां निकड केली होती कीं देणे नसेल तर आम्ही श्रीमंत राजश्री राऊस्वामीकडे जाऊन दर्शन घेऊन येऊं. त्यास जाऊं तो देत नाहीं आणि या ग्रस्ताचे हाती आहे येसा अर्थ नाहीं. मोगलाईकडील आमची ठाणी उठवावी आणि बाईची बसवावी हाई विचार याही केला होता. परंतु मातुश्रीचे चितात कीं जें रायाचे विचारें जें होईल तेंच करावें. ससरुसीहून कचेस्वरबावांचे पुत्र जगोबा मातुश्रीस न्यावयांसी आले आहेत. त्यास पत्रें श्रीमंताकडे मातुश्रीनी रा केली आहेत. त्याचे उत्तर येईल त्यासारिखी तरतूद करावी. जाले वर्तमान सेवेसी लिा असे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापि.

¶ *Visaji Bhikaji reports Umabai's hostile activities to Chimaji Appa.*

---

१ खानगी.

No. 85] [1-6-1736?

छ १४ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत जेस्ट सुध त्रितीयापरियंत स्वामीचे कृपेकटाक्षेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर विश्रामजी जासूद याजबरोबर आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा कीं त्या प्रांतीचे व मातुश्री उमाबाई व राजश्री सेनापति व राजश्री सवाई बाबूराव याजकडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवणे म्हणून आज्ञा विशेष. मातुश्रीचें व गाईकवाडाचा तह आदियाप जाला नाहीं. सवाई तों हळदाणीस मोर्चे लाविले आहेत. मातुश्रीस आहेरणीस ध्यान स्वामीचें लागलें आहे. पुढें जर स्वामी त्याचा आंगिकार करून उभारणी करतील तर होईल नाहींतर कांहीं सरदारी राहाते यैसा अर्थ नाहीं. राजश्री गोविंद गोपाल गाईकवाडाकडे ठेविला म्हणून मातुश्रीचे चित्तांत विकल्प पडला आहे कीं राऊ आमची उभारणी करील कीं न करीत. येक दोन वेळां मला नेऊन पुसों लागली कीं पुढें आम्हास हातें धरून चाकराचें पारपत्य करील कीं न करी? गोविंदपंत काय निमित्य ठेविले? आम्ही प्रत्योत्तर दिल्हे कीं त्याचे मनामध्ये काये मनसुबा आहे, काये विचार करितो म्हणून उगाच अंगावर घेऊन मायेंत आणून चित्तांतील विचार घ्यावा आणि वरचेवर तुम्हांस सुचना करावी यास्तव ठेविला, त्यावरून संतोष पावली. सर्व वर्तमान विश्रामजी निवेदन करितां श्रुत होईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa, referring to the dispute between the Gaikwad and Umabai Dabhade.*

---

१ कामतेकर.

No. 86] [20-10-1736 ?
[1-11-1735

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामींचे शेवेसी

विनंती शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २९ जमादिलाखरपरियंत शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते नवपुरीं (सुखरूप) पावलों. मातुश्री बाईस पत्र देऊन ज्याजप्रमाणे आपण आज्ञा केली होती त्याजप्रमाणे साद्यंत वर्तमान निवेदन केलें. राजश्री कृष्णाजी दाभाडे व राजश्री काळोजी भोसले येसे उभयेतां राजश्री दमाजी गाईकवाड याजकडे गेले. मातुश्री नवपुरी लस्करांत आहेत. त्याजकडील कांहीं मजकूर ल्याहावा तर आदियाप त्याचा व यांचा मजकूर बोलीचा जाला नाहीं. हालीं आपलीं पत्रें मातुश्रीस होतीं त्याचें प्रत्योत्तर आपणांकडे घेऊन पाठविला आहे. पत्राचे साकल्यार्थ मनास आणून जेणेप्रमाणे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. मातुश्री व दमाजी गाईकवाड या उभयतांची भेटी जालियावर जो मजकूर होईल तो मातुश्रीचे * * सेवेसीं पाठऊन देतों. * * मातुश्रीनें आपणांस लिहिलें आहे, त्यास ते सतरुसीहून आपणांपासीं येत ते केलें पाहिजे. राजश्री बहिरजी भांगरे येथें आपले चाकरींत आहेत. सेवेसीं कळावें म्हणून लिहिलें असें. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर आसों दीजे हे विज्ञापना.

¶*The writer informs the Peshwa that the differences between Dabhade and Gaikwad remain unsettled though attempts are being made to bring about a reconciliation.*

---

श्री

२

विनंती विशेष. आपल्या चित्तांत आहे कीं यांचा बंदोबस्त करावा येसे आहे. त्यास तेणेप्रमाणेच होऊन येईल. येथें सर्व भरंवसा आपणाखेरीज दुसरा कोणाचा नाहीं. आपण ज्यास आज्ञा केली त्यास तेहि त्या प्रयेत्नांत आहेत. बहुत काय लिहिणे ? कृपा असों दिल्हीं पाहिजे हे विज्ञापना.

No. 87] [11-6-1736

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। जेष्ट सुध चतुर्दसीपरियंत स्वामीचे कृपेकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर मातुश्री व राजश्री दमाजी गाईकवाड याची जेष्ठ सुध त्रितीयेस भेटी जाली. आधरमान परस्परे जाला. दमाजीने सेनापतीस व मातुश्रीस दोन हती दिल्हे. मातुश्रीनेहि दमाजीस वस्त्रे व हती दिल्हा. पूर्वी पनासाचा करार केला होता त्याप्रा। गोष्ट ठीक जाली. प्रस्तुत पाच लक्ष रु। मातुश्रीचे पदरी घातले. सेवेसी कलावे म्हणून लि। आसे. आम्ही आपले रु। तगादा लाविला आहे. माहाराजाचे रु। आठा चो दिवसी रा। करणार. त्याबरोबर आमची रा। करू म्हणून मान्य केले आहे. येदा कर्जदारास तो पैसा देत नाही. प्रस्तुत आकरा लक्ष द्यावे यैसा करार दमाजी गाईकवाड याणी केला. आण आहिले (आपले ?) रु। त्याची निशा करून हवाले आपणाकडे घ्यावे यैसे केले आहे. आम्हीहि कार्य करून सेवेसी सत्वरच येतो. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji writes about the reconciliation of Damaji Gaikwad with Umabai and the Senapati which occasion was celebrated with an exchange of elephants and other rich presents. The letter gives us a glimpse into the mismanaged money-affairs of the Dabhades. The Peshwa's agent is pressing for the Peshwa's share.*

---

No. 88] [16-9-1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य सप्तमीपरियंत स्वामीच्या कृपेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर मातुश्री बाई अश्विन सुध त्रितीयेस स्वार होऊन देसीं येणार. सरकारचा यैवज तुळाजी जामदार याजबरोबर देऊन येका दो दिवशीं पुढें रवाना करणार आहेत. आमचाहि यैवज देऊन सरकारचे

यैवजाबरोबर रवाना करणार आहे. घडोन येईल तेव्हां खरें. त्रिवर्ग येकचित जाली. गाईकवाडहि सत्वर जावयासी खोलंबले आहेत. मोमीनखान व रणेकोपंत[1] येकत्र होऊन आमदाबादेस मोर्चे लाविले आहेत. शहरकोटास मोर्चे लाविले आहेत. दर्वाजे देखील बंद जाले आहेत; यास्तव गाईकवाडहि सत्वर या प्रांतास जाणार. मातुश्रीकरतां खोलंबले. पूर्वी नेमणूक गाईकवाडाकडे पनास लक्षाची होती. हालीं साठ सत्तरपरियंत यैवज नेमून सिलेदार व कर्जदार देखील वराता केल्या आहेत. सरकारचे यैवजाच्या वराता मातुश्रीवर होत्या. त्याही जामदाराचे गुजारतीनें यैवज नेमिला आहे. आम्हांस म्हणते कीं तुमचा यैवज रोख सरकारचे यैवजाबरावर देऊन तुमचाहि रवाना करीन. आमचा कांहीं हा कालपरियंत गाईकवाडावर यैवज नेमिला तों नाहीं. पुढें काय करील तें पाहावें. मनुशाचा कांहीं उपाये आहे यैसा अर्थ नाहीं. बहुत काय लिहिणे? कृपा निरंतर असों दिल्ही पाहिजे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji writes to Chimaji Appa that Renakopant and Mominkhan have besieged Ahmedabad where the Gaikwad will soon join them.*

---

*No. 89]* *[21-10-1736*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। अश्विन वद्य त्रयोदसीपरियेंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर स्वामीची आज्ञापत्रे येतात; तेथ आज्ञा कीं मातुश्री उमाबाई काकी याजकडे येवज येणे, त्यास निकड लाऊन रुपये घेऊन सत्वर रा। करणे म्हणून अज्ञा. येसियासी आम्ही तो रुपयाविसी निकड बहुत लावली आहे; परंतु समध मातुश्रीसी आहे. ईश्वरइछेने घडोन येईल तेव्हा खरे. मनुशाचा काही उपाये नाही. हुजरे व आम्ही रुसवा करून हलदाणीपरियेत गेलो होतो. त्यास समजावून आणिले कीं दिपवालीचे प्रतिपदेस येवज देऊन रा। करीन येसा करार केला आहे. जर येवज देऊन संतोषानरूप रवानगी केली तर उतम आहे. नाहीतर आम्ही व हुजरे उठोन येतो. सेवेसी कलावे म्हणून लिहिले आसे. हा कालपरियेंत काही सिलेदाराची वाट जाली नाही. राजश्री सवाई बाबूराऊ यासी सिलेदारानी हलदाणीचे गढीतून हाती धरून काढून

---

[1] रेणको आनाजी, पेशव्यांचा सरदार.

आणिले. कारभारी सनिध होते. त्यासी लताप्रहार करून उतम प्रकारे चतुर्भुज करून बाहेर आणिले. आठदहा दिवस बसविले. त्यासी मातुश्री व देवजी येकत्र बसोन विचार करून सवाईसहि घेऊन सोनगडास आणिले. सिलेदारासी करार केला की तुमचा निर्गम आम्ही करून देऊ, तुम्ही सवाईस घेऊन येणे. त्यावरून सवाईसहि समागमे घेऊ सोनगडास आले. देवजी बाहेर जाऊन सिलेदाराचे समाधान करून युक्तीने सवाईस गावात घेऊन आले आणि फाटक मना केले की लस्करचे माणूस गावात येऊ न देणे येसी ताकीद केली. मातुश्री काही येंदा देसी येता दिसत नाही. च्यार महिने रुपाहि आपणाजवल उगेच ठेविले. तलेगावचा विचार तो मातुश्रीजवल नाही. कुल येकतियारी देवजीवर दिल्ही आहे. येथील निर्गमास महिने तीन चार लागतील तोहि कोणी भरोसा मानावा हे तों नाही. आदियाप कोणे मनसबा विल्हेस लागला नाही. येदा खांदेसचा तो खरावी मांडली आहे. रोखे धारणगावपरियंत केले आहेत. प्रस्तुत त्रिवर्गे येकत्र जाली आहे. आहेर्णीस देवजी येऊन बसतो परंतु त्याच्यानेहि निर्गम होत नाही. दिपवालीपरियेत वाट पाहातो. काये आज्ञा ते केली पाहिजे. त्याप्रा वर्तणूक करून. बहुत काय लिहिणे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa, informing him of the troubles between Sawai Baburao and the army over the payment of dues.*

---

*No. 90]* *[1-11-1736*

पौ छ १४ सावान

## श्रीशंकर

### श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा कार्तिक वद्य नवमीपरियंत स्वामींचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर मातुश्री बाई व राजश्री सेनापति व राजश्री सवाई बाबूराउ या त्रिवर्गाचे वर्तमान तर सवाईस शरिरी सावकाश वाटत नाहीं. ते कूच करून दहेवलीस गेले. मातुश्री व सेनापति तो आदियाप स्वास्थानीच आहेत. येकादो दिवसी कूच करून रनालेयाचे रोखे येणार आहेत. राजश्री दमाजी गाईकवाड याणी निकड लाविली आहे कीं तुम्ही कूच करून नवापुरावर जाणे. मग जसे कलेल त्याप्राा विल्हेस लाऊ म्हणून म्हणतात. सवाईचे फौजेची तो पाच पंचवीस देऊन समजाविसी केली. कर्जाची विल्हे गोसावी यासी रोख चौथाई

द्यावी व आणीक किरकोळीं राजश्री अंतोबा नाा व दादो हरि व कृष्णराऊ माहादेऊ यासी रोख तिजाई द्यावी, बाकी राहील ते दो सालामध्ये झाडा करून द्यावा, येसा करार केला आहे. गोसावी याचा येवज बाकी राहील तो ज्येष्ठ मासी द्यावा येसा करार केला. चौथी तक्षीम रोख दिल्हे. सेनापतीकडील बारगिराची तो पाचपंचवीस करार करून पारखाचा हवाला दिल्हा. मातुश्रीकडील व सेनापतीकडील सिलेदारांची मात्र समजाविसी होणे आहे. तेहि मातुश्री गेलियावर करू म्हणतात. होता होईल ते पाहावे. आपला सरकारचा येवज मातुश्रीकडे येणे रुपये ४७५०० साडेसत्तेतालीस हजार. त्यापैकी रोख आम्हाजवळ रु २१००० एकेवीस हजार दिल्हे ते बाजिनस श्रीमंत राजश्री अपाकडे बईल भाडियाने करून माहाराजाचा येवज गेला, त्याजबरोबर राा केले आहेत. बाकी राहिले त्याची वरात गाईकवाडावर देणार आहे. त्याची वरात मान्य करून आपली चिठी आम्हास लेहून दिल्ही तर मान्य करितो. दुसरे सालचे मातुश्रीस हटकले. त्या साफ जाब देतात कीं तुम्हास आम्ही देतो त्याचा मात्र निर्गम करून घ्यावा, मग देणे येसे जाले तर त्याचीहि विल्हे करून देऊं. स्वामी या प्राते आले म्हणजे आम्हीहि भेटीस येऊं. भेटीनंतर सर्व वर्तमान निवेदन करून. राजश्री गोविंद गोपाल याणी सेवेसी लिा आहे त्यावरून श्रुत होईल. कारभार तो दुभासी आहे. अंतकर्णापासून नाही. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणे ? कृपा निरंतर असो दिल्ही पाहिजे हे विज्ञापना.

¶*Another glimpse into the finances of the Dabhades. His army is clamouring for pay. An understanding seems to have been patched up between Dabhade and his assistant the Gaikwad.*

---

*No. 91*] [*26-11-1736*

**श्री**

**श्रीमत राजश्री पंत**

**प्रधान स्वामींचे सेवेसी**

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष सुध पंचमीपरियेंत स्वामीचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर सुध द्वितीयेस मातुश्रीची व राजश्री दमाजी गाईकवाड यांची भेटी जाली..................तुश्रीस घेऊन राजश्री दमाजी गाईकवाड सोनगडास जाणार आहे. आदियाप काही उभयेताची बोली देणे घेणे यांची जाली नाही. स्वामीनी मातुश्रीस पत्रे पाा होती त्याची प्रत्योतरे घेऊन सेवेसी पाा आहेत.

पत्रावरून साद्यांत वर्तमान सेवेसी निवेदन होईल. राजश्री रामाजी कडूविसी लिा होते. त्यास बलाऊन आणून जे सागणे ते मातुश्रीने सागितले व राजश्री दमाजी गाईकवाड यासहि ताकीद केली की, रामाजी कडू पागा टाकून तुम्हाकडे आले आहेत त्याजकडे प्रधानपंताचे पागेचा हिसेब कितेक राहिला आहे तर तुम्ही त्यास येकदर न ठेवणे, त्यास निरोप देणे, म्हणून परिछिनवादे मातुश्रीने सागितले आहे. त्यास त्यानीहि मान्य केले की रामाजी कडू यास आपण निरोप देतो. नालबदी दिल्ही आहे. त्याची विल्हे करून घेऊन निरोप देतो म्हणून मान्य केले आहे. सेवेसी कलावे * * * असे. सरकारचे रुपये साडेसतेचालिस हजार देऊ म्हणून मान्य केले आहे. सोनगडास जाऊन आमचा निकाल निघाला म्हणजे तुमचे पदरी पैका घाल्लू म्हणून मान्य केले आहे. बहुत काय लिहिणे? कृपा निरतर असो दिल्ही पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji, Peshwa's agent in Gujerat, writes to the latter that Damaji Gaikwad had a meeting with Umabai Dabhade though money matters remain unsettled. Damaji has promised not to entertain Ramaji Kadu, and to pay off the amount due to the Peshwa (on account of his rights in Gujerat?)*

---

*No. 92*] [*12-12-1736*

**श्री**

**श्रीमंत राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यांसी.**

ऽ सकलगुणालंकर्ण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेाो कृष्णाजी दाभाडे दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणाकडील पत्र येऊन कुशलवृत्त कळो येत नाही, तेण्हेकरून चित्त सापेक्षित आहे. तरी ऐसे न कीजे. सदैव वार्तिकासमागमे पत्र पाठऊन सांभाळ करीत गेले पाहिजे. यानंतर आपला ऐवज मातुश्री बाईकडे होता, तो ऐवज राजश्री विसाजी भिकाजीजवळ त्यानी दिधला. तो आम्हाजवळ आसखेडीयास आला तो मारानिलेबराबर बदरगो[१] देऊन गंगातीरी कोठुन्यास प्रविष्ट केला असे. तेथोन आपणास प्रविष्ट होईल. सदैव पत्री वर्तमान लिहून पाठविणे. विस्मरण न कीजे. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे. छ १९ सावान हे विनंती.

¶*Krishnaji Dabhade to Chimaji Appa, sending money which was due from Umabai Dabhade.*

---

१ रक्षण करणारे.

No. 93] [20-12-1736

**श्रीराम**

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो येशवंतराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. चिरंजिव राजश्री बाबूराऊ दाभाडे सेनाखासखेल यांस समाधान वाटत नवते. याजकरिता सोनगडीहून पुढे लोहनेरास रवाना केले. औषध उपाय व दैवीउपाय बहुतच जाले. इस्वरे यश कोण्हास न दिल्हे. मार्गसीर्ष शुध त्रयोदसी मंदवारी देहावसान जाले. हे वर्तमान आम्हास मार्गी येत असतां कलले. भेटी देखील जाली नाही. येसे दुःखाचे वर्तमान तुम्हा समजावे म्हणोन लिहिले असे. जाणिजे : राा छ २७ साबान. बहुत काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Yeshwantrao Dabhade, Senapati, reports the death of his brother Baburao to Chimaji Appa.*

---

No. 94] [20-12-1736

**श्री**

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यासी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलक्रुत राजमान्य स्नो क्रुष्णाजी दाभाडे दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले पाऊन वर्तमान अवगत होऊन. बहुत समाधान जाले. येसेच हरघडी पत्री सांभाल करीत विसर केला न पाहिजे. यानंतर आपण येवजाचेविसी जासूद कागद पाठविले; तरी आपले कामाकाजास सेवेसी आपणाजवलोन अंतर पडते येसे नाही. आपला येवज कोठुहुन्यास गंगा-

---

(१) ५-१२-१७३६.

तीरी देखील राजश्री दादो हरि व राजश्री विसाजी भिकाजी याजबराबर राऊत बरकंदाज येसा बदरगा देऊन पोहचाविला असे. बहुत काये लिहिणे लोभ असो दांजे. छ २७ साबान हे विनंती.

सोमाजीसुत
कृष्णाजी
दाभाडे

मोर्तब
सुद.

*Krishnaji Dabhade informs Chimaji Appa that the sums due to the Peshwa have been sent with Visaji Bhikaji and Dado Hari.*

---

*No. 95*] [*4-1-1737?*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा**
**स्वामीचे सेवेसीं**

विनंती. सेवक चिमाजी सिवदेऊ[1] साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत पौष सुध १४ चतुर्दसीपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर येथील दरबारचें वर्तमान तरी राजश्री रघूजी कदमराऊ व कंठाजी कदमराव व गोजाजी कदमराव त्रिवर्ग बंधू रामेश्वरदेवल्यास भेटीस येका दो दिवसीं येणार. दाभाडी पाटण्यांवर[2] आले आहेत. त्याची भेट घेऊन नेमाड प्रांते पोट भरावया च्यार दिवस रवाना करणार आहेत व राजश्री देवजी ताकपीर स्वारीस रेवातीरीं प्रांतें तो गेले होते. तों तेथें खासकिलीचें[3] वर्तमान यैकोन मावारे फिरोन सुरतअठाविसीमध्यें येऊन तेथून मातुश्री उमाबाई यासी समाधानाचीं पत्रें व कारकून व भला माणूस पाठविला. त्याजबरोबर सांगोन पाठविलें कीं सातारियासी मातबर माणूस पाठवावें. सरकारकुनाच्या हाते दरबारचा बंदोबस्त करावा. राजश्री सेनापतीच्या मुलाचे नांवें खासखेल पद होये ते गोष्ट करावी. यासी खर्चवेंच लागेल त्याची अनकुलता होईल. यैसी कितेक समाधानाचीं पत्रें आलीं. त्यास याच्या विचारें ताकपिरास भेटीस बोलाऊन त्याजपासून सातारियाच्या खर्चावेचाची तजवीज करून राजश्री कृष्णाजी दाभाडे यासमागमे माहाराजांचा यैवज देऊन आपणापासी पाठवावे, आपल्या विचारें दरबारचा बंदोबस्त करावा यैसा विचार. मातुश्री बाई व राजश्री

---

[1] धायगुडे ? [2] खानदेशांत. [3] खासखेलीचे ?

सुभेदारें[1] याच्या विचारें यैसें आहे कीं आत:पर तुमच्या विचारें जें कर्तव्य तें करावें यैसें आहे. त्याचे आज्ञेवरून स्वामीस पत्र लिहिलें आहे. उत्तर आलियावर राजश्री सुभेदाराची व यैवजाची रवानगी आपणांकडे होईल. सविस्तर उत्तर सत्वर पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विज्ञाति.

¶*Attempts are being made to secure the title and dignities of Senakhaskhel for the son of Yeshwantrao on the demise of his brother Baburao.*

---

*No. 96*] [*7-1-1737*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवेसी विनंती. सेवक गोविंद गोपाल चरणावर मस्तक ठेवून कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येसी जे. येथील कुशल ता। पौश वद्य द्वितीया शाहार आमदाबाज येथास्थित असे विशेष. पहिले आपली आज्ञा घेऊन सोनगडास आलो तेथून लस्करात गेलो. लस्करासमागमे बराणपूरपरियेत होतो. त्यास तेथून श्रीमंत राजश्री राऊसाहेबी पत्रे देऊन राजश्री दमाजी गायेकवाड याजकडे रवाना केले. निमित्य जे बातमीची बातमी आनीक मातुश्री उमाबाई याजकडील पैका रुपये २६५०० साडेसवीस हजार नेमून दिल्हे आहेत याजनिमित्य पाठविले आहे. यैसियास बराणपूरचे मुकामीहून आज्ञा घेऊन आलो ते रा। देवजी ताकपीर सुरत प्रांते तडकेस्वरें[2] येथे मुकाम करून राहिले होते त्याची भेट जाहाली. त्यास पत्रे दिल्ही. वर्तमान सांगितले. त्याणी राकडे येथे पाठविले त्यावरून येथे आलो. याची भेट व रा। माहादाजीपंताची भेट जाहाली. पत्रे वाचून पाहिली. त्यास प्रस्तुत गलबल आहे. शाहारभावते पहिले रा। रेणकोपंत व मुमीनखान मोगल याणी मोरचे च्यार महिने लाविले होते. त्याणे जेर होता. सांप्रत याचे लस्कर आलियावर फारच जेर जाहाले आहे. गावात दाणे पाच सेर व गवत भारे १ रुपये ५ पडतात. बाहेर दाणे लस्करात पंचवीस तीस सेर व मुलुकात मणासी धारण आहे. याजमुलें आठा चो रोजा भंडारी पलीन जाईल ऐसे वर्तमान आहे. याचा तो करार अमदांबाज फत्ते करावी तेव्हा पुढे जावे. सुरतेचा बिघाड जाहला आहे. याजमुले रा। देवजी

---

१ कृष्णराव दाभाडे. २ ता. मांडवी, जि. सुरत.

ताकपीर तेथे राहिले आहेत. त्याचा सलुक जाहालियावर या प्रांतास येतील. तोवर शाहारचे काम निर्गम होईल. मग याची पत्रे व पुढे जे वर्तमान होईल ते सविस्तर लिहोन सेवेसी याच्या जासुदावरावर पाठवितो; व श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडे सविस्तर वर्तमान व याच्या पत्राची उत्तरे पाठऊन. येथील निर्गम जाहालियाखेरीज पैकियाची निकड करिता येत नाही. मजला राहिविले आणि जासुदास निरोप दिल्हा, याजमुळे जासुद सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Govind Gopal (Kamtekar ?) to Chimaji Appa, informs him of his arrival at Ahmedabad which was besieged by Mominkhan and Damaji.*

---

*No. 97*] [*24-1-1737 ?*

## श्रीराम

### श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक चिमणाजी सिवेदव कृताने (क) साष्टांग नमस्कार विनंती. येथील माघ शुध चतुर्थ भानुवासर मुकाम रामेस्वरदेवले स्वामीचे कृपेकरून येथास्थित जाणोन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले, पावोन बहुत संतोष पावलो. कितेक मातुश्री उमाबाई याजकडील मजकूर लिहिला तो त्यास निवेदन केला. त्याणी स्वामीस पत्र लिंहिले आहे त्याजवरून भावगर्भ विदित होईल. दरबारचा धरबंद करणे तो आपले विचारें करावा येसा मातुश्रीचा व राजश्री सेनापतीचा हेत मन:पूर्वक आहे आणि सिधसिही जागा हाच विचार जाईल; परंतु येथील कारकून मंडळीच्या मनात मात्र हा प्रसंग होऊ न द्यावा येसा मनसबा देणार हे वर्तमान सत्वरीच सेवेसी येऊन निवेदन करितो. विदित जाले पाहिजे. रा। देवजी ताकपीर * * * * नर्मदेआलीकडे आहे. यांच्या त्याच्या भेटी जेष्ठ मासाआलीकडे होता दिसत नाहीत. दरबारखर्चचा विचार यांस कागदीपत्री न ल्याहा. येथे समजावणार आणिखे प्रकारे समजावितात. होणे ते होऊन येईल. परंतु कागदीपत्री न ल्याहावे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Chimnaji Sivdeo writes to Chimaji that Umabai and the Senapati would be glad to have the addressee as their mediator to settle their affairs at Satara.*

1146

No. 98] [15-3-1737

पो छ १९ जिल्हेज.

## श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित गोसांवी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्रें पाठविलीं, पावोन सविस्तर वर्तमान आवगत जालें. राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांजकडील व दरबारचें वर्तमान लिहिलें व आमदाबाजेकडील काय खबर आहे ते लेहावी म्हणून लिहिलें. ऐसियास आमदाबाजेस राजश्री रेणको आनाजी, पांच हजार फौज व मोमीनखान दाहा हाजार फौजेनशीं वेढा घाळून होते. मागाहून राजश्री दमाजी गायेकवाड समशेर बाहादुर गेले; तेथील विच्यार मनास आणितां मास दोनमास हस्तगत व्हावयास लागतील. फौज भारी, पोट चालिलें पाहिजे. याजकरितां रेणकोपंत व मोमीनखान दाहा हजार फौजेनशीं तेथें ठेऊन सोरट प्रांते पोट भरावयासी गेले. माघारें फिरलियावर तेथील विचार मनास आणतील. दरबारचा प्रसंग आम्हीं आपणांस लेहावा, तर सर्व प्रकारें आपण तेथें आहेत. याजकरितां आम्हीं बेफिकीर असों. आपण ममतापूर्वक कितेक प्रकारें लिहिलें ऐसियास ते गोष्टी करून दाखवावयाचा समये संनिधच आहे. राजश्री सुभेदार[1] दरबारास रवाना केलें आहेत. त्यांची आपली भेटी होऊन साद्यंत अर्थ अवगत जाला असेल. मनोदयाप्रमाणें प्रसंग सिद्धीस जावे तेच गोष्टी आपण करतील हा पूर्ण भरवसा आहे. सांप्रत राजश्री पंतप्रधान कोणेस्थळीं आहेत? त्याजकडील नवीन वर्तमान आलें असेल तें लेहून पाठवावें. राजश्री खंडो बाबाजी जमेनीस यांनीं सविस्तर सांगितले, त्याजवरून कळों आलें म्हणून लिहिलें. ऐसियास हल्लींही मशारनिलेची रवानगी लौकरीच करितों. यांचे भेटीनंतर तपशिलें अर्थ कळों येईल. बहुत काय लिंहिणें? लोभ असों दीजे. छ २३ जिल्काद. हे विनंती.

¶*Umabai Dabhade writes to Chimaji Appa explaining how things were managed by Renako Anaji and Mominkhan in Ahmedabad. She makes inquiries about Bajirao and his campaign.*

---

१ कृष्णाजी दाभाडे.

No. 99] [2-4-1737

छ १३ मोहरम जावसूद

श्री.

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी
यांसी

॥ℴ

श्रीसकलगुणालंकरणं अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो॥ कृष्णाजी दाभाडें दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखण करीत गेले पाहिजे विशेष. आपणांकडील पत्र आलें त्यावरून लिहिलेप्रमाणें सर्व कलों आलें. लग्न तों वैशाख सुध्य ११ जाहालें. याउपर सातारा जावयाचा विचार आपले विचारे होईल त्याप्रमाणे करून. मातुश्री उमाबाई यांचा मनोदये आहे तों येकदेसीं नाही. येविसी आपण मुजरत येक जोडा जासुदांचा बाईकडें पाठऊन, त्याचा कागदपत्र निश्चयेकपूर्वक आणऊन आपलें विचारे आपण आम्हांसी लेहून पाठविले पाहिजे. त्यासारिखे सातारा जावयाचे करून. ये * * विस्तारे ल्याहावे यैसे नाही. सर्व प्रकारे आमची इमारती आपणा उभयेतावरी आहे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे. छ १२ मोहरम हे विनंती.

(अस्पष्ट) (मोर्तब सुद.)

¶*Krishnaji Dabhade informs Chimaji Appa of his intention to proceed to Satara.*

---

No. 100] [16-12-1738

श्री.

राजश्रियाविराजित राजमान राजश्री
विसाजीपंत स्वामीचे सेवेसी.

सेवक गोविंद गोपाल कृतानेक नमस्कार विनंती उपर. सुरतेस खरीदीबदल श्रीमंत राजश्री आपाही तुम्हाकडून रुपये १०००० दाहाहजार देविले ते आम्हास पावलेयाचे पत्र उंदीरखेडियास पाठविले आहेत ते तुम्हास पावेल. रुपये नवापूरचे मुकामी घेतले असेत. राजश्री दमाजी गाइकवाड याजकडे पइकाचा यैवज

1148

मातुश्री उमाबाई याणी देविला. त्यापैकी सदरहू रुपये पावले. बहुत काय लिहिणे? शके १६६० कालयुक्तनाम संवत्सरे मार्गेस्वर वद्य द्वितीया मंदवार. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govind Gopal Kamtekar to Visajipant, regarding purchases at Surat.*

---

*No. 101*] [*4-8-1739?*
[*14-9-1738?*

पौ छ २९ जोवल.

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी.

जाबसूद

सेवेसी विज्ञापना. गोविंद गोपाळ चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ ९ माहे जमादिलोवलपर्यंत यथास्थित असे विशेष. माहाराजांची आज्ञा घेऊन स्वार जाहलों ते मातुश्री उमाबाईकडे रामेश्वरदेवलीयास आलों. त्यांची भेट घेतली * * * वर्तमान सांगितलें. त्याउपर त्यांचे पत्र राजश्री दमाजी गायकवाड यास घेऊन सोनगडास आलों. याची पत्रें दिल्हीं, वर्तमान सांगितलें. मग अरबांच्या तलाशानिमित्य रा। रेणकोपंत व बडोदे भडोच येथे पत्रें पाठविली. आणि रु॥ २६५०० साडेसवीस हजारपैकीं दाहा हजारांची वरात घेऊन सुरतेस आलों. कोसांबेवर येऊन राहिलों. तेथून अरब लोकांचा तलास बहुत केला. येथील अरब अवघे मोमीनखान याजकडे गेले. शाहरात थोडेबहुत आहेत ते मोगल बाहेर निघो नेदी. परंतु त्याचाहि तलास केला आहे. शाहरास जावयाची परवानगी पाच साहा रोजा आमची जाहली. मग शाहरात गेलो. मोगलाचा दिवाण लालचंद याची भेट घेतली. आपले पत्र होते ते त्यास दिल्हे. वर्तमान सांगितले. त्येगबेरखाची भेट न जाहाली. दिवाणानें कामकाज येणेप्रमाणें कबूल केले आहे. गायकवाडाच्या पत्रानें कामकाज न होय. मोगलासी व याची मनापासून सलूक नाहीं. याजनिमित्य आपल्या कितेक गोष्टी एकांतीं दिवाणानें सांगितल्या. मग त्यास आपले कामकाज पुसिले. अरबाचा मजकूर तर मिळत नाहीं म्हणाला. तुम्हास मिळतील तर ठेवणें. अजीपावेतो चाळीस पनास माणूस मिळाले आहे. परंतु करार केले नाहीं. अनिकही मिळतील. काही आनिक माणूस पठाण व खान * * * सी माणूस मिळते असे ते आठा चार दिवस * * * *

करून कांही अरब व हिंदुस्थानी ऐसे सेवे * * * * ना करितो. अमदाबाजेस व बडोदे व भडोचं व खंबाइत येथे पत्रे गेली आहेत. रा रेणकोपंतास त्याचे पत्र व मीही एकपत्र लिहिले आहे ते मिळतील. पांच ( फाटलें.) * * महिना खर्ची देऊन पाठवणे म्हणून बहुत प्रकारें लिहिले आहे. तिकडून काहीतरी येतील. हिंदुस्थानी माणूस ठेवावयासी आज्ञा नाही. परंतु शहाने रोप * * * * वे तो ठेऊन मर्द माणूस पाठवितो. आनीक (फाटलें) * ज्ञ होईल तर ठेऊन महिना रुा सात आठ (फाटले) गतात. आरब महिना तेथील कौला(?) प्रमाणें * * * नाहीत. जाजती काही पडेल. प्रस्तुत कबूल करून ठेवितों. तेथें आलियावर जे करणे ते करावें. जिनस (फाटलें) ति निमित्य राजश्री बाबूजी नाईकाकडील गुमास्ता तो आला नाहीं. जिनसाच भाव तरी मनास आणिला येणेप्रमाणे:

| लोखंड वजन पके. | वजनी जिनस वजन पके. |
|---|---|
| ८ खजेरी दरमणी रुा | ८ गंधक उटीया ०१ दरमणी रुपये. |
| १० विलदी दरमणी रुा | १० राळ चंदुस ०१ दरमणी |
| ११ इग्रजी दरमणी रुा | |
| बाकी १ वजन पके ००१॥ त्याचा रुपया १०≡ | ० |

येणेप्रमाणे निरख आहे आणि येथे मिळे * * * * तका घेतला, तितका मिळेल व जकाती खेरीज * * * र निघेल. मोगलाची परवानगी घेतली त्या * * * * कबूल केले. बाहेर काढून देतील व गायकवाड * * * गोवरीपावेतो जिनस पाऊन द्यावयाचा करार केला. येणेंप्रमाणें जिनस प्रस्तुत खरिदी करावा. प्रज्यन्य काळचे गाडे चालत नाहीं म्हणून न घेतला. आज्ञा जाहली तरी * * * * * * जाहलीयावर रवाना गाडे भरून करितो. दारु व शिसे तो मिळत नाही. इजारा मोगलाचा आहे, याजकरितां त्याणी तो नाही म्हटलें, परंतु शिसे चोरीने काही मिळाले तर घ्यावे की काय व कांही दारूही यांचा भाव येण (फाटलें) दारु उत्तम दोन सेर पावणे दोनशेर प्रमाणे शिसे दोन * * * दोन प्रमाणे पके मिळेल, याची आज्ञा करावी व * * * जेजाला तो मिळत नाहीं. हातगरनाला पाचसे लिहिल्या होत्या त्याचे नाव काय ते येथे समजत नाहीं.

मोगलांच्या कितेक गोष्टी लालचंद दिवाण यानी सांगितल्या आहेत. त्याचा भावार्थ, आपलें येणें या प्रांते होईल तर उत्तम. जिनस घ्यावयाची आज्ञा जाहली तर त्येगबेरखानास एक पत्र व लालचंद दिवाण यास एक पत्र. त्याच्या पत्रांत, गोविंद गोपाळ याणी तुम्हाकडील वर्तमान कितेक लिहिले होते तरी कांहीं चिंता नाहीं. पुढे जे कर्तव्य ते करून. याउपरहि गोविंद गोपाळ यास लिहिलें आहे. तुम्हास सांगतील म्हणून लिहिविलें पाहिजे; व काही दारू, सिसे, बाण, याजविसीं त्येगबेरखानास ल्याहावें. लिहिवितील त्याप्रमाणें माझे पत्री लिहिले पाहिजे. त्यासारिखे तेथे बोलावे लागेल. दाहा हजार रुपये दिल्हे आहेत, यांपैकी माणसे मिळतील त्यांस कांहीं खर्च होतील बाकी काय लागले तरी रुो साडेसोळा हजार राहिले, तेही देतील असें आहे. जिनस खरिदी करावयाची आज्ञा जाहलीतर उतम, नाहीतर रुपये अवघे वसूल जाहलेवर हुंडी करावी कीं काय, हुंडनावळ पडेल त्याची आज्ञा पाहिजे. अरब बहुत मिळतीलसा भरवसा नाहीं. जेथवर होईल तो विचार करीतच आहे. आठा दिवसांत जमा होतील ते रवाना करून मग सोनगडास जातों. आपणाकडील पत्राचे उतर आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. जिनसाची यादी तेथील येणेप्रमाणे आहे परंतु

| लोखड खंडी | गंधक खंडी | राळ खंडी | वाकिया सुमार |
|---|---|---|---|
| २९ | १० | ९ | २००० |

परंतु किती जिनस घ्यावा ते आज्ञा करावी मोगलास व दिवाणास पत्रे बहुमानाची ल्याहावी. पहिल्या पत्राचें उतर त्याणी दिल्हे ते सेवेसी पाठविले आहे. मोमीनखान व रेणकोपंत यासी बिघाड जाला होता. एकदोन कजिये बहुत जाहले. माणसें याची त्याची मिळोन दोन तीनसे मेली. सलूक जाला आहे. पुढे निभाव होतां दिसत नाहीं. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Gopal (Kamtekar ?) writes news of the situation in Gujarat and solicits orders for the purchase of ammunition and for entertaining more men into service.*

---

*No. 102]* *[17-3-1739*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री आपा स्वामीचे सेवेसी,

विनंती. सेवेशी आज्ञाधारक गोविंद गोपाळ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता. छ १७ जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालों ते खडकेबौरे येथें आलों, तो

वर्तमान आइकिलें की राजश्री देवजी ताकपीर कूच करून बडोदियाकडे गेले. त्यावरून परभारे फुलवडी नजीक मांडवी येथे गेलो. लष्करची गांठ पडली. पत्रें व वस्त्रें त्याची दिल्हीं. तेथून समागमें नर्मदातीर बावापीराचा घाटपावेतो गेलो. तेथें दोन मुकाम जाहले. तेथें सविस्तर कितेंक मजकूर त्याणी पुसिला. आज्ञेप्रमाणें सांगितलें. ऐसियास याचे येणे तो प्रस्तुत राहिलें याजकरितां राजश्री माधवराव निवाजी आपणाकडे रवाना केले आहेत. हुताशनीकरितां सोनगडास आलों. राजश्री देवजी ताकपीर याणीं आज्ञा केली कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधानाचे दर्शण आधी घेऊन मग आपणाकडे जाणे. याजकरितां छ मजकुरी सोनगडाहून खानदेशांत लष्करांत गेलो. तेथून श्रीमंताचें दर्शण घेऊन सेवेशी येतों. भेटीनंतर सर्व विदित होईल. शेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना. राजश्री माधवराऊ हे पूर्वी श्रीमंत राजश्री रायाकडे पाठविले होते ते गृहस्थ. हे विज्ञापना. राजश्री दमाजी गायकवाड हजार राऊतनिसी बडोदियांत आहेत. वरकड अवघी फौज घेऊन राजश्री माहादाजी गोविंद कछ भुज या प्रांते गेले आहेत.

¶*Govind Gopal (Kamtekar ?) writes to Chimaji Appa news of an expedition into Gujarat and Kathiawar, of which few details are known at present.*

---

*No. 103*] [*27-4-1739 ?*

नकल.

श्री

राजेश्री तुबाजीपंत दाजी गोसावी यांसी

ﾟ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो बावाजी बलकवडे रामराम विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १९ मोहरम जाणौन आपले स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. त्याहावया कारणे यैसीजे. गंगाभागिरथी मातुश्री उमाबाई दाभाडे यांच्या लोकानी येऊन किले पव्याखालें दंगा केला. पेठेस दाखल जाहले. त्यास आमचे लागे पव्याचे होते ते आम्हाजवल आले आहेत. यैशामध्ये फौज पांच सातसे माणूस घेऊन याल तर किल्यावर सदरेस नेऊन पोहचिवितो. त्यावरून आंम्ही दाहावीस माणूस लाग्याबरोबर देऊन ते लागास चौकीस पाठविले आहे. तर आम्हाजवळ दोन अडीचसेह माणूस आहे आणि तुम्ही आपणाजवळून रा। रेणोराऊ यादव आले आहेत याजबा। माणूस आहे त्यातील यैसे पाचसे माणूस बरखंदाज फार करून

यैसे पाठविले पाहिजे. आक्षत्रितियेचे मुहूर्त आपले निशाण चढेल यैसा विचार आहे. तरी तुम्हीं रातोरात लोक व राऊत पायेलोक पाचसेपरयेंत रातोरात पांढुरलीचे वाटेने उद्यां संध्याकाळीं पांढुरलीस येऊन पोहचे ते करणे. तेथे आम्ही चौकी ठेवितो. तें आम्हाजवळ दव्यास घेऊन येतील. काम खामखा ठीक आहे. तरी आनमान न करावा. जर आनमान कराल तरी काम हांतचे जाईल यैसे समजोन आगत्य पाचसे पावलोक व येकदोन करणें असले तर व दोनिसे राऊत यैसे आगत्यरूप पाठवणे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती. उद्यां सनवारीं संध्याकाळी दोनी घटिका आवसीचे रात्री पांढुरलीस बरखंदाज सामानपोस चांगले कैदेने चालत यैसे पाचसे व राऊत दोनसे यैसे पाठवणे. राऊत पांढुरलीस येक दिवस ठेऊन पावलोक दव्यास घेऊन जाऊं. मग राऊतास इशारत करू तेव्हा राऊत येऊन पोहचतील. जरूर जाणून लिहिले आसे. हे गोष्टीस अंतर न करणे. लौकर रवाना करणे हे विनंती. श्रीमंतांचा आपणांस शब्द न लागे ते गोष्टी करणे हे विनंति.

¶*Bawaji Balkavde asks Tubajipant to come to his help to withstand the attack made by the men of Umabai Dabhade.*

---

*No. 104*] [*1740?*

**श्री**

पुा श्रीमंताचे सेवेसी

विनंती येसीजे. उमाबाईन आडागड घेतला आणि सोनगडास वेढा घातला. जावजी दाभाड तेथे आहेंत, पुढे चालणेस लागली आहेत. मुलकचे जप्तीचा चवनों[1] लागला आहे. गड किलियाचाहि लागला. भलत्या गावास रोखा पाठवितात की मोगलाइपैकी सेंभर रुपये देणे. पाटील कमाविसदार बोभाट आणून रदबदल करितातीं. रुपये मारता मारता घेतातीं. उमाबाई म्हणते की आपणास ठाऊक नाही आम्ही व मल्हारपंती त्यासी बहुताप्रकारे सांगितले. तीं म्हणतात की बराबरी बेत्तीस परगणे व बागलाण रायानी जप्त केली. आम्ही भलीं की कोठे ठाणे बैसविले नाही. तीन ठाणी आमची आहेत. खानदसची ठाणी उठतील तेव्हा आम्हीहि उठऊ. हा मुलूक पुढे राहात नाही. हे विज्ञाप्ति.

¶*Letter addressed to Bajirao describing the depredations started by Umabai Dabhade in the region of Khandesh.*

---

१ संवय.

*No. 105*] [*13-4-1740*

श्री

राजश्री चिमणाजी पंडित

गोसांवी यांसी

ऽ सलकगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें, पावोन वर्तमान अवगत जाले. नासरजंग यांसी राजश्री राव यानी स्नेहाचा विचार आविलंबिला आहे, तुम्ही त्यांजकडील ठाणीं घ्यावी यैसें नाही. मोगलाईचा आमल बंद न करितां आंकोलाचें ठाणे व वणीचे ठाणे उठवणे. मोगलाईचा आमल खालसा करणे, तो राव करितील. तुम्ही मोगलाईच्या आमलासीं कजिया करावासें नाहीं म्हणून कितेक तपसिलें लिहिले. यैसीयास मोगलांसी स्नेह राखावा हाच आमचा मनोदय आहे. राजश्री बाजीराव पंडित प्रधान यानी बऱ्हाणपुरापासून खानदेश-पर्यंत ठाणी बसविली. मोगलाईकडील आमल बंद करून वसूल घेतला. आम्ही दों चौं परगणियांचा बोलीचा विचार करणे तो राजश्री मल्हारपंत याच्या विद्यमाने केला आसेल, येविशई राजश्री पंतप्रधान यांचीहि पत्रें आसतील. तुम्हाकडील ठाणीं बसलीं असतां आम्हाकडील दों तीं ठाणियांचा विचार लिहिला, याजवरून आपूर्व वाटलें. माहालांचा बंदोबस्त तर ज्यांचे मोकासे आहित त्यांस करावा लागतो. मोगलाईचा आमल खालसा ठेवणे तर धणीं ठेवितील, तूर्त ज्यांचे मोकासे आहेत त्यास बंदोबस्त केलाच पाहिजे, राज्यावर परचक्र आलिया त्यांच्या पारपत्याची तरतूद आम्हास करावी नलगे, ऐसा तों आर्थ नाहीं. आपण शब्द लाऊन लिहिलें. आपूर्व गोस्टी आहे. तुम्हाकडील ठाणीं तमाम उठलीयावर आम्हाकडीलहि उठविली जातील. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ २६ मोहरम हे विनंती.

¶*This letter from Umabai Dabhade to Chimaji Appa is significant of the political and administrative confusion created by Shahu's easy going nature. Umabai Dabhade, the able wife of Senapati Khanderao Dabhade, strives to maintain her rights against the grasping policy of the Peshwas. "Do you mean," she asks the Peshwa, "that we should take no steps to repel an enemy?" The reference to the treaty of Bajirao with Nasirjung in the letter gives a clue to the date of the letter itself.*

1154

No. 106] [21-10-1740

शाहु दप्तर रु. नं. २९ पैकीं

कीर्दीस बार छ १० साबान
सुा इहिदे आर्बेन मया अलफ.

श्री.

यादी बाईका निा दाभाडे. येविसीपत्रे.

गंगाजल निर्मल गिरजाबाई कोम त्रिंबकराव दाभाडे. गंगाजल निर्मल ताराबाई कोम बाबूराव दाभाडे.

¶*Girijabai was Trimbakrao Dabhade's wife and Tarabai was Baburao Dabhade's wife.*

---

No. 107] [4-1-1751

श्री

अपत्यें तीर्थरूप राजमान्येयाविराजित राजश्री स्वामी
राजश्री स्वामी वडिलांचे शेवेसी

अपत्ये अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की पौष वद्य चतुर्थी प्राथकालपा प्रसंगीचे वर्तमान तर सेनापाति इंडीस आहेत. अरब व हरजी घारे व सिदीचे सामान आवघे पायेदल मानूस मिलोन पंधराशेपा फौज घरपागा व सिदी व काही काही सिलेदार मिलोन उतम मध्यम मिलोन पाचशेपा. परंतु गाईकवाडाची वार्ता आयेकोन समाधान दिसते. परंतु चितापासून हर्षामर्ष करावा हा हेत दिसत नाही. उभयेता मिलोन येकांती विचार की हर्षामर्षात काही उतम नाही. परंतु इतका लोकिक करावा हे नवते. लोकिक त्याचा जाला की थोरास थोर समयास रक्षितात. कांहीं न्यूनपूर्ण तर कीं काही कोन्हेचे फितव्यात आसो तर हा प्रसंग पाा तो विचार तर आम्हापासून जाला नाही. ताकपीर साहित्य होते ते आले (?) शैन्यास येथे कांहीं फौज फार नाही. लोकिकवार्ता तर गाईकवाडासमागमे तोफगाडी पासा आहेत व बानाचे ऊट बावीस आहेत. दारूगाडिया पंधरावीस पावेतो आहेत व बारा हजारपावेतो फौज व पायदल दोन हजारपा आहे. लोकवार्ता आहे. परंतु दरबारची वार्ता तर याप्रमाने नाही. दारुगोली सामान व पायेदल व फौज सरंजाम चांगला आहे हे वर्तमान दरबारी आहे. मातुश्रीकडील वर्तमान काये येते त्याप्रमाने वर्तनूक करावी हा विचार यांचा आहे. रोजमुरा

वडिलानी पाठविला व शेला व पागोटे पाठविले तें पावले. घोडीस तटास बेगमीस काही नाहीं. हिशेबहि वडिलाचे चरणापासी पाठविला आहे. दानियास वेगमी नाही. पोटाची बेगमी जाली आहे. हिशोब वडिलानी पाहोन आज्ञा केली पा. बसिला तर चरण आपले आहेत, इतर कोन्ही नाही. याविशई विनंती मान्य केली पा. उधार देत नाहीत. मागील भरणा जाला. अनमान करितात परंतु वडिलाचे आसीर्वादे करून.(?) वहुत काये लिहिणे हे विज्ञापना. पुढेही प्रसंगी वर्तमान होईल ते शेवेसी (पाठवीन) हिशोब शेवेसी पाठविला. उतर पाहिजे हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar writes to the Peshwa news about the dissensions between Dabhade and Gaekwad. Both sides while preparing for a struggle are, the writer adds, anxious to settle their differences amicably.*

---

*No. 108*] [*28-1-1751*

**श्री**

श्रीमंत तीर्थरूप राजमान्ये-
याविराजित राजश्री नाना
स्वामी वडिलाचे राजश्री
भाऊ स्वामी वडिलाचे शेवेसी

आपल्ये चरणरज आंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की, माघ सुध त्रयोदसीपरियेत मुा तलेगाव कुशल. यानंतर प्रसंगीचे वर्तमान की, राजश्री सेनापति बाहेर निघ(णा)र हा निश्चये आहे. कोणे दिवसी हा करार नाही. परंतु निघणार हा निश्चये आहे. लक्ष्मण जाधव सतरुसी गेला, तो आला. सिरपाव, कडी दोन व तुरा काही वस्त्रे घेऊन आला. शेनापतींने घेतली नाहीत. सतरुसीहून जाब होता कीं, तुम्ही जैसे कळेल त्याप्रमाने येऊन पोहचने. येथे आलियावर जो सरंजाम पा तो सिध आहे. लक्ष्मण जाधव यास उतर दिधले की, ते जैसी गडावर आहेत त्याप्रमाने आम्हीहि बसोन असावे, हे पुरवत नाही. कुटुब व मातुश्री लस्करात आहेत (आ)नी आम्ही सतरुसीस जावे, हे विहित नाहीं. आनी मातुश्रीनी क्रिया शपत दिधली आहे. भ्रष्ट व्हावे हे उतम नाही. मातुश्रीनी वचन केले तें आपणा(स) येकरूप अतर होत नाही. गोसावी

याजपासून घोडी घेतली त्यापैकी उतम मध्यम निव(ड) होत आहे. बसावयास नेमनूक करितात. काही बरोबर होती तेहि इंदुरीस नेली. जुली ( अपूर्ण ).

¶*Antaji Vishvambhar writes to the Peshwa about Dabhade's determination to move out, and further informs him of the latter's refusal to accept the presents sent from Satara.*

---

*No. 109]* *[May 1751 ?*

**श्री**

श्रीमंत तीर्थरूप राजमान्येयाविराजित राजश्री नाना स्वामी
राजश्री भाऊ स्वामी
वडिलाचे शेवेसी

आपले चरणरज अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की सोमवारी संध्याकाली मातुश्री आलियावर मजकूर की राजेश्री शेनापतीची भेटी जाली, मजकूर सर्व विदित केला. त्याही उतर शेनापति यानी केले की तुम्ही वडिलपनें ज्याप्रमाने आम्हास सांगाल त्याप्रमाने तिलतुल्य आपण अंतर करणार नाही. सर्वेही गुजरात तुम्ही कबूल केली असती तर तुम्हा वडिलावेगळे अधिक आपणास काहीहीं नाही. त्याहीवर मातुश्रीनी भाशन केले की श्रीमंत यानी इतका अत्यग्रह हा येक मानसावर करावा हे विहित नाही. कोन्हाचेही मिलनी नसता आम्हावर क्रोध करावा हे उतम नाही. पूर्वीहि कैलासवासी उभयेता होते त्याचे आमच विरुध बहुत प्रकारे होते. परंतु त्यानी माझे मातुश्री स्वमुखे म्हटले त्याप्रमानेच निर्वाह केला. त्यामागे यानी आमचे चालवावे आनी आव्हेर न करावा. मान रक्षावा. सर्वेही गुजरात यानी द्यावी होती याप्रमाने की आम्हापासी कारभारी कोन्ही नाही. आमची अवच्छा हे जाणून आमचा आगीकार जाणून ज्याप्रमाने सर्व मुलूक मालवा त्याप्रमाने गुजरातही आपलीच म्हणून म्हातारपनीं आमची गोष्ट व लौकिक रक्षूण हा प्रसंग संपादून चितास ज्याप्रमाने करणें तें करावे होते. परंतु न केले उतम केले. पूर्वीही ज्या ज्या क्रि(या)शपत जाल्या त्या आद्यापि जतन आहेत. हाली आताही केली आहे तिजला काही कदापि विकल्प करणार नाही. वचनास चुकणार नाही. याप्रमाने येकांती विचार जाला तो वडिलाचे शेवेसी. याहीवरही वृत्तांत अधिकोतर आनि लौकिकवार्ता तर अनिवार त्या वडिलास लिहिल्या नाहीत. परंतु येकांती याप्रमाने मजकूर जाला.

आपल्यास रोजमुरा पा(व)ला नाही व घोडीस व तटास व पोरगियास रोजमुरा व दानी पोटास कांहींही पावले नाही व जासुदासही रोजमुरे पावले नाही. स्वामी वडील आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. व आंबिकाबाई, ताकपीर काही तलेगावास आली नाहीत. मातुश्री जाणार इंदुरीस आहेत. त्याहीवर विचार कलेना हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar informs the Peshwa of Umabai's chagrin at being dispossessed of the province of Gujarat in spite of solemn oaths and promises to the contrary.*

---

*No. 110*] [*7-11-1751 ?*

**श्री.**

श्रीमंत तीर्थरूप याविराजित
राजश्री स्वामी वडिलाचे
शेवेसी.

आपत्ये चरणरज आताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की, पूर्वीहि मातुश्रीचा विचार शेवेसी लिहीत गेलो. मार्गेस्वर सुद १ प्रतिपदा रात्रौ सर्व मडली येकत्र होऊन व बधूजी व देवजी ताकपीर व कारकूनहि मडली येकत्र होऊन निश्चये की, मगलवारी मूल नक्षत्र सा घटकामधे यात्रेस यावे. परस्परे भेटी होऊन, कितेक कल्पविकल्प निवारण होऊन, हा निकल्प करून, यात्रेस येणार. पूर्वीपासून ममता चितापासून आहे. व राजश्री मल्हार गोविदहि आले. यात्रा करून सोमवारी दोन तीन घटका दिवस या समयास आले. शेवेसी विदित होये. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of Umabai's intention to proceed on a pilgrimage.*

---

*No. 111*] [*1751*

**श्री**

श्रीमंत तीर्थरूप राजमान्ये
याविराजित राजश्री नाना
स्वामी राजश्री भाऊ स्वा-
मी वडिलाचे शेवेसी.

आपत्ये चरणरज आताजी विश्वंभर करद्वये जोडून सिरसाा नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना की दोन तीन पत्रे वडिलाकडे आली. परंतु उतर पावत

नाही. रुद्राजी पोरगा आला. त्याजबरोबर उतर पाठविले तें पावले नाही. आम्हाकडील जासूद् आगर आवाजी ना‍ा याजकडे उतर येत आहे तें पावते. नाहीतर उतर पावत नाही. प्रसंगीचे वर्तमान आपूर्व काही नाही. ताराबाई-कडील हुजरे आले होते. त्यास साफ येकाती उतर दिधले की, आम्ही काही पूर्वीहि कोन्हाचे प्रसंगात नाही. हालीहि आम्ही आपले उपासाने व सिबदीने हयेरान आहो. आम्हापासी पैकाहि नाही. फौज काही धरती नाही. आनी तुम्हीच आधी कर्म केले की, सनदापत्रे तुम्हीच देता, परस्परे कजिया लाविता. तर यां मजकुरास आम्ही नाही. याप्रमाने उतरे करितात. ‌राजश्री महिपतराव कारकून ताराबाईकडील पागेवर आहे. तो आम्ही येके स्थली सेजारी राहिलो आहो. हुजरे श्रमी होऊन आपणादेखत स्वार होऊन गेले. यावयाचा मजकूर होता तो, प्राथकाली राजश्री आपाजी गणेश व वधूजी व कृष्णराव व शेनापती येक स्थली होऊन राहिला हे दिसते. येकाती मजकूर जाला तोहि पुरता-शोध करून शेवेसी या मंडलीवेगले आपणास तहकीक केले पाहिजे व येका तीहि कोणे कोणे रीतीने विचार तोहि ध्यानास आणिले पा‍ा. कारभार हिमत सर्व विदित आहे. परंतु तपसिले ल्याहावे हे नाही. पुढेहि वृत होईल ते शेवेसी हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar to Nanasaheb regarding the straitened circumstances of Dabhade who was obliged to refuse any monetary help to Tarabai.*

---

*No. 112]* *[17-9-1753 ?*

छ १९ जिल्काद

**श्रीगजानन.**

राजश्री त्र्यबकराऊ विस्वनाथ गोसावी यांसी अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य

प्रति सौभाग्यादिसंपन्न अंबिकाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे. गौली याचे वाडे वडगावाजवल बहुत दिवस आहेत. त्यांस हा कालपर्येत काडीचा उपसर्ग लागला नाही. सांप्रत रखमाजी सिवदेव यानी तुम्हाजवळ काये लबाडी केली असेल त्याजवरून सोला गाडे आवघे गवत गौली याचे भरले. त्याने तो तुम्हाजवल मनस्वीपणे सागितले. त्या गोस्टीवर तुम्ही गाडे पाठऊन घेऊन जावे उचित आहे यैसे नाही. तुमच्या विचारे तलेगावीची रयेत यासी भलत्या प्रकारे निमित्ये ठेऊन येथे राहू न पावे यैसेच तुमच्या विचारे असिले तरी तैसेच उत्तर पाठवावे त्याजप्रमाणे वर्तणूक करून. क्षुलक गोस्टीचा वारंवार बोभाट तुम्हा-

पावतो लेहावे यैसे नाही. गौलीयानी गवत काही कुरणातील कापले नाही. विकत कुणबीयापासी घेतले होते. रखमाजी सिवदेव याच्या मते यानी तेथे न राहावे यास्तव इतका उपद्राप त्याने केला आहे. तुमच्या विचारास येईल तरी ताकीद पत्र सत्वर पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे? रा. छ १८ जमादिलाखर हे विनंती.

¶*Ambikabai Dabhade, wife of Yashavantrao, writes to Trimbakrao Pethe, complaining that hay has been taken away forcibly out of her possessions.*

---

*No. 113*] [*18-6-1754*

श्री

त्रिंबकराव दाभाडे सेनाखासखेल यास सदरेस वस्त्रे दिल्ही, सन खमस खमसैन जामदारखानापैकीं छ २६ साबान

| सनगे | येकूण | | आख | |
|---|---|---|---|---|
| ६९२॥ | खासा | | | |
| | २३८ | मंदील | १ | |
| | १५० | दुपटा | १ | |
| | २२४॥ | झगा मिठ्याचा १ | | |
| | | यैा सनगे | २ येकूण | |
| | ८० | तुबा किमखापी | १ | |
| | ६९२॥ | | ५ | |
| १६३॥।= | जावजी दाभाडे सनगे ३॥ येकून | | | |
| ३८८।. | जानराव पाटणकर | | | |
| | १३६॥ | मंदील | | १ |
| | ११० | दुपटा | | १ |
| | ११२॥ | झगा मिठ्याचा | | १ येकून सनगे २ |

(अपूर्ण)

¶*List of the robes of honour presented to Trimbakrao Dabhade, upon the death of his father Yashvantrao on 18th May 1754.*

*No. 114*]

## श्री

### पुरवणी राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

विनंती. पिलाजी गायकवाड वेळूघाटावर रेवा उतरोन आद्यापि राहिला आहे. थोडी बहुत फौज आलीकडे आहे; परंतु त्यास कुमक राजश्री खंडेरायांकडून पथके बरोबरी येतात, हें वर्तमान तेथें आपणांस कळतें किंवा नाहीं हे न कळे. येसयामधें काही खासगत पागा व पथके बरी पाठविली पाहिजे; म्हणजे कितेक काम होते. पुढे सर्व जफ्त आपला बसतो. त्याचे व इकडे कोण्हीं राहूं पावत नाही. याकरिता अतिसत्वर जे फौज योजल ते पाठविली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Gaikwad and Khanderao Dabhade are reported to the Peshwa as being about to take the offensive. The Peshwa is requested to collect his forces and send them against the pair.*

---

*No. 115*]

## श्रीराम

### राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशललेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें. पावोन वर्तमान आवगत जालें. चांदवड परगणा सरलष्करचा, तेथें घासदाणियांचे रोख करून जमीदारांस भेटीस बोलाविलें, याजविशई कितेक प्रकारें आपण लिहिलें. येसियास चांदवड परगणा आमचे सरंजामाचा त्यास वोझर व सुकेणें दोन्ही गांव आमचे मोकादमीचे याजकरिता राजश्री स्वामीपासून दोन्ही गाव इनाम करून घेतले. त्यास सात वरसें तेथील येक पैसा पावत नाहीं. आम्ही गावासी कजिया करावा तर वतनी प्रसंग याजकरिता गावास तगादा न केला. ते तर विचारावर न येत. यास्तव परगणियांस उपसर्ग लागत असिल. आपण म्हणतील की साता वरपाचा मजकूर येंदाच करिता? येसियास चार वेळा याजनिमित्य परगणियास उपसर्ग लागला त्यांसही जे लेहावयाचे ते लिहितच गेलो. परंतु त्यांच्या ध्यानास न ये. त्यांनी पशर्जाचे दोगांवच्या येवजाचें लिगाड वारून पुढें सुरलित चालो दिल्हीया परगणियांस उपसर्ग द्यावयाचे प्रयोजन काये आहे? याजकरिता आपणही त्यास सांगोन जमीदाराचे रुजुवातीने येवज ठरावेल तो देविला पाहिजे. जे गोष्टीने दों

गावचा येवज आम्हास पाऊन पुढे मुरलीत आम्हापासून परगणियास उपद्रव न लागे आपण शब्द न ठेवीत ते गोष्टी केली पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे. छ १९ जिल्काद हे विनंती.

¶*Umabai Dabhade requests Chimaji Appa kindly to write to the Sarlashker and other Jamidars asking them not to obstruct her in collecting her dues from her inam villages in Chandwad pargana.*

---

*No. 116*] [*Before 1736*

श्री

पुरवणी राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आजी छ मजकुरीं उमाबाई दाभाडियानीं राजश्री स्वामीस व वाडियांत पत्र लेहून पाठविलें कीं मल्हारजी होलकर व राणोजी शिंदे व आनदराऊ पवार फौजेसहवर्तमान परगणे सुलतानपूर वगैरे परगणियांत जाऊन मुलूक लुटून पैका गावगना(वंत)ला म्हणून नालीसीचीं पत्रें पाठविलीं आहेत. स्वामीस वर्तमान कळावें याकरितां लिहिलें असे. राजश्री रावोराम सवनिविस यानीं वर्तमान राजश्री स्वामीजवळ सांगितलें कीं राजश्री चिमाजी आपा यानीं परगणें नेवासें येथें सात हजार रुपये वसूल घेतला. राजश्री स्वामीनीं उत्तर दिल्हें, जरी पैका घेतला हे गोष्ट खरी असिली तरी सात हजार रुपये आम्ही पुणे देसी वसूल घेऊं म्हणून सांगितलें. स्वामीस कळावें याकरितां लिहिलें असे. राजश्री संताजी जाधव याणी राजश्री स्वामीजवळ सांगितलें कीं परगणे गाडापूर व परगणे वालुंज येथें वसूल गावगना राजश्री चिमाजी आपानी बारा हजार रुपये घेतले, म्हणून सांगितलें. तरी स्वामीकडे वसूल जालियाचें वर्तमान आलें आसिलें तर लेहून पाठविलें पाहिजे. राजश्री दादाराऊ याची ही पत्रें वरच्यावर येतात कीं राजश्री पंतप्रधान याची फौज माळवीयामध्यें पाठऊ नये. स्वामीस वर्तमान कळावें याकरितां लिहिलें असे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Bajirao is informed that complaints against him have been lodged with the king. The raiding activities of Ranoji Sindia, Holkar and Powar have given offence to Umabai. Dissatisfaction is also expressed at Chimaji Appa's activities in Pargane Newasa, Gandapur and Valunj.*

No. 117] [26-9-1726 ?

पौ ११ छ सफर मुा भामनदी.

श्री

राजश्री बाजीराव पंडितप्रधान गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नेहांकित खंडेराव दाभाडे सेनापति दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिले पाहिजे विशेष. राजश्री गणपतिराऊ याचे पत्र पूर्वी आले होते कीं येक खेडीयाबदल आमचा बेबनाव आहे याजकरितां आम्ही आपणाकडे येतो यैसे लिहिले. त्याचा जाव येथून पाठविला कीं राजश्री प्रधानपंताची आमची भेटी होईल त्यानंतर तुमचे मनोदयानरूप होईल, याबयाची उतावली न करणे यैसे लिहिले. तथापि त्याचे चित्तात उद्विग्नता येऊन सासवडीहून विजयादशमीचे दिवसी स्वार होऊन काली आदित्यवारी येथें आले. भेटीनंतर केवल उदासीनतेचा प्रसंग बोलोन शफथ करितात कीं मी तेथून आलो. आता कांहीं ये स्वारीस जाणे नाहीं. यैसे बालोन येथें राहिले. सेवट निदान गोस्टी बोलिले जे जरी तुम्ही अंगीकार करीत नाहीं तर हरकोठे दुसरे जागा जाईन परंतु त्याजकडे जाणार नाहीं यैसे बोलतातो. परंतु त्याचे बोलीचे काय आहे ? सिपाई आहे, बोलावे लागते; त गोष्टीचे कांहीं नाहीं. विचारे पाहतां आपण उपेक्षा करावी, एका खेडियासाठीं दिलगीर करावे यैसे नाहीं. तरी एक समाधानाचे पत्र लेहून जे गोष्टीमुळें रुसवा आहे ते मान्य करून पाठविले पाहिजे. भला माणूस; याचेविषयीं आहकार धरून टाकिली साठी घ्यावी हे आपणास विहित नव्हे. याजकरितां मुजरद पत्र लेहून वार्तिक पाठविले असेत. जाणिजे छ १० सफर. बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Khanderao Dabhade requests the Peshwa kindly to consider the case of Ganpatrao who being dissatisfied with the Peshwa on the question of a village, left his side and went to Dabhade. Khanderao requests the addressee to entertain him in his service and concede him his village, as he is a good soldier.*

No. 118] [1736?

श्री

पुरवणी श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. देहरमालेस साखरीहून भोंसले यांनीं जमावसुद्धां जाळून किला घेतला. येक चौबुर्जी मात्र राहिली ते वलकाऊन राहिले. तों राजश्री सेनापति फौजसुद्धां निघोन गेले. मदत आली येसें साखरीकरांसी कळलें. तसमयीं किल्यावरील लूट गुरें ढोरें व चिंदीचोळा करून खाले उतरोन गेले. किला आरबांकडे खाईम राहिला. मग सेनापतीनीं साखरीवर मोकम केला. मोर्चेबंदी केली. येक रोज मोर्चे लागले, मग बोली लागली. गावांतून भोंसले यांनीं राजश्री दमाजी गाईकवाड याकडे अनुसंधान लाविलें कीं आम्ही भेटीस येतों. मग माधवराव निंबाजी गावांत जाऊन राजश्री राघोजी भोंसले यांस सेनापतीचे भेटीस घेऊन आले. सेनापति भोंडगावीं आहेत व राजश्री राघोजी भोंसलेही येथें आहेत. भोंसले यांनीं मुद्दा घातला कीं आरबांस किल्यावरून काडावें, आम्ही पूर्वीपासून सेवा करितों तैसी सेवा हाली करूं. त्यास सेनापति म्हणतात कीं किला कांहीं तुम्हीं आड घातला म्हणून आरबांकडील दूर करीत नाहीं. भार परगणेपैकीं पंचवीस गांव किल्याचे तनखियास देणें; बाकी राहील ते गाव तुम्हीं खाऊन राहणें. याप्रमाणें भोंसल्यासी म्हणतात. हें वर्तमान परस्परें स्वामीस विदित जाहालें असेल. आरब तों फारच सेर जाहाले आहेत. आज ह्या दरबारीं आरबांखेरीज काहीं नाहीं. दुसरें पूर्वी हावजी राकसा याणें चैपाले यांसीं राकपागड वसविला होता तो सांप्रत वीस पंचवीस वर्षे वोसाड पडला आहे. त्यास प्रस्तुत सिद्दी याकुद आरब यास सनद राजश्री सेनापतीनीं करून दिल्ही, कीं तुम्ही किलियाची वस्ती करा म्हणून सांगितलें. हा विचार मातुश्रीस ठाऊक न होता केला आहे. हलदवर्णाचे घाटमाथा किला आहे. नवापूर, नंदरबार, मुलतानपूर सोनगड देखील सुरत आठाविशीपर्यंत कबजाखाले माहाल येतात, म्हणून सनंदा करून दिल्या आहेत. प्रस्तुत पर्जन्यकाळीं वसवितील कीं न वसवितील हें कळत नाहीं. नवापूरचे नजीक किला आहे. किल्याखाली सुरतेचा रस्ता बराणपूर व आवरंगावाद मार्ग लागला आहे. लक्ष रुपये जकातीचे येतील येसी जागा आहे. तीन आंगें नाइलाज, येक आंग मात्र लगाव आहे. पाणी जिवंत आहे. राकसानें गडगा मात्र घातला आहे. देहरमालेपासून सोळा कोसावर आंतेर आहे. दोन किल्यामध्यें संपूर्ण बागलाण देश व बुंधाटी अशा जाग्याची वस्ती जाली म्हणजे संपूर्ण मुलूक खराब, च्यार पांचशें राऊत राहत येसा जागा आहे. असलें

वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. त्या प्रांतीचा ग्रहस्त म्हणतो कीं स्वामीचें नांव करून गड वसवितो. तों त्यास आम्हीं सांगितलें कीं आम्ही श्रीमंतास लिहितों. तेथून जाब येईल त्यासारिखा विचार सांगो म्हणून सांगितलें. याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. आढळे वर्तमान सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्ति.

¶*Peshwa is informed of the capture of the fort of Dehermal and the subsequent settlement of the dispute about it between Raghuji and Dabhade.*

---

*No. 119*]

## श्रीपांडुरंग

राजश्री चिमणाजी पंडित

आपा गोसावी यांस

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो दमाजी गायकवाड समसेर बहाद्दर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून सांभाळ पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाला. राजश्री दुरजनसिंग मांडवीकर याजविसीं गतवर्षापासून दोन च्यार पत्रें पाठविलीं व राजश्री आयाबा बरोबर समक्षही सांगोन पाठविलें कीं यांचें स्थल स्वाधीन करणें; पूर्ववत जागा सिध करून कुटुंबासहवर्तमान राहतील यैसे आपले मानस ते पत्रावरून मशारनुलेचे सांगितल्यावरून कलों आलें. यैसियासी न्याये अन्याये येथाविध पाहिजे त्याणें आपणांस पुसोन वर्तणूक करावी तेणेकरून मनोरथ सिधीस जातील यैसा प्रसंग विश्वतोमुखीं असतां आम्हांस अयुक्त आज्ञा करावी यैसें नाहीं. मांडवीकराचे तीर्थरूप वर्तमान असतां सौरक्षण करावयासी अंतर जालें नाहीं. त्या स्थलचे गिरासे मात्र होते. सुरत माहालात जुजवी पाच सात हजार गिरास होता. ताम्राचें प्राबल्य विशेष होतें. उभयेतांचा स्नेह जालीयाउपरी ताम्राचेही विलयास गेले. याचे कृपेमुलें ऊर्जित विशेषात्कारें जाले. मग दुर्जनसिंग यास कुबुध निर्माण होऊन वर्तणूक आरंभिली तन्मुलें पराभव पावले हे गोष्ट येथार्थ आहे नाहीं परस्परें सोध करावा. याउपरी त्याचें स्थल स्वाधीन केलियानें परिणाम कसा होतो? तिगस्ता त्याणें पेटकर दरम्यान घालून तहनामें लिहून दिल्हे आहेत त्याप्रमाणें आम्हीं मान्य केलें. असो; वतनदार आहे, येकादी त्याणें करारमदारप्रमाणें कबल केले असते. परंतु आपल्या आश्रामुलें ते गोष्ट टाकून हा विचार अविलंबिला. तरी मांडवीस कोट बांधून त्याणें राहावें तेव्हां पस्ट भाषणें नलगे. आम्हास आपली योजना करणे

लागेल. आपण पत्रीं आज्ञा करितात कीं त्याजपासून अंतर पडिलें तरी आम्हीं दरम्यान. तरी आम्हांस आपण खावंद आहे कीं नाहीं? आम्हांकर्डाल दरम्यानगत सांहेबीं करून त्यास हातीं द्यावें, कबिले त्याणी गावावर आणून ठेवावे, त्यास आम्हांकडून साहेब दरम्यान जालियावर अंतर पडेल कीं काय हें ध्यानास आणावें. दुरजनसिंगाचें आगत्य धरून आम्हांसारखे सेवक लोक याचे मनोरथ न रक्षावे येैसें नाहीं. ते सनिध राहिले म्हणून कार्याचें आम्हीं दूर म्हणून अकार्याचें नाहीं. आम्हां लोकांचे मनोरथ सेवटास नेऊन सेवा आम्हांयोग्य ध्यावी. उमेदीने करून. सारांश आमचा विचार या प्रकारचा आहे. याउपरी आज्ञा प्रमाण हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*The whole letter is in one hand. Damaji Gaikwad complains to Chimaji Appa against the latter's interference in the affair of the Thakor of Mandwi.*

MAP REFERRING TO THE CONQUEST OF GUJERAT AND THE BATTLE OF DABHOI 1731.

Dotted line points out Bajirao's northward route

Scale 63 Miles to 1"

